'संस्कृतीच्या मिरासदारांनो' तुम्ही कोणाबरोबर आहांत?

• माक्सिम गोर्की



"संस्कृतीच्या मिरासदारांनो" तुम्ही कोणाबरोबर आहांत?

लेखक : माक्सिम गोर्की
अनुवाद : अनिल हवालदार

लोकवाङ्मय गृह प्रा. लि. मुंबई ४०० ०२५

लोकवाङ्मय गृह
म / ३३७

पथमावृत्ती - नोव्हेंबर १९८५

मूल्य / दहा रुपये

मुखपृष्ठ / संजय कुलकर्णी

मुद्रक :
श्री. ज्ञानेश्वर कुडले,
विवेक मुद्रणालय
पुणे ४.

प्रकाशक :
एस. के. कुलकर्णी,
लोकवाङ्मय गृह प्रा. लि.
भुपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड, मुंबई ४०० ०२५.

अनुक्रम

टीप : रादुगा प्रकाशन, या संस्थेने मॉस्को येथेच प्रकाशित केलेल्या मािक्सम गोर्कीच्या 'साहित्य आणि कला' या लेखसंग्रहातून संकलित.

प्रस्तावना

१

मास्क्सिम गोर्की (हे टोपण नाव. मूळ नाव – अलेक्सेई माक्सिमोविच पेश्कोव, १८६८–१९३६) यांचा कलात्मक वारसा प्रचंड आहे. इतर थोर साहित्य-श्रेष्ठींप्रमाणेच, त्यांनी केवळ स्वतःच्या महान रशियन साहित्याच्या विकासावर लक्षणीय ठसा उमटविला एवढेच नव्हे, तर जागतिक साहित्यावरही बराच प्रभाव पाडला. समाजाच्या अगदी खालच्या स्तरातून आलेल्या, इतर कुणालाही नसेल तेवढे जीवनाच्या सत्याचे आकलन झालेल्या व स्वतःच्या कलात्मक साधनांद्वारे ते सत्य लोकांना सांगण्याची तळमळ लागलेल्या ह्या लेखकाने सबंध रशियन समाजाला व नंतर सबंध जगाला चकित केले. गोर्कींची साहित्यिक कारकीर्द दिपवून टाकणारी होती. १८९५ मध्ये त्यांच्या आरंभीच्या कथा मध्यवर्ती नियतकालिकां-मधून प्रसिद्ध झाल्या आणि एव्हाना १८९८ मध्येच 'निबंध आणि कथा' यांचा दोन खंडांमधील संग्रह प्रसिद्ध झाला. १९०१ साली त्यांच्या पुस्तकांचे प्रमुख युरोपीय भाषांमधून अनुवाद झाले. केवळ १९०३ मध्ये त्यांच्या सहा खंडांच्या संग्रहाचे पाच वेळा पुनर्मुद्रण झाले.

गोर्की यांच्या साहित्यिक कार्याची उंची, त्यांच्या विचारांचा गहिरेपणा, त्यांचे कलात्मक कसब, भिन्न भिन्न साहित्यप्रकारांवरचे आणि शैलींवरचे त्यांचे पूर्ण प्रभुत्व – हे सर्व विस्मयकारक होते. त्यांची विद्वत्ता आणि ज्ञानाची अदम्य तहान पाहून त्यांचे समकालीनसुद्धा थक्क झाले होते. पद्धतशीर शिक्षण घेणे सलग दोन वर्षांहून जास्त काळ त्यांना शक्य झाले नव्हते, हे प्रत्येकाला ठाऊक नाही. पण स्वतःच्या विशाल व्यासंगामार्फत आणि बहुविध ज्ञानामार्फत ते २० व्या शतकामधील एक सर्वात जास्त सुशिक्षित व्यक्ती बनले.

लेखक, साहित्यिक आणि सामाजिक व्यक्ती या नात्याने तीव्र आत्मिक जीवनाच्या वातावरणात परिपक्व व विकसित होण्याचे सुदैव गोर्कींना लाभले. अत्यंत बुद्धिमान, प्रगाढ सुसंस्कृतता, धीट विचार व गहिऱ्या भावना असलेल्या

लोकांबरोबर त्यांची सतत परस्परक्रिया आणि संबंध घडत राहिले. व्ला. लेनिन, ल्ये. तल्स्तोय, आ. चेखोव, इ. बूनिन, ले. आंद्रेयेव, फ्यो. शल्यापिन, इ. रेपिन, कॉ. स्तानिस्लावस्की, रो. रोल्लाँ व इतर अनेकांबरोबर त्यांचे निकटचे संबंध होते.

क्रांतिकारक युगाशी घडलेल्या संयोगामुळे मा. गोर्कींचे रशियन व जागतिक साहित्यामधील अगदी नेमके आणि विशिष्ट स्थान निर्णित झाले. इतर रशियन आणि युरोपीय लेखकांपेक्षा असलेला गोर्कींचा वेगळेपणा म्हणजे जागतिक साहित्यात प्रथमच (त्यांची कादंबरी 'आई' आणि नाटक 'वैरी') त्यांनी स्वतःचे खास वैशिष्टय असलेल्या सर्व 'कलात्मक सामर्थ्यानिशी, नव्या सामाजिक पायावर जगाची फेरउभारणी करण्याची ऐतिहासिक जबाबदारी अंगावर पडलेल्या कामगारवर्गाच्या मनःस्थितींचे, भावनांचे आणि विचारांचे चित्रण केले. त्यांचे स्नेही आणि नवजात सोविएत रशियाचे पहिले शिक्षणमंत्री अनातोली लूनाचार्स्की यांनी लिहिले होते : "गोर्कींचे सर्वश्रेष्ठ, अपवादात्मक महत्त्व म्हणजे कामगारवर्गाचे ते पहिले महान लेखक आहेत... मार्क्स, एंगल्स आणि लेनिन यांच्यात हा वर्ग जसा तत्त्वज्ञानदृष्टया व राजकीयदृष्टया आकाराला आला, तसा गोर्कींमध्ये तो कलात्मकदृष्टया आकारला."[१] एक लढवय्या, क्रांतिकारक, जीवनाचा स्थित्यंतरकार म्हणून माणसाचे वर्णन करताना गोर्की यांनी ऑक्टोबर क्रांतीपूर्वीच्या संपूर्ण रशियन समाजाचे कलात्मक चित्रण घडविले. सर्व सामाजिक वर्ग, स्तर व गट, वर्गलढे आणि विसंगती; भिन्न राजकीय, तात्त्विक, धार्मिक, नैतिक व सौंदर्यवादी शोध – असे सर्वांगीण चित्रण केले. उपरीनिर्दिष्ट लूनाचार्स्की यांनी गोर्कींच्या सर्वोत्तम कादंबरीचे, 'क्लिम सामगिनचे जीवन', वर्णन करताना 'दशकांचा चलच्चित्रपट' असे म्हटले होते. लेखकाच्या संपूर्ण सृजनशील कार्याला हे विधान लागू करण्याचा आपल्याला हक्क आहे, कारण रशियातील जीवनाचा खराखुरा चलच्चित्रपट त्यांच्या पुस्तकांच्या पानांवरून पाहायला मिळतो : ('बालपण', 'दाही दिशा' आणि 'माझी विद्यापीठे' ही त्रयी; 'आर्तामोनोवांचा खटला', 'फोमा गोर्देयेव' ह्या कादंबऱ्या; 'तळागाळातील माणसं', 'गंजलेले घर', 'दाचावाले', 'येगोर बुलीच्योव व इतर', 'वास्सा झेलेझनोवा' आणि इतर खूप नाटके.) म्हणून, गोर्की यांचे सृजनशील कार्य म्हणजे १९ व्या शतकातील अखेरच्या काळातील व २० व्या शतकातील आरंभीच्या दशकातील रशियन जीवनाचा ज्ञानकोश म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही.

लेखक म्हणून गोर्की यांचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे लहानपणापासून क्रांतिकारक चळवळीशी आलेला त्यांचा निकट संबंध. झारशाहीविरोधी लढयातील त्यांच्या सहभागाचे प्रमुख टप्पे आठवून पाहू : १९ व्या शतकाच्या नवव्या

१. लूनाचार्स्की अ., ८ खंडातील संकलित संग्रह, खंड २, पान १४१.

दशकाच्या अखेरीस मार्क्सवादी वर्तुळातील कार्याबद्दल पहिली अटक; तेव्हापासून झारच्या पोलिसांची गोर्कीवर सतत पाळत होती. विद्यार्थ्यांचे निदर्शन दडपल्याच्या निषेधाबद्दल आणि झारची एकतंत्री राजवट उलथून टाकण्याचे आवाहन केल्याबद्दल १९०१ मध्ये दुसरी अटक (नीझनीनवगोरद – आताचे गोर्की शहर – येथे त्यांना हद्दपार करण्यात आले); १९०२ मध्ये विज्ञान प्रबोधिनीचे मानद अकादमीशिअन म्हणून गोर्कींची निवड झाली, पण झार दुसरा निकोलस याने हुकूम काढून ह्या निवडणुका अवैध ठरविल्या. ९ जानेवारी १९०५ रोजी पीटरबुर्गमध्ये शांततावादी निदर्शकांवर गोळीबार झाल्यानंतर गोर्कींनी एक क्रांतिकारक पत्रक लिहिले व एकतंत्री राजवट उलथून टाकण्याचे नवे आवाहन केले. ह्याबद्दल त्यांना परत अटक झाली व पीटर आणि पॉल किल्ल्यात त्यांना बंदिवासात ठेवण्यात आले. पण प्रचंड जनमताच्या दबावाखाली व रशियन आणि पश्चिम युरोपीय बुद्धिमंतांच्या निषेधांपायी, गोर्कींची मुक्तता करणे सरकारला भाग पडले. १९०५ मधील मॉस्कोच्या उठावात त्यांनी भाग घेतल्यानंतर परत एकदा त्यांच्या पाठी कायदेशीर चौकशीचा धोका निर्माण झाला. म्हणून १९०६ च्या आरंभी ह्या क्रांतिकारक लेखकाला पश्चिमेत प्रयाण करावे लागले. सार्वत्रिक माफी जाहीर झाल्यानंतरच केवळ १९१३ मध्ये ते मायदेशी परतू शकले. अशा चरित्राचा लेखक सबंध जगात झाला नाही व अद्यापही नाही, असे आम्ही सार्थपणे म्हणू शकतो.

ह्या शतकाच्या आरंभापासून साहित्यिक शक्तींचे एक जोरदार संघटक म्हणून गोर्की पुढे सरसावले. ह्या बाबतीत एक नव्या प्रकारचा कलाकार-संघटक म्हणून त्यांनी स्वतःचे दर्शन घडविले. जनकलेसाठी, जीवनाच्या सत्यासाठी कला राबविण्यासाठी त्यांच्यासह लढायला सिद्ध असलेल्या लेखकांना त्यांनी एकवटले. त्यांची ही कार्ये सैद्धांतिकदृष्टचा, सौंदर्यदृष्टचा आणि शैक्षणिकदृष्टचा फार महत्त्वाची होती. १९१७ च्या ऑक्टोबर क्रांतीनंतर त्यांच्या सर्व वैभवानिशी ती पुढे चालू राहिली.

सोविएत साहित्यातील समाजसत्तावादी वास्तववादाचे जनक असे गोर्कींना सार्थपणे म्हटले जाते. त्यांचे व्यक्तिमत्त्व, सृजनशील कार्य, संघटनात्मक आणि साहित्यिक उद्योग – ह्या सर्व गोष्टींनी बव्हंशी (व आवश्यकरीत्या !) सोविएत साहित्याच्या विकासाच्या दिशांना, त्याच्या वैशिष्टचांना व कलात्मक तत्त्वांना निर्णित केले.

२० व्या शतकाच्या आरंभी समाजसत्तावादी वास्तववाद साहित्याची व कलेची एक रीत म्हणून प्रस्थापित झाला आणि जगाच्या समाजसत्तावादी स्थित्यंतराच्या आरंभीच्या काळामध्ये त्याने पक्के मूळ धरले. सोविएत संघात तो प्रमुख साहित्यप्रकार बनला. " समाजसत्तावादी वास्तववाद " हा शब्दप्रयोग सर्वप्रथम

१९३२ साली सोविएत वृत्तसृष्टीत अवसरला. सोविएत साहित्याच्या क्रांतिपूर्व साहित्यिक अनुभवाचा (सर्वप्रथम गोर्की यांच्या) आणि वैशिष्टचांचा आढावा घेणाऱ्या लेखात हा शब्दप्रयोग वापरण्यात आला होता. रशियन अभिजात साहित्याच्या सर्वोत्तम परंपरांचा वारसा तर समाजसत्तावादी वास्तववादाने घेतलेला आहेच, शिवाय साहित्यिक विकासाचे गुणात्मकदृष्टचा एक पुढचे पाऊल त्याने टाकले आहे. त्याचे नाविन्य आणि बळ अवाढव्य ऐतिहासिक व्यवहारात सामावले आहे. कामगारवर्गीय क्रांतीसाठी आणि शास्त्रशुद्ध समाजसत्तावादाच्या आधारावर स्थित्यंतरासाठी लढण्याचा तो व्यवहार आहे. त्याने नव्या प्रकारच्या लेखकाचे जीवनविषयक तत्त्वज्ञान निर्णित केले आणि त्याच्या नायकांच्या व्यक्तिरेखांमार्फत व त्याच्या कलात्मक साधनांमार्फत ते सांगितले. समाजसत्तावादी वास्तववादी साहित्यामधील कलात्मक नाविन्य त्याच्या विकासाच्या पहिल्याच टप्प्यांमध्ये प्रकट झाले होते. ' आई ', ' वैरी ' अशा गोर्कीच्या पहिल्या पुस्तकांपासून व नंतर ' आर्तामोनोवांचा खटला ', ' क्लिम सामगिनचे जीवन ' इत्यादींमधून साहित्यात केवळ नवे विषय आणि नवे नायकच आले होते असे नव्हे, तर नवा सौंदर्यवादी आदर्श, ऐतिहासिक आशावादही आला होता. सामाजिक आणि क्रांतिकारक विकासाच्या पार्श्वभूमीवर आजचे संघर्ष तो उघड करीत होता

सोविएत साहित्याच्या पहिल्या पावलांपासून जुन्या आणि नव्या जगांमधील संघर्ष, " जगव्यापी क्रांतीची आग " मुख्य विषय बनला. म्हणजे कलेला समृद्ध करणाऱ्या नव्या ऐतिहासिक आशयाने जीवनाच्या कलात्मक वर्णनाला विशिष्ट स्वरूप दिले.

समाजसत्तावादी वास्तववादाच्या रीतीच्या पायात तीन वास्तवांना — वर्तमान, भूत आणि भविष्य — एकत्र आणण्याची गोर्कीची कल्पना सामावलेली आहे. प्रत्यक्ष घडामोडीतील, लढ्यातील वास्तवाचे चित्रण आणि भविष्याच्या शिखरावरून भूतकाळ पाहण्याची समर्थता त्या कल्पनेत अभिप्रेत आहे. त्यांनी अनेकदा ठासून म्हटले होते : " आपल्या वास्तवाच्या सर्व विविधतेमधून त्याच्या मुख्य प्रवृत्ती उघड केल्या पाहिजेत." सोविएत कलेतील ह्या नव्या कला-रीतीला " जगाचे स्थित्यंतर घडविणारा लोकांचा वास्तववाद " असे गोर्कीनी म्हटले होते. सोविएत कलेच्या रोमांचवादी तत्त्वांचे त्यांनी सतत समर्थन केले होते. लढ्याच्या शौर्यशाली उत्साहाची व विधायक व्यक्तिरेखा निर्माण करण्याच्या कार्याची त्या तत्त्वांशी सांगड घातली होती. सोविएत लेखकांच्या पहिल्या काँग्रेसमध्ये प्रतिनिधींसमोर भाषण करताना ते म्हणाले होते : " आपल्या पुस्तकांचा मुख्य नायक श्रम बनला पाहिजे, म्हणजे श्रमप्रक्रियेने संघटित केलेला माणूस..."

प्रचारक, तत्त्वप्रणालीकार आणि साहित्यिक टीकाकार ह्या नात्याने गोर्की

यांनी वि. बेलीन्स्की, नि. चेर्नीशेवस्की, नि. दब्रोल्यूबोव यांच्या रशियन क्रांतिकारक लोकशाहीवादी टीकेच्या परंपरा पुढे चालू ठेवल्या व त्यांचा विकास केला. त्यांच्या साहित्यावरील असंख्य सैद्धांतिक आणि टीकात्मक लेखांमधून, त्यांच्या टिपणांमधून व पत्रांमधून, कलात्मक आवडीशी व भाषेच्या उत्कृष्ट जाणीवेशी संगम घडलेल्या त्यांच्या प्रचंड बुद्धिमत्तेचे दर्शन घडते. रशियन आणि जागतिक अभिजात साहित्य, सोविएत साहित्य, त्याची कार्ये, शैली आणि रीती, नव्या समाजाच्या उभारणीमधील सोविएत लेखकाचे स्थान, अशा अनेक विषयांवरील गोर्कींचे चिंतन त्या लेखांमधून वाचायला मिळते. संस्कृतीविषयक गोर्की यांची विधाने आणि विचार केवळ साहित्य व कलाक्षेत्रातील लोकांनाच कमालीचे स्वारस्यपूर्ण वाटतात असे नव्हे, तर मार्क्सवादी-लेनिनवादी सौंदर्यशास्त्रात बहुमोल भर घालणाऱ्या मान्यवर साहित्यश्रेष्ठाचे सखोल आणि प्रगाढ विचार म्हणून सर्वसामान्य लोकांनाही स्वारस्याचे वाटतात.

२

लोककलेमध्ये – लोकसाहित्य आणि दंतकथांमध्ये – गोर्कींना लोकांच्या विचारांचा व भावनांचा सुसंवादी एकोपा आढळला. त्यात त्यांना "अत्यंत प्रगाढ व तेजस्वी, कलात्मकरीत्या परिपूर्ण प्रकारचे नायक"[१] दिसले. वाचकाला आढळेल की, गोर्कींनी सबंध आयुष्यभर उराशी बाळगलेल्या विचारांपैकी हा एक विचार होता. हा विचार त्यांच्या सौंदर्यशास्त्रविषयक आणखी एका प्रमुख तत्त्वांशी निकटतेने निगडित होता – सौंदर्यवादी भावनेच्या आणि एकूण सृजनकार्याच्या विकासात श्रमाच्या सर्वांत मोठ्या महत्त्वाला मान्यता. 'व्यक्तिमत्त्वाचा नाश' ह्या लेखामध्ये त्यांनी हा विचार पुढील रीतीने मांडला होता: "माणसे केवळ सर्व भौतिक मूल्ये निर्माण करणारी शक्ती नव्हेत, तर आत्मिक मूल्यांचा एकमेव आणि अक्षय उगम आहेत. जगातील सौंदर्य, सर्व महान कविता, शोकांतिका, जागतिक महत्त्वाचा सांस्कृतिक इतिहास – हे सर्व लोकांकडूनच निर्माण झाले आहे."[२] ह्या तत्त्वाधिष्ठित भूमिकेचा आधार घेऊन गोर्कींनी लेखकांना, संगीतकारांना आणि कलाकारांना आवाहन केले की, त्यांनी आपल्या सृजनकार्यात लोकसाहित्याचा, लोकांच्या भावनांच्या, विचारांच्या आणि भाषेच्या ह्या कारंजाचा वापर करावा. गोर्की यांच्या दृष्टीने आणखी एक अत्यंत महत्त्वाचा विचार म्हणजे लोकांच्या सृजनकार्यात, लोकभाषेमध्ये, या ना त्या संस्कृतीच्या राष्ट्रीय वैशिष्टयांना खतपाणी घालणारे, साहित्य व कला यांची विशिष्ट राष्ट्रीय वैशिष्टये निर्माण करणारे उगम त्यांना आढळले.

---

१. गोर्की मा., ३० खंडांमधील संकलित साहित्य, खंड २७, पान ३०५.
२. कित्ता, खंड २४, पान २६.

गोर्कींनी तरुण लेखकांना केलेल्या शिफारशी, नव्या लेखकांनी त्यांच्याकडे पाठविलेल्या साहित्याचे त्यांनी केलेले विश्लेषण, त्यांची पत्रं व त्यांचे लेख -- ह्या सर्वांमधून गोर्कींना भाषेच्या विशुद्धतेविषयी वाटणारा कळवळा प्रकट होतो. लोकांचा अभ्यास करा, साहित्यश्रेष्ठांपासून लेखनाचे धडे घ्या, असा त्यांचा उपदेश आढळतो. ह्या शतकाच्या चौथ्या दशकाच्या आरंभी भाषेतील स्वाभाविकतावादाविरुद्ध, " उत्स्फूर्त भाषे "च्या घोषणेविरुद्ध, व्यावसायिकवाद, स्थानिक शब्द आणि बोलीभाषांनी साहित्याला दूषित करण्याविरुद्ध त्यांनी ठामपणे लेख लिहिले, फलदायी चर्चा घडवून आणल्या व सोविएत साहित्याच्या भावी विकासावर त्यांचा हितकारक परिणाम झाला.

भाषेशी वरपांगी प्रयोग करण्याविरुद्ध, लोकांच्या जीवनापासून आणि भाषेपासून फारकत असलेली " शब्दनिर्मिती " करण्याविरुद्ध गोर्कींनी त्यात्र चिकाटीने व सातत्याने लढा दिला. गोर्की नेहमी म्हणत की, जिवंत भाषा लोकांनी निर्माण केली आहे आणि श्रेष्ठ साहित्यिकांनी तिच्यात सुधारणा घडवून, तिला समृद्ध आणि सफाईदार करून तिचे साहित्यिक भाषेत रूपांतर घडविले आहे. गोर्कींनी लेखकांना असेही आवाहन केले की, भाषासमृद्धी फक्त लोकसाहित्याकडूनच करू नका, तर पूष्कीन, गोगोल, तल्स्तोय, तुर्गेनेव, चेखोव यांच्यापासून कायम शिका...

गोर्कींवर लोककलेचा प्रभाव प्रचंड होता. त्यांच्याच शब्दांमध्ये सांगायचे तर, " आमच्या भाषेचं मोहक सौंदर्य आणि तिची समृद्धी समजून घ्यायला तिनं मला फार मोठी मदत केली."

रशियन साहित्य जगामधील सर्वात अधिक लोकशाहीवादी आणि स्वातंत्र्यप्रेमी होते, अशी गोर्कींची ठाम धारणा होती. रशियन साहित्याच्या सामर्थ्यात आणि वैशिष्टयात गोर्कींना त्याचे राष्ट्रीय स्वरूप दिसले हा काही योगायोग नव्हे. त्यांच्या भाषेत सांगायचे तर रशियन लेखक " नेक लढवय्या होता, सत्यासाठी हौतात्म्य पत्करणारा होता ", " त्याने अंतःकरणपूर्वक मानवतावादाचा पुरस्कार केला, स्वतःच्या माणसांचे लक्ष वेधवून घेतले."[१] रशियन साहित्याच्या आणि रशियन लेखकाच्या वैशिष्टयतेसंबंधीचे गोर्की यांचे विचार, मायदेशातील साहित्याच्या इतिहासाचे त्यांनी केलेले सखोल अवगाहन, ह्यांनी रशियन अभिजात साहित्याबद्दलच्या खऱ्याखुऱ्या स्तोत्राचे रूप घेतले आहे : " पश्चिमेतील एकही साहित्य अशा ताकदीने आणि वेगाने, गुणांच्या अशा प्रभावी आणि चमकदार तेजाने सजग बनले नाही, असे मी म्हटले तर ते अतिशयोक्त ठरणार नाही. सबंध जगाने मान्य केलेली अशी थोर पुस्तके युरोपात कुणीही निर्माण केली नाहीत,

१. गोर्की मा., संकलित साहित्य, खंड २४, पान ६६.

अशा अतर्क्य कठीण परिस्थितीमध्ये अशा अद्‌भुत सौंदर्याची निर्मिती कुणीही केलेली नाही ...

"आमचे साहित्य आमचा अभिमान आहे, एक राष्ट्र म्हणून निर्माण केलेली ती सर्वोत्तम गोष्ट आहे. त्यात आमचे सारे तत्त्वज्ञान सामावले आहे, त्यात थोर मन:प्रवृत्ती उमटल्या आहे. कमालीच्या जलदपणे बांधलेल्या ह्या अद्‌भुत मंदिरात आजतगायत थोर सौंदर्याची आणि सामर्थ्याची मने झळाळत आहेत, पवित्र विशुद्धतेची हृदये तेजाळत आहेत. ही अस्सल कलावंतांची मने आणि हृदये आहेत. आणि ती सर्व त्यांना जे काही आकलन झाले व जे काही त्यांनी अनुभवले, त्याचे खरेपणाने आणि नेकपणाने दर्शन घडवीत आहेत. ती म्हणत आहेत : रशियन कलेचे मंदिर लोकांच्या मूक मदतीने आम्ही उभारले, लोकांनीच आम्हाला स्फूर्ती दिली, म्हणून लोकांवर प्रेम करा !

"इतर कोणत्याही मंदिरापेक्षा आमच्या मंदिरात मानवतेचे अधिक वारंवार आणि जोरदारपणे गुणगान घडते. रशियन साहित्याच्या सौंदर्याने आणि सामर्थ्याने चकित झालेल्या जगाने रशियन साहित्याचे महत्त्व मान्य केले आहे."[१]

रशियन लेखकांबरोबर गोर्कींच्या झालेल्या गाठीभेटींच्या आठवणी, त्यांची स्मृतिचित्रे, हा गोर्की यांच्या सृजनकार्याचा एक स्वतंत्र प्रकार आहे. "साहित्यिकांच्या व्यक्तिचित्रां"मध्ये वास्तव व्यक्तींच्या प्रतिमा त्यांच्या स्वभावविशेषांनुसार, त्यांच्या वैयक्तिक लकबींनुसार रेखाटण्याचा गोर्कींनी प्रयत्न केला आहे पण त्याचबरोबर प्रत्येक व्यक्ती ठळक आद्याक्षरांमध्ये रेखाटण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. साहित्यिकांच्या आठवणींमध्ये वि. कोरोलेन्को यांचे दर्शन एक लेखक–नागरिक, "नेक लढवय्या", "रशियन लेखकाची एक प्रतिमा" म्हणून घडते. त्येव तल्स्तोय यांचे व्यक्तिचित्रण गोर्कींच्या लेखनाचा एक अत्युत्कृष्ट नमुना आहे. हे लेखन अगदी वेगळ्या धाटणीत घडले आहे. तल्स्तोय यांच्याबद्दलचा संपूर्ण निबंध वादविवादात्मक सुरात आहे. गोर्की वाचकाला पुढील मुख्य निष्कर्षाला आणतात : तल्स्तोय यांच्या आशावादाची ताकद त्यांच्या संन्यासी आत्मत्यागी आदर्शांबरोबरच्या, प्रतिकारहीन नम्र तत्त्वज्ञानाच्या दुराराध्य विसंगतीमध्ये सामावली आहे. अशा रीतीने तल्स्तोय यांच्या "ख्रिश्चन धर्मा"ची कृत्रिमता उजेडात येते. पण ह्या सर्व आंतरिक वादविवादांसह, तल्स्तोय "आत्यंतिक आणि तीव्ररीत्या सुंदर पुरुष होते, अखिल मानवजातीचे होते,"[२] रशियन साहित्याची कीर्ती आणि अभिमान होते, असे गोर्कींना वाटते. जागेच्या अभावी, गोर्कींनी

१. कित्ता, पाने ६४-६५.

२. गोर्की मा., संकलित साहित्य, खंड १४, पान २८३.

रेखाटलेल्या रशियन लेखकांबद्दलच्या व्यक्तिचित्रणांमधून, प्रस्तुत पुस्तकात आम्ही फक्त तल्स्तोय, चेखोव, लेस्कोव, प्रीश्विन यांच्याविषयीचे निबंध प्रकाशित करीत आहोत. आम्हाला खात्री आहे, ह्या निबंधांमधून वाचकाला समजून येईल की, लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे चारही अंगांनी वर्णन करण्यात गोर्की कुशल आहेतच, शिवाय त्या त्या लेखकाच्या सृजनकार्याचा आशय उघड करून दाखविण्यात गोर्की चतुर आहेत.

"...जागतिक संस्कृतीची वर्षे क्रांतीशी चपखलतेने जुळविण्यात गोर्की यांच्याविना दुसऱ्या कुणालाही आणि कधीही जमलेले नाही," हे शब्द रोलाँ यांचे आहेत. २० व्या शतकातील ह्या महान फ्रेंच लेखकाच्या शब्दांमधून गोर्कींच्या कार्याबद्दलचे प्रगाढ, खरे मूल्यमापन आढळते. विशाल कामकरी समुदायांना जागतिक साहित्याच्या अधिक निकट आणण्याची, त्याची ओळख घडवून देण्याची, गोर्की यांनी शब्द व कार्य यांच्या साह्याने धडपड केली. जागतिक साहित्यामधील श्रेष्ठ पुस्तके लोकांना उपलब्ध करून देण्यासाठी गोर्कींनी प्रयत्न केले. कामगार-वर्गाच्या आणि त्याच्यामार्फत निर्माण होणाऱ्या समाजाच्या कलात्मक संस्कृतीच्या घडणीतील प्रक्रियेत जागतिक साहित्यातील श्रेष्ठ पुस्तकांचे फार महत्त्व असल्याची त्यांना जाणीव होती. १९१९ मध्ये, गोर्की यांच्या पुढाकाराने "जागतिक साहित्य प्रकाशन संस्था" स्थापन करण्यात आली. त्याकाळी अशी दूरगामी योजना जगात अजोड होती. सोविएत संघातील लोकांच्या भाषांमधून जागतिक साहित्याच्या अनुवादांचे प्रचंड व नियमित काम सुरू झाले. जागतिक अभिजात साहित्यकृतींच्या व आधुनिक पुरोगामी पुस्तकांच्या अफाट संख्येने आवृत्ती प्रकाशित होऊ लागल्या. १९२० साली सोविएत रशियाला भेट देण्यास आलेल्या एच्. जी. वेल्स यांनी गोर्कींच्या ह्या निर्मितीबद्दल लिहिले होते : "ह्या अनाकलनीय रशियात, युद्धग्रस्त, अतिथंड, भुकेल्या, आत्यंतिक हालअपेष्टा भोगणाऱ्या, एक अशी साहित्यिक योजना हाती घेण्यात आली आहे जी आजच्या श्रीमंत इंग्लंडमध्ये आणि श्रीमंत अमेरिकेत-सुद्धा अशक्यप्राय आहे...रशियामध्ये उपासमारीने मरणारे शेकडो लोक अनुवादांचे काम करीत आहेत. त्यांनी भाषांतर केलेली पुस्तके प्रसिद्ध होत आहेत आणि ती पुस्तके नव्या रशियाला जागतिक साहित्याची अशी ओळख करून देतील, जी कुणाही दुसऱ्या राष्ट्रातील लोकांच्या प्राप्तीपलीकडील आहे."[१] गोर्की यांनी वर्णन केलेला माणूस इतिहासाचा एक भाग आहे : लोक ऐतिहासिक विकासामधील एक निर्णायक घटक असतात, पण खुद्द इतिहास नेहमी माणसावर प्रभाव पाडत असतो.

गोर्कींच्या लेखांमधून आणि पत्रांमधून लोक हा विषय नेहमी आढळतो. त्यांच्या अखेरच्या लेखांपैकी एका लेखात त्यांनी उपदेश केला होता : "संस्कृतीचा

१. वेल्स एच्. जी., 'अंधारातील रशिया' मॉस्को, १९५९, पान २९.

इतिहास लिहिताना व्यक्तीच्या भ्रष्टाचाराची, तिच्या मृत्यूकडील वाटचालीची कथा म्हणून लिहावे आणि नव्या जगाच्या उभारणीकारांच्या "एकवटलेल्या शक्ती"च्या ज्वालेत संघटित झालेल्या नव्या व्यक्तीच्या उदयाची कथा म्हणून लिहावे."[१]

३

महान ऑक्टोबर समाजसत्तावादी क्रांतीनंतर मा. गोर्की यांनी केलेले अथक कार्य व त्यांची मोठी प्रतिष्ठा यांच्या जोडीने अ. लूनाचार्स्की यांचा जोमदारपणा व संघटनाकार्य, यामुळे कलात्मक बुद्धिमंतांची विस्तृत वर्तुळे सांस्कृतिक उभारणीच्या कार्यात ओढली गेली. महान कामगारवर्गीय लेखकाच्या ह्या कामगिरीबद्दल रशियन कवी अ. ब्लोक यांनी लिहिले होते : "आपल्या काळातील सर्वांत मोठा कलावंत म्हणून माक्सिम गोर्की यांच्यावर दैवाने फार मोठे ओझे लादले आहे. लोक आणि बुद्धिमंत यांच्या दरम्यान, एकमेकांना अथवा स्वतःला अद्याप न जाणणाऱ्या दोन छावण्यांदरम्यान त्याने त्यांना मध्यस्थ बनविले आहे."[२]

सर्वोत्तम साहित्यिक शक्तींना लिहिण्यातील गोर्कींचा कलात्मक अनुभव आणि त्यांची कार्ये नवजात सोविएत साहित्याच्या दृष्टीने फार महत्त्वाची होती. गोर्कींनी तरुण लेखकांसाठी खूप वेळ खर्च केला व त्यांच्याकडे खूप लक्ष दिले. १९३० पासून 'साहित्यिक शिक्षण' नियतकालिकाचे ते प्रमुख आहेत, 'नव्या लेखकांना पत्रे' ते प्रसिद्ध करीत आहेत, अनेकदा त्यांच्याशी भेटीगाठी घेऊन वार्तालाप करीत आहेत, असंख्य हस्तलिखिते वाचत आहेत. नवशिक्यांच्या पुस्तकांना प्रस्तावना लिहीत आहेत ... आत्मसुधारणेचा कार्यक्रम ते नव्या लेखकांसमोर ठेवत आहेत – 'तंत्राच्या कामगिरी'पासून ते स्थानिक व जागतिक संस्कृतीच्या वारशा-वर आणि मार्क्सवादी-लेनिनवादी जागतिक दृष्टिकोनावर प्रगाढ प्रभुत्व मिळविण्या-पर्यंत. 'पाडाव' आणि 'तरुण रक्षक'चे लेखक अ. फदेयेव यांनी म्हटले होते की, "माझ्या पिढीत साहित्यामध्ये पहिली पावले टाकणाऱ्यांपैकी एकही असा नाही ज्याला त्यांचा आशीर्वाद लाभला नव्हता."[३]

सोविएत साहित्यासमोर गोर्कींनी "एक अत्यंत अवघड कार्य ठेवले होते – वास्तववादी रीतींनी अशी महान कला निर्माण करायची, जिच्यात कामगार-वर्गाच्या, नव्या समाजाच्या उभारणीकाराच्या, शौर्याचे पूर्णत्वाने व आत्यंतिक शाब्दिक प्रभावाने दर्शन घडेल..."[४]

---

१. गोर्की मा., संकलित साहित्य, खंड २५, पान २८३.

२. ब्लोक अ., संकलित संग्रह ८ खंडातील, खंड ६, पान ९२.

३. फदेयेव अ., ७ खंडांमधील संकलित संग्रह, खंड ६, पान ६८.

४. गोर्की मा., संकलित संग्रह, खंड २६, पान २४५.

गोर्की यांच्या साहित्यविषयक असंख्य विधानांमधून आणि भाषणांमधून समाजसत्तावादी कलेची सौंदर्यवादी सार्वत्रिक संकल्पना आकाराला आली. तिला सोविएत साहित्य आणि कलासमीक्षकांनी स्वीकारले.

सोविएत साहित्याच्या अनुभवाचे सार काढताना गोर्कीनी सोविएत कलेच्या प्रभावी स्वरूपावर, तिच्या क्रियाशील मानवतावादावर, जीवनस्थित्यंतराच्या उत्साहावर भर दिला. विमुक्त श्रमाच्या विषयाला गोर्कीनी फार महत्त्व दिले होते. समाजसत्तावादी समाजात विमुक्त श्रमाला सृजनशील स्वरूप लाभते आणि तो संस्कृतीला फुलवतो. कलावंताने जगाकडे एकाच वेळी अनेक नजरांमधून पाहावे असे गोर्कीचे मत होते. मरणोन्मख भूतकाळात व वाढणाऱ्या आणि आकारणाऱ्या भविष्यकाळात वर्तमान परिस्थिती पाहणे. गोर्कीचे हे विचार तिसऱ्या दशकाच्या अखेरीस व चौथ्या दशकाच्या आरंभी चाललेल्या सोविएत सौंदर्यवादी विचाराच्या शोधक्रमात प्राबल्याने होते व त्याची परिणती समाजसत्तावादी वास्तववादाची विचारप्रणाली निर्माण करण्यात झाली.

अनुवादांमार्फत आणि संग्रह प्रसिद्ध करून सोविएत संघातील लोकांच्या साहित्याचा विकास घडविण्यात व त्यांचे ऐक्य निर्माण करण्यात गोर्की यांनी मोठी कामगिरी बजावली. ऑक्टोबर क्रांतीच्या आधीच त्यांनी रशियातील लोकांच्या साहित्याच्या संग्रह-मालिकांचे संयोजन व संपादन केले होते. सोविएत संघातील राष्ट्रीय संस्कृतीच्या फुलव्याचा आरंभ १९२८ मध्ये त्यांनी पुढील शब्दांमध्ये व्यक्त केला होता : " कधीही आणि कुठेही दिसले नव्हते असे काही-तरी रशियात आता घडत आहे ... सोविएतांच्या संघामधील सर्व वंशांच्या लोकांना स्वतःच्या भाषेत बोलण्याचा हक्क लाभला आहे, स्वतःच्या कुवतींचा विकास घडवण्यासाठी मुक्तपणे काम करण्याचा हक्क लाभला आहे."[१] " सर्व वंशांच्या वैयक्तिक वैशिष्टयांना पुसून न टाकता, सबंध जगाचे सामाजिक, प्रभावी-पुनरुज्जीवन घडविणाऱ्या, संयुक्त समाजसत्तावादी संस्कृतीच्या उभारणीची प्रक्रिया "[२] गोर्कींना ठळकपणे दिसली. ही प्रक्रिया ऐतिहासिकदृष्टया अभूतपूर्व आणि प्रभावी होती. सोविएत प्रजासत्ताकांचे बहुभाषिक साहित्य विषयामध्ये, सामाजिक आदर्शामध्ये, कम्युनिस्ट उद्दिष्टे आणि आकांक्षांमध्ये समान आहे, पण त्यांची सौंदर्यवादी वैशिष्टये व त्यांच्या शक्यता भिन्न आहेत. राष्ट्रीय कार्यांची सामाजिक उद्दिष्टांशी आणि विचारांशी सांगड, राष्ट्रीय कला-प्रकारांची भिन्नता

१. सोविएत बहुराष्ट्रिक साहित्याचा इतिहास, खंड १, मॉस्को, १९७० पान २२.

२. गोर्की मा., संकलित साहित्य, खंड ३०, पाने ३६५–३६६.

व वास्तवावर प्रभुत्व मिळविण्याच्या रीती, परस्पर-उठाव आणि परस्पर-समृद्धी ह्या मार्गाने सोविएत बहुभाषिक साहित्य जात होते आणि आता जात आहे. आणि गोर्की ह्या मार्गाच्या अगदी आरंभी उभे होते.

गोर्की यांच्या संपूर्ण विचारधारेत कार्याचा विचार बहुधा सर्वात महत्वाची भूमिका बजावतो. जीवनाबद्दल क्रियाशील दृष्टिकोनाला उत्तेजन देणे हे आपले साहित्यामधील मुख्य कार्य आहे, अशा आशयाची गोर्कींनी वारंवार केलेली विधाने सर्वश्रुत आहेत. कृतिशीलतेची, ऐतिहासिक सृजनाची त्यांची आवेगपूर्ण आवाहने ऐतिहासिक सुस्ती, निष्क्रियता आणि सामाजिक दैववाद यांच्या कोणत्याही संकल्पनेविरुद्धच्या त्यांच्या आवेगी आवाहनांच्या जोडीची आहेत. माणसाला "नम्र वास्तवाच्या शृंखलां"मधून मुक्त करणे, परिस्थितीचा गुलाम बनलेल्या-समोर जीवनाच्या मुक्त निर्मात्याला उभा करणे, गोर्कींच्या साहित्यिक कार्याचे, त्यांच्या मानवतावादाचे सार होते, भूतकालीन कलेतील "दयेच्या मानवतावादा"शी लेखकाने लढा केला पाहिजे ह्या गोर्कींच्या संकल्पनेवर व "सर्व काही माणसात आहे, सर्व काही माणसासाठी आहे!" ह्या गोर्कींच्या विधानाच्या आशयावर त्यामुळे प्रकाश पडतो.

मा. गोर्की यांचे सार्वजनिक जीवन ह्या कार्याने पूर्णतया व्यापून गेलेले होते. त्यांच्या क्रांतिकारक कार्यांचा व क्रांतीनंतरच्या तातडीच्या काळातील देशामधील सांस्कृतिक जीवनातील त्यांच्या क्रियाशील सहभागाचा निर्देश आम्ही आधीच केला आहे. १९३० नंतरच्या काळात त्यांच्या पुढाकाराने आणि त्यांच्या संपादकत्वाखाली 'आमच्या यश:सिद्धी', 'उभारणीस्थळावरील सोविएत संघ', 'साहित्यिक अभ्यास', 'विदेशी' ही नियतकालिके आणि 'मोठ्या माणसांची चरित्रे' ही माला प्रसिद्ध झाली. गोर्की यांच्या पुढाकारामुळे 'यादवी युद्धाचा इतिहास'चे प्रकाशन सुरू झाले आणि 'कवीचे ग्रंथालय' शीर्षकाखाली रशियन कवितेच्या इतिहासावरील पुस्तकमाला प्रसिद्ध होऊ लागली.

सोविएत उभारणीचे विविध पैलू, शांततेचे, लोकशाहीचे आणि समाजसत्ता-वादाचे रक्षण ह्या विषयांवरील व नव्या युद्धाची पूर्वतयारी करीत असलेल्या साम्राज्यवाद्यांविरुद्धची गोर्की यांची असंख्य सामाजिक आणि राजकीय भाषणे फार महत्त्वाची होती. आंतरराष्ट्रीय युद्धविरोधी काँग्रेसांची अधिवेशने आयोजित करण्यात लेखकाने मदत केली. स्वत:च्या पत्रांमार्फत, भाषणांमार्फत आणि लेखां-मार्फत त्यांनी फॅसिझमविरोधी व शांततेसाठी चाललेल्या लढ्यात पुरोगामी परदेशी लेखकांना, शास्त्रज्ञांना व सांस्कृतिक कार्यकर्त्यांना सहभागी करण्याची मोठी कामगिरी बजावली. सबंध जगातील बुद्धिमंतांना उद्देशून त्यांनी लिहिलेल्या लेखांमधून ('मानवतावाद्यांना', '"संस्कृतीच्या मिरासदारांनो," तुम्ही कोणाबरोबर

आहात ?') ज्यांना लढ्यापासून अलग राहायचे होते अशांच्या दांभिक मानवतावादाला गोर्कीनी उघडकीस आणले; वाईट गोष्टी, शोषण आणि गुलामगिरीविरुद्ध सक्रिय लढ्याचे आवाहन देणाऱ्या कामगारवर्गीय समाजसत्तावादी मानवतावादाच्या वचारांचा त्यांनी पुरस्कार केला.

ह्या महान कामगारवर्गीय लेखकाने, सोविएत साहित्याच्या संस्थापकाने मांडलेल्या मुख्य सैद्धांतिक तत्त्वांना आणि विचारांना नुसते दाखवून देणे एका छोट्या प्रास्ताविक लेखात अशक्य आहे, हे सांगण्याची जरुरी नाही.

पण आम्हाला खात्री आहे की, प्रस्तुत संग्रहातील लेखांमुळे मार्क्सवादी-लेनिनवादी सौंदर्यशास्त्रविषयक मुख्य समस्यांचे व सोविएत साहित्य आणि कला यांचा विकास ज्यांच्यावर आधारित आहे अशा तत्त्वांचे अधिक चांगले आकलन होण्यास वाचकाला मदत होईल.

लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची आणि त्याच्या समकालीनांबरोबरील त्याच्या संबंधांच्या स्वरूपाची अधिक स्पष्ट कल्पना येण्यासही हे लेख वाचकाला साहाय्यभूत ठरतील.

— अ. येर्माकोव

संस्कृती

कामगारवर्गाने संस्कृतीसंबंधी पुढील दृष्टिकोन स्वीकारणे इष्ट ठरेल असे मला वाटते.

ज्या सर्व गोष्टींना संस्कृती म्हटले जाते त्या आत्मरक्षणाच्या अंतःप्रेरणेतून उद्भवल्या आहेत. सावत्र मातेसमान असलेल्या निसर्गाविरुद्ध संघर्ष करताना मानवाने ह्या गोष्टींना स्वतःच्या श्रमांमधून निर्माण केले आहे. स्वतःच्या इच्छेच्या आणि मनाच्या बळावर " दुसरा निसर्ग " निर्माण करण्याच्या मानवाच्या प्रयत्नांची फलश्रुती म्हणजे संस्कृती.

पहिला निसर्ग म्हणजे असंघटित, प्राथमिक शक्तींचा गोंधळ. भूकंप, महापूर, वादळे, दुष्काळ, असह्य थंडी अथवा उष्णता ह्या त्याच्या करामती. रोगट अतिसूक्ष्म जीव निर्माण करण्यात – मानवाच्या रक्तामध्ये विषमज्वर, ज्वर व तत्सम विषांना भिनवणारे डास, माशा, उवा ह्यांसारखे अत्यंत अपायकारक कीटक, सूक्ष्म जंतू – पहिला निसर्ग आपले सामर्थ्य खर्च करतो. अपायकारक अथवा निरुपयोगी अशा असंख्य वनस्पतींना आणि गवतांना तो निर्माण करतो. माणसाला खाऊ घालणाऱ्या धान्यांच्या आणि फळांच्या पैदाशीसाठी आवश्यक असणाऱ्या आरोग्यदायी जीवनरसांना परपुष्ट बांडगुळांच्या पुनरुत्पादनात वाया घालवतो. एखाद्याला असे वाटेल की, माणसासाठी उपयुक्त ठरणारी आणि आता आपण ज्यांच्यावर उदरनिर्वाह करतो ती धान्ये निसर्गाने कधी निर्माणच केली नाहीत. प्रदीर्घ यातना आणि अनेक लोकांचे मृत्यू सोसून आरंभीची माणसे हळूहळू खाद्य-पदार्थांना सरावत होती. युरोपीय लोकांनी प्रथम बटाटे खायला सुरुवात केली तेव्हा त्यांना गंभीर आजार सोसावे लागले होते, ही वस्तुस्थिती आहे. आणि असे केवळ बटाट्यांबाबतच घडले नाही. मानवाला अपायकारक अथवा निरुपयोगी अशा परपुष्ट जीवांच्या घाणीबरोबरच निसर्गाने मानवालाही निर्माण केले, पण इतर पशूंप्रमाणे त्यालाही पशू बनविले.

ह्या पशू शारीरिक वेदना सहन करण्याबाबत जरा अधिक संवेदनाक्षम ठरला

व म्हणून इतर सर्व प्राण्यांपेक्षा आत्मरक्षणाची क्षमता त्याने अधिक लवकर, तीव्रतेने आणि विविधपणे आत्मसात केली. आत्मरक्षणाच्या अंत:प्रेरणेने त्याला वनस्पतींमधून आणि गवतांमधून उपयुक्त धान्ये, फळे व मुळया शोधायला शिकविले; जनावरे पाळायला, जनावरांच्या कातडयांची वस्त्रे ल्यायला, गुंफांमध्ये राहायला शिकविले; शिकारीची अस्त्रे शोधायला, आत्मरक्षणासाठी शस्त्रे बनवायला आणि श्रम हलके करण्यासाठी दगडी उपकरणे बनवायला शिकविले.

निरीक्षण आणि अभ्यास यांच्यामधून साध्य झालेल्या छोटया आणि अगदी साध्या सत्यांमधून सर्व व प्रत्येक शहाणपण तयार झाले आहे. पण जीवनाच्या प्रखर संघर्षात आणि जीवनाच्या धास्तीमुळे, "स्वत:च्या व्यक्तिमत्त्वासाठी," माणसाच्या आत्मरक्षणाच्या अंत:प्रेरणेने त्याला "लबाडीचा तात्त्विकपणा" करायला शिकविले. म्हणून लोकांनी धूर्त शब्दांचा कचरा आणि धूळ यांची उधळण करून साध्या सत्याचा प्रकाश मंदावून टाकला. त्यामुळे सत्यावरील अडयळा दूर करण्याची, सर्व सत्ये आणि प्रत्येक सत्य कसे उदयाला आले ह्याची आठवण करून देण्याची, आवश्यकता निर्माण होते.

मानवी संस्कृती जीवशास्त्रीय परिस्थिती आहे. माणसाच्या जीवनाच्या इच्छे-वर – वनस्पती, कीटक, पक्षी आणि प्राणी अशा सर्व सजीवांचे वैशिष्टय असलेली आंधळी इच्छा – ती व्यक्त होते, जोपासली जाते आणि विचार करते. इतर प्राण्यां-पेक्षा आपण अधिक दुबळे आहोत असे माणसाच्या ज्या क्षणी लक्षात आले, त्या क्षणापासून त्याने स्वत:ची संस्कृती निर्माण आरंभ केला. ह्या दुबळेपणाच्या जाणीवेपायी त्याची आत्मरक्षणाची अंत:प्रेरणा अधिक वेगाने व यशस्वीरीत्या विकसित झाली. आत्मरक्षणाच्या अंत:प्रेरणेच्या आधारावरच अत्यंत मौल्यवान अशी मानवी क्षमता – निरीक्षणाची क्षमता – विकसित झाली आहे. मुंगी, कावळा, वाघ ह्यांनाही अशी क्षमता आहे; पण मानवाने निरीक्षण आणि तुलना करता करता त्या क्षमतेचा आणखी विकास घडविला. जीवनाच्या सर्व अंगांचे ज्ञान करून घेण्याच्या प्रयत्नांमध्ये तिचे रूपांतर केले. नंतर त्या ज्ञानाने ठोस शास्त्रांची शिखरे गाठली आणि सध्या हळूहळू त्याचे अंत:प्रेरणेमध्ये रूपांतर होत आहे. माणसाच्या स्पष्टो-च्चारी बोलण्याप्रमाणे अथवा हसण्याप्रमाणे त्याच्या जीवशास्त्रीय जैविक वैशिष्टयात ज्ञानाचे रूपांतर घडत आहे.

पूर्वी म्हणत असत : "प्रेम आणि भूक जगावर सत्ता गाजवतात" "प्रेम" ह्याचा अर्थ होता प्रजोत्पादनाची धडपड; "भूक" म्हणजे शारीरिक भूक, पण आजकाल आपल्याला तिसऱ्या अंत:प्रेरणेबाबत बोलण्याचा हक्क आहे – अभिज्ञेची अंत:प्रेरणा, बौद्धिक भूक.

आशयानुसार आणि निष्पत्तींनुसार निरीक्षण करणे हे माणसाचे सर्वप्रमुख

अस्त्र. निसर्गविरोधी संघर्षातील आत्मरक्षणाचा खात्रीशीर उपाय. त्याच्या सांस्कृतिक वाढीचा मुख्य पाया.

अग्नी ऊब देतो त्याचा उपयोग समजणे सोपे होते. पण अग्नी मिळवायचा कसा हे शिकणे त्याहून खूप अवघड. लाकडावर लाकूड घासूनसुद्धा ऊब मिळते हे ध्यानात आल्यावर अग्नी प्राप्त करायला माणूस शिकला. तेव्हा घर्षणामधून अग्नी मिळविण्यास त्याने आरंभ केला. काडी पेटविण्यासाठी अगदी आजपर्यंत तो ह्या रीतीचा वापर करीत आहे. दिव्याचा, त्यावेळी तेलाच्या दिव्याचा, शोध कसा लागला ? ठार मारलेल्या जनावराची कातडी माणूस सोलून काढीत होता तेव्हा अंधार पडला. मांसात जेथे खूप चरबी होती तेथे त्याने लाकडाचा एक ढलपा खुपसला. नंतर त्याच्या ध्यानात आले की, उबदार, वितळलेली चरबी लाकडाने शोषून घेतल्यानंतर ते अधिक तेजस्वीपणे आणि मंदपणे जळते. हजारो वर्षेपर्यंत माणूस असा दिवा वापरीत होता आणि आता विजेचा वापर चालू असतानाही ह्या दिव्याचा तो उपयोग करतो.

पाण्यामध्ये फळाची कठीण कवची अथवा अंड्याचे टरफल तरंगताना पाहून माणसाने होडीचा शोध लावला. पुढे त्याने पाण्यावर संचार करणाऱ्या लोखंड आणि पोलादाच्या महाप्रचंड बोटींचा वापर सुरू केला. वादळात उन्मळून पडणाऱ्या झाडांच्या मुळांबरोबर मातीची ढेकळे आणि दगडही उखडले जातात हे पाहून त्याला तरफेचा अर्थ समजला. तरफ म्हणजे भावी यंत्रांचा आधार. कोळी जाळे विणताना पाहून माणूस विणकाम शिकला. शक्यता आहे की, काही पक्षी पानांना शिवून घरटी बांधतात ह्याचे निरीक्षण केल्यानंतर, थंडी निवारण्यासाठी प्राण्यांच्या कातड्यांची वस्त्रे शिवायला माणूस शिकला. प्रत्येक गोष्टीचा अशा पद्धतीने शोध लावून माणूस आज माणूस असा बलाढ्य शस्त्रसज्ज बनला आहे.

विज्ञान म्हणजे संस्कृतीचा पाया; " दुसरा निसर्ग " निर्माण करणारी मुख्य शक्ती – म्हणजे संस्कृती.

माझ्या मते, धर्म आणि तार्किक तत्त्वज्ञान कलेच्या मालकीची असावीत; स्वतःच्या अनुभव, भावना आणि स्वप्नांना प्रतिमारूप देण्याच्या, स्वतःच्या ठशांना विचारामध्ये सूत्रबद्ध करण्याच्या माणसाच्या क्षमतेच्या मालकीची असावीत. स्वतःच्या सर्वोत्तम आकांक्षा, सर्वशक्तिमानतेची आणि सर्वज्ञतेची स्वतःची स्वप्ने, विरोधी नैसर्गिक पंचमहाभूतांवर मात करण्याचे स्वतःचे प्रयत्न – अशा सर्व गोष्टींना माणसाने देवामध्ये एकवटले. संस्कृतीच्या प्रतिमांमध्ये आदिमानवांनी आपले देव निर्माण केले होते, ह्या विधानाला आपल्याशी भरपूर आधार आहेत : ओहार – व्हुल्कन, तोर, गृहिणी – गेबा, फ्रेया, शिकारी, एक खलाशी इ.

मानवी बुद्धी, कल्पना आणि निर्धार ह्यांच्या शक्तींनी जगातील प्रत्येक

गोष्ट निर्माण केली आहे व संस्कृती निर्माण करणाऱ्या दुसऱ्या इतर शक्ती नाहीत ही मनोधारणा कामगारवर्गाला अत्यंत निकटची आणि आकलनीय वाटली पाहिजे.

भाजलेल्या मातीच्या खरबरीत तुकड्यांमधून – विटांमधून – भव्य इमारतींची, "संस्कृतीच्या प्रासादांची", शहरांची कामगार उभारणी करतो. "पहिल्या निसर्गात" कधीही अस्तित्वात नसलेली प्रत्येक गोष्ट तो निर्माण करतो – घड्याळे, रेल्वे पूल, शल्यविशारदाची उपकरणे, अंतर्गत ज्वलनाची इंजिने, छपाईयंत्रे इ. गोष्टी कच्च्या धातूच्या आकारहीन तुकड्यांमधून तो निर्माण करतो. स्वतःच्या बुद्धीच्या जोरावर लोखंडाला आणि पोलादाला आत्मा प्राप्त करून देतो.

"पहिल्या निसर्गा"मध्ये अस्तित्वात असलेल्या प्रत्येक गोष्टीचे निरीक्षण आणि अभ्यास करून, पहिल्याच्या शक्तींच्या जोरावर दुसरा निसर्ग निर्माण करण्यास शास्त्रज्ञ माणसाला शिकवितो. माणसाच्या आरोग्याची तो काळजी घेतो, त्याची आयुर्मर्यादा वाढवायचा तो प्रयत्न करतो. माणसांच्या अंतरंगांच्या जगाचे निरीक्षण करून, त्यांच्या मनोरचनांचा अभ्यास करून, कलाकार माणसाला त्याचे भव्यपण आणि त्याची क्षुद्रता दाखवितो. माणसाच्या बुद्धीची ताकद आणि त्याच्यातील पाशवी अंतःप्रेरणांची शक्ती यांचे दर्शन घडवितो.

तीन माणसे संस्कृती घडवितात : शास्त्रज्ञ, कलाकार आणि कामगार. आपल्या सोविएत पुरोगामी कामकारीवर्गाने जाणून घेतले पाहिजे की, कोणतेही सांस्कृतिक महत्त्व नसलेले असे श्रम अस्तित्वात नाहीत; श्रमांबद्दल जेवढे अधिक प्रेम, तेवढी संस्कृती अधिक उच्च; जर विज्ञान, कला, श्रम ह्यांचे निर्णायक महत्त्व कामगारवर्गाला चांगले समजले, तर जुन्या जगावर तो संपूर्ण विजय अधिक लवकर मिळवू शकेल.

मला वाटते की, संस्कृतीकडील अशा दृष्टिकोनाच्या तळाशी नवी नीतिमत्ता सामावली आहे. कामगारामध्ये जुन्या जगाचा लाजिरवाणा वारसा म्हणून वास करणाऱ्या प्रत्येक गोष्टीविरुद्ध चिकाटीने लढायला ह्या नव्या नीतिमत्तेने कामगाराला शस्त्रसज्ज केले पाहिजे. आळशीपणा, मद्यपान, निष्ठुरता ह्यांच्याविरुद्ध लढायला शस्त्रसज्ज केले पाहिजे; त्याच्या वर्गाच्या थोर, शौर्यशाली कार्याशी विसंगत अशा रीतीने क्षुद्रप्रवृत्तीप्रमाणे निवांत बस्तान बसविण्याच्या त्याच्या इच्छेविरुद्ध लढायला त्याला शस्त्रसज्ज केले पाहिजे.

१९२८ □

"संस्कृतीच्या मिरासदारांनो", तुम्ही कोणाबरोबर आहात?

अमेरिकन वार्ताहरांना उत्तर

तुम्ही लिहिता : "तुम्हाला अपरिचित अशा महासागरापलीकडील लोकांकडून ह्या संदेश आलेला पाहून कदाचित तुम्हाला आश्चर्य वाटेल."

नाही, तुमच्या पत्राचे मला आश्चर्य वाटले नाही. अशी पत्रे मला वारंवार मिळतात. आणि "अस्सल" म्हणून त्याचा तुम्ही संदर्भ देता तो चुकीचा आहे. गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये बुद्धिजीवींकडून धोक्याबद्दलच्या आरोळ्या उमटणे सर्वसामान्य बाब बनली आहे. हे अगदी स्वाभाविक आहे : भांडवलदारवर्गाच्या अस्तित्वाला शोभा देणे, श्रीमंतांचे त्यांच्या ग्राम्य आपत्तींच्या क्षणी सांत्वन करणे, हेच बुद्धिजीवी माणसाचे प्रत्यक्षात नेहमी काम होते. बहुसंख्य बुद्धिजीवी भांडवलदारांचे नोकर होते. फार पूर्वीपासून मळलेल्या आणि लक्तरे बनलेल्या, कामकरी जनतेच्या रक्ताचे भरपूर डाग पडलेल्या, भांडवलदारवर्गाच्या तात्त्विक आणि धार्मिक वस्त्रांना पांढऱ्या दोऱ्याने ठिगळे लावण्याचे काम हे बुद्धिजीवी लोक दक्षपणे करीत होते. अगदी आजही त्यांनी हे अवघड, पण फारसे कौतुकास्पद नसलेले आणि पूर्णतया वांझ असे काम चालू ठेवले आहे. जवळजवळ भविष्यसूचक पूर्वज्ञान ते उघडकीला आणीत आहेत. उदाहरणार्थ, जपानी साम्राज्यवाद्यांनी चीनचे तुकडे तुकडे करण्याच्या खूप आधी, जर्मन स्पेंगलर यांनी आपल्या 'मानव आणि तंत्र' नामक पुस्तकात विचार व्यक्त केला होता की, 'वर्णीय वंशांना' आपले ज्ञान आणि तांत्रिक अनुभव यांचा लाभ देऊन १९ व्या शतकातील युरोपीय लोकांनी अत्यंत गंभीर घोटाळा केला होता. स्पेंगलरच्या ह्या दृष्टिकोनाला तुमचे अमेरिकन इतिहासकार हेन्ड्रिक व्हॅन लॉन यांनी पाठिंबा दिला आहे. त्यांचे असेही मत आहे की, काळ्या आणि पिवळ्या लोकांना युरोपीय संस्कृतीच्या अनुभवाने सुसज्ज बनविणे म्हणजे युरोपीय भांडवलदारवर्गाच्या "सात घातक ऐतिहासिक चुकां"-पैकी एक चूक होती.

आणि आता ही चूक सुधारण्याची इच्छा आपल्याला दिसते. युरोपीय आणि अमेरिकन भांडवलदार जपानला व चीनला पैसे आणि अस्त्रे पुरवितात, एकमेकांचा नाश करायला त्यांना मदत करतात आणि त्याचवेळी पूर्वेला स्वतःचे काफिले धाडतात. म्हणजे सोयीस्कर क्षणी जपानी साम्राज्यवादाला त्यांची बलाढ्य शस्त्रसज्ज मूठ दाखविता यावी आणि ठार मारलेल्या अस्वलाच्या कातड्याचा वाटा घेण्यासाठी शूर सशाबरोबर पुढे जाता यावे. वैयक्तिकरीत्या मला वाटते की, अस्वलाचा वध होणार नाही. याचे कारण स्पेंगलर, व्हॅन लोन मंडळी आणि युरोपीय-अमेरिकन "संस्कृतीला" धास्तावणाऱ्या धोक्यांबाबत विस्तारपूर्वक बडबड करणारे भांडवलदारवर्गाचे तत्सम समर्थक एक-दोन गोष्टी नमूद करायला विसरले आहेत. ते विसरले आहेत की, हिंदुस्थानी, चिनी, जपानी, निग्रो सामाजिकदृष्टचा अखंड आणि एकजातीय नाहीत, तर त्यांचे वर्गांमध्ये विभाजन घडलेले आहे. ते विसरले आहेत की, युरोपीय आणि अमेरिकन क्षुद्रबुद्धींच्या, स्वार्थी विचारांच्या विषाविरुद्ध मार्क्स आणि लेनिन यांच्या शिकवणींचा उतारा विवेचित केलेला आहे आणि त्याचा फार निकोप परिणाम घडत आहे. मात्र अशी शक्यता आहे की, प्रत्यक्षात ते हे विसरलेले नाहीत, पण चतुराईने त्याबद्दल मौन पाळत आहेत. आणि विष निष्प्रभ असल्याची व उतारा प्रभावी असल्याची त्यांना जाणीव झाल्यामुळे, युरोपीय संस्कृतीच्या अधःपाताविषयीच्या धोक्याचे इशारे देणाऱ्या आरोळ्या ते ठोकत आहेत.

संस्कृती नाश पावते आहे असा आक्रोश करणाऱ्यांची संख्या सतत वाढत आहे आणि त्यांचा आक्रोश अधिक मोठ्यांदा होत आहे. सुमारे तीन महिन्यांपूर्वी, फ्रान्सचे माजी मंत्री कायो यांनी संस्कृतीच्या असुरक्षिततेबद्दल जाहीररीत्या शोक केला.

"जग" ते ओरडून म्हणाले, "विपुलतेच्या आणि अविश्वासाच्या शोकांतिका अनुभवत आहे. दशलक्षावधी लोकांना पुरेसे खायला नसताना, गहू जाळला जातो आणि कॉफीच्या पिशव्या समुद्रात फेकण्यात येतात, ही शोकांतिका नव्हे काय ? आणि अविश्वासाबद्दल बोलायचे, तर त्याने एव्हाना नुकसान केले आहे. त्याने युद्ध घडवले आणि शांतता तह करायला लावले. जेव्हा अविश्वास नाहीसा होईल तेव्हाच त्या तहांना मंजुरी मिळेल. जर विश्वासाची पुनःस्थापना झाली नाही, तर सर्व संस्कृतीला धोका उत्पन्न होईल, कारण स्वतःच्या सर्व आपत्तींना जी कारणीभूत आहे असे लोकांना वाटते, ती अर्थव्यवस्था उलथून टाकण्याचा लोकांना मोह होईल."

आज एवढ्या उघडपणे एकमेकांना नख्या काढून व सुळे विचकून दाखविणाऱ्या लुटारूंमध्ये परस्पर-विश्वासाच्या शक्यतेची भाषा करणारा एक तर

बिलंदर ढोंगी असला पाहिजे, अथवा कमालीचा भाबडा असला पाहिजे. आणि जर " लोकां "मार्फत ह्याचा अर्थ कामकरी लोक असा असेल, तर प्रत्येक प्रामाणिक माणसाने कबूल केले पाहिजे की, भांडवलदारी व्यवस्थेचा वेडपटपणा आपल्या आपत्तींना "जबाबदार" आहे हा कामगारांचा दावा अगदी बरोबर आहे. कारण कामगारांच्या संपत्ती निर्माण करणाऱ्या श्रमाला मोबदला म्हणून भांडवलदारी व्यवस्था कामगारांवर आपत्ती लादते. मार्क्स आणि एंगल्स यांनी आपल्या 'कम्युनिस्ट जाहीरनामा'मध्ये भांडवलदारी वास्तवतांविषयी काढलेले उद्‌गार कमालीचे खरे ठरत आहेत, ह्याची कामगारवर्गीयांना अधिकाधिक स्पष्टपणे जाणीव होत आहे :

" भांडवलदारवर्ग सत्ता गाजविण्यास अयोग्य आहे, कारण गुलामाला त्याच्या गुलामगिरीत अस्तित्वाची खात्री देण्यास तो असमर्थ आहे, कारण अशा राज्यात त्याला बुडू न देण्यास तो मदत करू शकत नाही, त्याच्याकडून खाऊ घातले जाण्याऐवजी त्याला त्याने खाऊ घातले पाहिजे. ह्या भांडवलदारवर्गाखाली समाज इतःपर राहू शकत नाही; दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, त्याचे अस्तित्व इतःपर समाजाबरोबर सुसंगत नाही."

कायो हे शेकडो जुन्या लोकांपैकी असे एक आहेत, ज्यांचा अद्यापि विश्वास आहे की, त्यांचा भांडवलदारी वेडपटपणा म्हणजे माणसाला सदैव मिळालेली शहाणपणाची देणगी आहे, अधिक चांगला शोध तो कधीही लावणार नाही, त्यापलीकडे कधीही जाणार नाही. अधिक वरच्या शिखरांवर कधीही चढणार नाही. आणि अगदी अलीकडेच, स्वतःच्या आर्थिक शहाणपणाचा व त्याच्या स्थैर्याचा पुरावा म्हणून भांडवलदारवर्गाच्या समर्थकांनी त्यांच्या शास्त्राचे उदाहरण दिले.

आता त्यांच्या दुष्ट खेळामधून ते शास्त्राला वगळतात. २३ फेब्रुवारी रोजी, ह्याच कायो महाशयांनी पॅरिसमध्ये माजी मंत्र्यांच्या श्रोतृसमुदायासमोर – ज्यात पावेल मिल्यूकोव आणि एकूण "आहेरे" होते – बोलताना श्पेंगलरची री ओढत म्हटले :

" तंत्रशास्त्र अनेक बाबतीत बेकारी वाढवते, कामावरून कमी केलेल्या कामगारांच्या वेतनांचे भागधारकांच्या जादा नफ्यांमध्ये रूपांतर करते. " सदसद्विवेकबुद्धिरहित " शास्त्र, " सदसद्विवेकबुद्धी "ने ऊब न दिलेले शास्त्र, माणसाच्या विरोधी कार्य करते. माणसाने शास्त्राला वाकविले पाहिजे. सध्याचे अरिष्ट म्हणजे मानवी बुद्धीचा पराभव आहे. काही वेळा थोर माणसाएवढे शास्त्राच्या दृष्टीने अधिक मोठे दुर्दैव नसते. हा थोर माणूस एका विशिष्ट वेळी तात्त्विक सिद्धांत मांडतो तेव्हा त्यांना अर्थ आणि महत्त्व असते. उदाहरणार्थ, कार्ल मार्क्स. त्यांचे सिद्धांत १८४८ मध्ये अथवा १८७० मध्ये बरोबर होते, पण

१९३२ मध्ये अगदी चुकीचे आहेत. जर मार्क्स आज ह्यात असते, तर त्यांनी जसे लिहिले होते तसे आज लिहिले नसते."

ह्या शब्दांमधून भांडवलदार कबूल करतो की, त्याच्या वर्गाची बुद्धिमत्ता कोलमडली आहे आणि तिचे दिवाळे वाजले आहे. "शास्त्राला वाकवा" अशी तो शिफारस करतो; पण ह्याच शास्त्राने त्याच्या वर्गाला श्रमिक जगावर सत्ता दृढ करण्यास केवढे सामर्थ्य दिले होते, ह्याचा त्याला विसर पडला आहे. "शास्त्राला वाकवायचे" म्हणजे काय? संशोधनाचे स्वातंत्र्य त्याला नाकारायचे? शास्त्राच्या स्वातंत्र्यावर चर्चने चढविलेल्या हल्ल्यांना एकेकाळी भांडवलदारवर्गाने अत्यंत शौर्याने व प्रभावीपणे प्रतिकार केले होते. मध्ययुगातील अत्यंत काळोख्या कालखंडाप्रमाणे आजचे भांडवलदारी तत्त्वज्ञान हळूहळू माघारी जात आहे – धर्मशास्त्राचे चाकर बनत आहे. रानटी अवस्थेकडे परत जाण्याचा युरोपला धोका निर्माण झाला आहे असे कायो म्हणतात ते अगदी बरोबर आहे. मार्क्स ह्यांची शिकवण त्यांना माहीत नाही, तरीही ह्या बाबतीत ते मार्क्स यांच्या भाकिताचा पुनरुच्चार करतात. होय, ही गोष्ट अजिबात नाकारता येत नाही की, जगाची मालकीण असलेल्या युरोपचा आणि अमेरिकेचा भांडवलदार, दर वर्षागणिक अधिक अडाणी बनतो आहे, बौद्धिकदृष्टया क्षीण होत आहे आणि रानटी बनतो आहे व ह्याची त्यांना स्वतःला – तुमच्याप्रमाणे – जाणीव होत आहे.

रानटी अवस्थेकडे परतण्याची शक्यता ही कल्पना आजकालच्या भांडवलदारांमध्ये सर्वात "फॅशनेबल" समजली जाते. स्पेंगलर, कायो आणि तत्सम "तत्त्वज्ञ" हजारो क्षुद्रबुद्धींच्या मनःस्थितीचे दर्शन घडवतात. स्वतःचा वर्ग नाश पावणार आहे ह्याची त्यांना आगाऊ कल्पना आल्यामुळे ही धास्तावलेली मनःस्थिती निर्माण झाली आहे. सबंध जगभरच्या कामकरी समूहांमध्ये स्वतःच्या उद्दिष्टाच्या न्याय्यपणाची क्रांतिकारक जाणीव वाढत आहे, ही वस्तुस्थिती तिला कारणीभूत आहे. कामकरी लोकांच्या क्रांतिकारक सांस्कृतिक विकासावर विश्वास न ठेवणे भांडवलदारांना इष्ट वाटेल, पण त्यांना तो विकास प्रत्यक्ष दिसतो – जाणवतो. ही सर्वस्पर्शी प्रक्रिया आहे आणि उत्कृष्टरीत्या न्याय्य ठरली आहे. मानवजातीच्या संपूर्ण श्रमिक अनुभवाचा–ज्याच्याबद्दल भांडवलदारी इतिहासकार मोठ्या बोधपर शिकवणीने सांगतात – तो तार्किक आणि अपरिहार्य विकास आहे. पण इतिहाससुद्धा एक शास्त्र आहे, म्हणून त्यालाही "वाकवले" पाहिजे. अथवा त्याहून सोपे म्हणजे त्याचे अस्तित्वच विसरून जावे. फ्रेंच कवी आणि अकादमीशिअन पॉल वालेरी यांनी 'सद्यःकालीन जगाचा आढावा' नामक स्वतःच्या पुस्तकात हा सल्ला दिला आहे. त्यांना इतिहास विसरून जायची इच्छा आहे. राष्ट्रांवरील आपत्तींना इतिहास जबाबदार आहे, असे त्यांना गंभीरपणे वाटते. ते म्हणतात की,

भूतकाळाची आठवण करून देऊन इतिहास निष्फळ स्वप्नांना जन्म देतो व लोकांचे मनःस्वास्थ्य नष्ट करतो. अर्थात लोक म्हणजे भांडवलदार असे त्यांना अभिप्रेत आहे. वालेरी यांना बहुधा पृथ्वीवर दुसरी कुठली माणसे दिसू शकत नाहीत. अगदी अलीकडेपर्यंत भांडवलदारांना ज्या इतिहासाचा अत्यंत अभिमान होता व ज्याला त्यांनी एवढ्या आत्मीयत्तेने लिहिले होते, त्या इतिहासाबद्दल वालेरी म्हणतात :

"आपल्या बुद्धिमत्तेच्या रासायनिक प्रयोगशाळेत निर्माण केलेल्या सर्व उत्पादनांमध्ये इतिहास सर्वात धोकादायी वस्तू आहे. इतिहास स्वप्नांना उत्तेजन देतो, राष्ट्रांना झिंग आणतो, त्यांच्यात खोट्या आठवणी जाग्या करतो, त्यांच्या अंतर्मुख विचारांना अतिरेकी बनवतो, त्यांच्या जुन्या जखमांना चिघळवतो, त्यांची मनःशांती ढळवतो आणि त्यांना उन्माद चढवतो – गौरवोन्माद अथवा छळाचा उन्माद !"

समर्थक ह्या नात्याने ते खूप जहाल आहेत असे तुम्हाला दिसते. भांडवलदार वर्गाला निवांत जगण्याची इच्छा आहे आणि स्वतःला निवांत जगता यावे म्हणून दशलक्षावधी लोकांचा नाश करण्याचा आपल्याला हक्क आहे, अशी त्याची समजूत आहे. अर्थात तो दशलक्षावधी पुस्तकांचाही नाश करू शकेल, कारण पृथ्वीवरील इतर प्रत्येक गोष्टीप्रमाणे, ग्रंथालयेसुद्धा त्याच्या ताब्यात आहेत. निवांत जगण्याला इतिहास मनाई करतो का ? तर मग त्या इतिहासाचा नायनाट करा ! इतिहासावरील सर्व पुस्तके प्रसारातून काढून घ्या ! शाळांमध्ये इतिहास शिकवू नका ! भूतकाळाचा अभ्यास सामाजिकदृष्टया धोक्याचा आहे आणि तसा अभ्यास करणे गुन्हा आहे, असे घोषित करा ! ऐतिहासिक संशोधनाकडे कल असलेल्या लोकांना अपवादक म्हणून जाहीर करा आणि निर्जन बेटांवर त्यांची रवानगी करा !

निवांतपणा मुख्य बाब आहे ! आणि भांडवलदारवर्गाच्या सर्व समर्थकांची ती चिंता आहे. कायो म्हणतात त्याप्रमाणे, निवांतपणा साध्य करायचा असेल, तर भिन्न राष्ट्रजमातींच्या भांडवलदारी लुटारूंमध्ये परस्परविश्वास पाहिजे. आणि विश्वास प्रस्थापित करण्यासाठी इतर देशांची – उदाहरणार्थ, चीन – दारे सताड उघडली पाहिजेत, म्हणजे युरोपातील सगळ्या लुटारूंना आणि दुकानदारांना तेथे मनसोक्त लूटमार करता येईल. पण जपानच्या लुटारूंना आणि दुकानदारांना ही दारे फक्त स्वत खेरीज इतर सर्वांसाठी बंद करून ठेवण्याची इच्छा आहे. त्याचे कारण देताना ते म्हणतात की, चीन युरोपपेक्षा त्यांना अधिक जवळचा आहे आणि हिंदुस्थानी लोकांना लुटण्यापेक्षा चिनी लोकांना लुटणे त्यांच्या दृष्टीने अधिक सोयीचे आहे. हिंदुस्थानी लोकांना लुटण्याची इंग्लंडच्या "सभ्य गृहस्थांना" सवय आहे. लुटीमधील स्पर्धा वैरांना निर्माण करते व त्यांच्यात नव्या महायुद्धाचे धोके सामावलेले आहेत, शिवाय, पॅरिसचा पत्रकार ग्रेन्गुआर म्हणतो त्याप्रमाणे,

"एक सुरळीत आणि भक्कम बाजारपेठ म्हणून रशियन साम्राज्य युरोपने गमावले आहे." ह्यामध्ये ग्रेन्गुआरला "वाईटाची मुळे" दिसतात आणि इतर अनेक पत्रकार, मुत्सद्दी, पाद्री, उमराव, साहसवादी आणि सट्टेबाज यांच्याप्रमाणेच तो आग्रह धरीत आहे की, सोविएत संघामध्ये अखिल युरोपीय हस्तक्षेपाची गरज आहे. शिवाय, युरोपात सतत बेकारी वाढत आहे आणि त्याचप्रमाणे कामगार-वर्गाची स्वत:च्या उद्दिष्टाच्या न्याय्यपणाची क्रांतिकारक जाणीव वाढत आहे. ह्या सगळ्यामधून अर्थ निघतो की, "निवांतपणा" प्रस्थापित होण्याचा संभव फारच कमी आहे, कदाचित त्याला मुळी जागाच मिळणार नाही असे भासते. पण मी आशावादी नसल्यामुळे आणि भांडवलदारांच्या दुष्टपणाला सीमा नाहीत ह्याची मला माहिती असल्यामुळे, माझी मान्य करायला तयारी आहे की, निवांत जीवन उपलब्ध करण्यासाठी भांडवलदार कदाचित एका मार्गाने प्रयत्न करतील. १९ फेब्रुवारीला कलोन येथे भाषण करताना वंशवादी प्रतिनिधी बेर्गर ह्यांनी ह्या शक्यतेची सूचना दिली. ते म्हणाले :

"जर, हिटलर सत्तेवर आल्यानंतर, जर्मन प्रदेश व्यापण्याचा फ्रेंचांनी प्रयत्न केला, तर आम्ही सगळ्या ज्यूंचे गळे कापू."

प्रशियाच्या सरकारला जेव्हा ह्या विधानाबद्दल समजले, तेव्हा बेर्गरना सार्वजनिक भाषणे करण्यास त्याने मनाई केली. हिटलरी छावणीत त्यामुळे संतापाचे वादळ उठले. एका वंशवादी वृत्तपत्राने लिहिले आहे : "बेकायदेशीर कृतींना चेतविण्याचा आरोप बेर्गरवर करता येणार नाही. जेव्हा आम्ही सत्तेवर येऊ तेव्हा केलेल्या कायद्याच्या आधारावर आम्ही ज्यूंचे गळे कापू."

हे विधान म्हणजे एक विनोद आहे, जर्मन "Witz" आहे, असे समजू नये. युरोपीय भांडवलदारवर्ग सध्याच्या त्याच्या मन:स्थितीत केवळ ज्यूंच्या संपूर्ण संहाराचाच नव्हे, तर त्याच्यापेक्षा वेगळ्या रीतीने विचार करणाऱ्या व त्याहूनही, त्याच्या अमानुष हितसंबंधांनुसार न वागणाऱ्या सर्वांचा संहार करण्याचा "कायदा मंजूर करण्यास" खचित समर्थ आहे.

ह्या "दुष्टचक्रात" अडकल्यानंतर, बुद्धिजीवी समर्थक हळूहळू सांत्वनाची क्षमता गमावतात आणि शेवटी त्यांना स्वत:लाच सांत्वनाची गरज निर्माण होते. भिक्षा काढून टाकण्यास तत्त्वत: नकार देणाऱ्या लोकांकडेसुद्धा ते सांत्वनासाठी वळतात, कारण भिक्षा देण्यामुळे तसे करण्याचा हक्क मिळतो. त्यांचा मूलभूत गुण असलेला "सुंदर खोटेपणा" इत:पर भांडवलदारी वास्तवाचा कुरूप दुष्टपणा लपवू शकत नाही. जगाची लूट करण्याच्या श्रमांमुळे थकलेल्या आणि स्वत:च्या दुष्ट उद्दिष्टांना कामगारवर्गाचा वाढत्या प्रमाणात तीव्र प्रतिकार होत असल्यामुळे घाबरलेल्या, ज्यांच्या धनलालसेने वेडाचे रूप धारण केले आहे आणि सामा-

जिकदृष्टचा नाशकारी प्रकारांमध्ये जे व्यक्त आहे अशा लोकांचे मनोरंजन व सांत्वन करणे हा केवळ एक निष्फळ उद्योगच आहे असे नव्हे, तर खुद्द सांत्वना-कारांनाही तो धोक्याचा आहे, असे त्यांच्यापैकी काहींना आता वाटू लागले आहे.

खिन्न दरोडेखोरांचे आणि मारेकऱ्यांचे सांत्वन करण्यातील गुन्ह्याकडेही कुणी बोट दाखवू शकेल. पण हा युक्तिवाद कुणाच्याही हृदयाच्या तारा छेडू शकणार नाही हे मला माहीत आहे, कारण ते "नीती" शिकविणे होईल आणि "नीती" शिकविणे म्हणजे अपेक्षेबाहेर कर्तव्यपूर्ती केल्यासारखे मानले जाते. सध्याच्या जगात बुद्धिजीवी सांत्वनकार असा एक " मध्यस्थ " बनतो आहे, ज्याला तर्कशास्त्र कठोरपणे अस्तित्व नाकारते.

कामगारवर्गीय सामाजिक दर्जा असलेल्या भांडवलदारवर्गीयांची प्रजा असलेल्या बुद्धिजीवी सांत्वनकाराला जाणीव होत आहे असे दिसते की, नाश होऊ घातलेल्या वर्गाचा चाकर म्हणून त्याची अपमानास्पद शोकांतिका घडणार आहे; धंदेवाईक गुंड आणि खुन्याप्रमाणे त्याचा नाश होणे अपरिहार्य आहे. त्याला ही जाणीव आता होऊ लागली आहे, कारण भांडवलदारवर्गाला त्याच्या सेवेची गरज राहिलेली नाही. भांडवलदारवर्गाची मर्जी संपादन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या त्याच्या जातबांधवांकडून तो सतत ऐकत आहे की, बुद्धिजीवींचे अति-उत्पादन झाले आहे. तत्त्वज्ञांपेक्षा आणि " चिंतकां "पेक्षा, भविष्य सांगणाऱ्या ढोंग्यांकडे " सांत्वना "साठी चटकन वळण्याचा भांडवलदाराचा कल असतो असे त्याला दिसते. हस्तसामुद्रिक, भविष्यवेत्ते, कुंडलीकर्ते, फकीर, योगी, सांकेतिक चित्रांवरून भविष्य सांगणारे, अध्यात्मवादी व इतर वैदूंच्या जाहिरातींनी युरोपीय वृत्तपत्रे गच्च भरलेली असतात. वस्तुतः खुद्द भांडवलदारांपेक्षा हे लोक जास्त अडाणी असतात. छायाचित्रकला व सिनेमा चित्रकलेला नष्ट करत आहेत आणि उपासमारीने मृत्यू येऊ नये म्हणून बटाटे, पाव, आणि मध्यमवर्गीयांनी टाकून दिलेले कपडे ह्यांच्या बदल्यात चित्रकार आपली चित्रे देत आहेत. पॅरिसच्या एका वर्तमानपत्राने पुढील गंमतीदार छोटी बातमी छापली होती :

" बर्लिनच्या चित्रकारांमध्ये घनदाट निराशा पसरली आहे आणि चित्तवृत्ती बहरण्याचे कोणतेही चिन्ह दिसत नाही. चित्रकारांनी परस्परांना मदत करण्याची भाषा ऐकू येत आहे, पण ज्यांची काहीही मिळकत नाही आणि ज्यांना काही मिळकत होण्याची संभाव्यता नाही, असे लोक एकमेकांना काय मदत करणार ? वस्तूंची थेट देवघेव करण्याची सूचना करणाऱ्या आन्नोत जॅकोबी नामक चित्र-कर्तीच्या नामी कल्पनेला बर्लिनच्या कला-वर्तुळांनी उत्साहाने उचलून धरले आहे. पुतळे आणि चित्रे ह्यांच्या बदल्यात कोळसेवाल्यांनी चित्रकारांना इंधन पुरवावे. काळ पालटेल आणि कोळसेवाल्यांना ह्या देवघेवीचा पश्चात्ताप होणार

नाही. दाताच्या डॉक्टरांनी चित्रकारांवर आपल्या कलेची करामत दाखवावी. दाताच्या डॉक्टरच्या प्रतीक्षा-कक्षात चांगले चित्र नेहमीच शोभून दिसेल. खाटकांनी आणि गवळ्यांनी भले काम करण्याची संधी दवडू नये व त्याचवेळी रोख पैसे खर्च न करता चांगली कला प्राप्त करून घ्यावी. आन्तोत जॅकोबीची कल्पना विकसित करण्यासाठी आणि व्यवहारात अंमलात आणण्यासाठी बर्लिन-मध्ये एक खास ब्यूरो स्थापन करण्यात आली आहे."

थेट देवघेव करण्याच्या ह्या व्यवस्थेची बातमी देणारे हे वर्तमानपत्र, पॅरिसमध्येही असेच चालू आहे, असे मात्र म्हणत नाही.

रंगभूमीची उच्च कला सिनेमा हळूहळू नष्ट करत आहे. भांडवलदारी सिनेमाच्या दूषित प्रभावाचे तपशीलवार विवेचन करण्याची गरज नाही, कारण ती उघड गोष्ट आहे. भावनाप्रधान विषयांचा चोथा करून झाल्यावर आता तो शारीरिक व्यंगांच्या प्रदर्शनावर भर देऊ लागला आहे.

"विक्षिप्त" नामक चित्रपटासाठी मेट्रो-गोल्डविन-मेयरच्या हॉलीवूडमधील स्टुडिओंनी अस्सल कलाकार गोळा केले आहेत. त्यांच्यात करकोच्याशी खूप साम्य असलेली कू-कू ही पक्षी-मुलगी आहे; सापळ्यासारखा माणूस पी. रॉबिन्सन आहे; जन्मतः एकच हात असलेली आणि पायांनी कुशलपणे लेस विणणारी मार्था आहे. "टाचणीच्या आकाराचे डोके" असलेली शील्झे नावाची बाई स्टुडिओने पैदा केली आहे. तिचे शरीर चार-चौघींसारखेच आहे, पण डोके मात्र अगदी टाचणीसारखे छोटे आहे. पुरुषाप्रमाणे भरदार दाढी असलेली ओल्गा त्या चित्रपटात आहे; शिवाय अर्धी स्त्री अर्धा पुरुष जोसेफाईन–जोसेफ, हिल्टन सयामी जुळे, बुटके आणि लिलीपुट यांचा समावेश आहे.

बार्नें, पोस्सार्ट, मोने-सूली आणि ह्या दर्जाचे इतर कलाकार इतःपर आवश्यक नाहीत. फेअरबँक्स, हॅरोल्ड लॉईड आणि इतर कसरतवाले त्यांची हकालपट्टी करीत आहेत. अभिजात संगीताचे जाझकडून उच्चाटन होत आहे. स्तेन्दाल, बाल्झाक, डिकन्स आणि फ्लॉबेरऐवजी, भुरट्या चोरांना व खुन्यांना पकडून मोठ्या दरोडेखोरांच्या आणि धाऊक खून पाडणाऱ्यांच्या मालमत्तेचे पोलिस डिटेक्टिव कसे रक्षण करतात, हे सांगण्याची हातोटी असलेले विविध वॉलेस प्रस्थापित झाले आहेत. पोस्टाची तिकिटे आणि ट्रामची तिकिटे गोळा केली अथवा फार तर जुन्या नामांकित चित्रकारांच्या चित्रांच्या बनावट प्रती गोळा केल्या, म्हणजे कलेच्या क्षेत्रात खूप काही केले असे भांडवलदार समाधान मानून घेतो. वैज्ञानिक क्षेत्रात, कामगारवर्गाच्या शारीरिक शक्तींना अत्यंत स्वस्तात व सोयीस्कर रीतींनी शोषण्यात भांडवलदाराला स्वारस्य आहे. स्वतःची समृद्धी वाढवील, इतपतच विज्ञानाचे अस्तित्व भांडवलदाराला मान्य आहे.

हे पाहून काही बुद्धिजीवींना जाणीव होऊ लागली आहे की, " सृजनशील संस्कृती "– त्यांची पूर्वी समजूत होती की हा त्यांचा उद्योग होता, त्यांच्या " मुक्त विचारा "ची आणि " स्वतंत्र इच्छे "ची ती निर्मिती होती– इत:पर त्यांचा उद्योग राहिलेला नाही आणि संस्कृती भांडवलदारी जगाची अंगभूत गरज उरलेली नाही. चीनमधील घटनांनी त्यांना १९१४ सालातील लूवेन विद्यापीठाच्या आणि त्याच्या ग्रंथालयाच्या नाशाची आठवण करून दिली आहे. एके दिवशी त्यांना समजले की, शांघायमधील तुन ल्सी विद्यापीठ, नौदल कॉलेज, मच्छीमार विद्यालय, राष्ट्रीय विद्यापीठ, मेडिकल कॉलेज, शेतकी आणि इंजिनिअरिंग महाविद्यालये व कामगारांचे विद्यापीठ, ह्यांचा जपानी तोफांनी विध्वंस केला. ह्या रानटी कृत्याचा कुणालाही संताप आला नाही. त्याचप्रमाणे, शस्त्रास्त्रांच्या सतत वाढीबरोबरच घडणाऱ्या सांस्कृतिक संस्थांच्या अनुदानांमधील कपातीचाही कुणाला संताप येत नाही.

पण युरोपीय आणि अमेरिकन बुद्धिजीवींच्या एका अगदी छोट्या विभागाला मात्र अर्थातच वाटते की, " बगळलेल्या मध्यस्थांच्या कायद्या "खाली त्यांनी अपरिहार्यपणे आले पाहिजे व कुणाची बाजू घ्यायची हा प्रश्न त्यांना पडला आहे. जुन्या सवयीनुसार, कामगारवर्गाविरुद्ध भांडवलदारांचा कैवार घ्यायचा, अथवा प्रतिष्ठेनुसार, भांडवलदारवर्गाविरुद्ध कामगारर्गाचा कैवार घ्यायचा? बुद्धिजीवी-वर्गापैकी बहुसंख्यांना भांडवलशाहीची सेवा करण्यातच अद्यापि समाधान वाटते आहे. पण त्यांच्या ह्या मालकाला आपल्या चाकरांच्या आणि सांत्वनकर्त्यांच्या नैतिक चांचल्याची पूर्ण जाणीव आहे व त्यांच्या समन्वयवादी कार्यातील व्यर्थता आणि षंढता पाहून आता तो उघडपणे त्यांचा तिटकारा करू लागला आहे; अशा चाकरांच्या आणि सांत्वनकर्त्यांच्या अस्तित्वाची खरेच गरज आहे काय, असा एव्हाना त्याच्या मनात संशय उत्पन्न झाला आहे.

मध्यमवर्गीय क्षुद्रबुद्धीचे सांत्वन करण्यात पटाईत असलेल्या लोकांकडून मला वारंवार पत्रे येतात. स्वेन एल्वेरस्ताद नामक नागरिकाकडून मला आलेले असे एक पत्र मी उद्धृत करतो :

" प्रिय श्री. गोर्की,

" निराशेच्या सीमेवर पोहोचलेल्या भयानक गोंधळाचे व भीतीचे साम्राज्य सबंध जगावर पसरले आहे. पृथ्वीवरील सर्व देशांना ग्रासणारे भयंकर आर्थिक अरिष्ट ह्याला कारणीभूत आहे. ह्या जागतिक शोकांतिकेमुळे " Tidens Tagn " नामक नॉर्वेतील सर्वात अधिक खपाच्या वर्तमानपत्रात लेखमाला लिहिण्याची प्रेरणा मला झाली. ह्या महाभयंकर संकटाचे बळी ठरलेल्या दशलक्षावधी लोकां-मध्ये नवी चेतना आणि आशा निर्माण करण्याचा माझ्या लेखनामागील हेतू होता.

गेल्या दोन वर्षांमधील लोकांची शोकजनक परिस्थिती ह्या विषयावर आपापली मते कळवावीत अशी लेखकांना, चित्रकारांना, शास्त्रज्ञांना आणि राजकीय मुत्सद्द्यांना मी विनंती केली. प्रत्येक देशातील प्रत्येक नागरिकासमोर पर्याय उभा आहे : क्रूर दैवाच्या जोरदार प्रहारांखाली नष्ट व्हायचे, अथवा अरिष्टावर आनंदजनक उपाय सापडेल अशा आशेने लढत राहायचे. सध्याची खिन्न परिस्थिती संपून आनंदाचे वातावरण निर्माण होईल, अशा आशेची प्रत्येकाला गरज आहे. आणि ज्याचे शब्द लक्षपूर्वक ऐकण्याची सर्वांना सवय आहे अशा माणसाचे आशावादी मत वाचून प्रत्येकाच्या अंतरात्म्यात आशेची तेजस्वी ज्योत प्रज्वलित होईल. म्हणून सद्यःस्थितीवर आपला दृष्टिकोन कळवावा, अशी मी आपल्याला विनंती करीत आहे. आपले मत कदाचित तीन अथवा चार ओळींपलीकडे नसेल, पण त्यामुळे निःसंशयरीत्या अनेकजण निराशेपासून बचावतील आणि भविष्यकाळाला धैर्याने तोंड देण्यास त्यांच्यात सामर्थ्य निर्माण होईल.

" आपला नम्र, स्वेन एल्वेरस्ताद."

ह्या पत्रलेखकासारखे अद्यापि खूप लोक आहेत. "दोन अथवा तीन ओळींच्या" गुणकारी उपायावर, वाक्यांच्या गुणकारी उपायावर, ह्या लोकांची अद्याप भाबडी श्रद्धा आहे. ही श्रद्धा एवढी भाबडी आहे, की ती प्रांजल असूच शकणार नाही.

दोन-तीन वाक्ये अथवा दोन-तीनशे वाक्ये जराग्रस्त भांडवलदारी जगामध्ये नवजीवन आणू शकणार नाहीत. जगातील सर्व पार्लमेंटांमध्ये आणि राष्ट्रसंघामध्ये दररोज हजारो वाक्यांचा उच्चार होतो, पण त्यामुळे कुणाचेही सांत्वन होत नाही अथवा कुणाचीही खात्री पटत नाही; भांडवलदारी संस्कृतीमधील अरिष्टाची नैसर्गिक वाढ थोपविण्याची शक्यता आहे अशी आशा कुणाच्याही मनात निर्माण होत नाही. माजी मंत्री आणि इतर रिकामटेकडे शहरांमधून दौरे काढतात व विज्ञानाला "वाकवा" आणि "शिस्त लावा" अशी मध्यमवर्गीय समाजाला विनंती करतात. ह्या माणसांची बाष्कळ बडबड पत्रकार मंडळी तावडतोब उचलतात. ह्या पत्रकारांना "सगळे सारखेच आहे, सारा कंटाळवाणा खेळ आहे" आणि खूप काळापासून त्यांना असेच वाटत आहे. 'दि डेली एक्सप्रेस' नामक गंभीर वृत्तपत्रात लेखन करणारे त्यांच्यातील एक पत्रकार, एमिल लुडविग, मानवजातीला सल्ला देतात की, "तज्ज्ञांची ब्याद नष्ट करा." हा ग्राम्य मूर्खपणा मध्यमवर्गीय ऐकतो, वाचतो आणि त्यापासून स्वतःचे निष्कर्ष काढतो. जर युरोपीय मध्यमवर्गीय सत्तेने ठरविले की, विद्यापीठे बंद करणे आवश्यक आहे, तर त्यात आश्चर्यजनक असे काहीही नसेल. जाता जाता सांगायचे तर सबळ पाठिंब्यासाठी पुढील वस्तुस्थिती ती सादर करील : जर्मनीमध्ये दरसाल विद्यापीठाची पदवी

आवश्यक असणाऱ्या ६००० जागा रिकाम्या होतात, पण जर्मन विद्यापीठांमधून दरसाल सुमारे ४०००० पदवीधर निर्माण होतात.

नागरिकहो, डी. स्मिथ आणि टी. मॉरिसन, तुम्ही जेव्हा भांडवलदारी साहित्याला आणि पत्रकार व्यवसायाला " सुधारक मताच्या संघटकाची " भूमिका देता, तेव्हा चूक करता हा " संघटक " परपुष्ट बांडगूळ आहे व वास्तवाच्या नीच गोंधळाला लपविण्याचा तो प्रयत्न करतो. पण जुन्या अवशेषांची घाण आणि गदळ आच्छादून टाकणाऱ्या लतावेलींपेक्षा आणि तणापेक्षा कमी प्रभावीपणाने त्याचे काम घडते. नागरिकहो, तुमच्या वर्तमानपत्रांच्या सांस्कृतिक भूमिकेविषयीचे तुमचे ज्ञान अगदी कच्चे आहे. " अमेरिकन हा सर्वप्रथम अमेरिकन आहे " आणि नंतरच केवळ माणूस आहे, असे तुमची वृत्तपत्रसृष्टी एकमुखाने प्रतिपादन करते. तर जर्मन वंशवादी वृत्तपत्रे शिकवण देतात की, वंशवादी सर्वप्रथम आर्य आहे आणि नंतरच केवळ डॉक्टर, भूगर्भशास्त्रज्ञ अथवा तत्त्वज्ञ आहे. फ्रेंच पत्रकार युक्तिवाद करतात की, फ्रेंच सर्वप्रथम विजेता आहे आणि म्हणून इतरांपेक्षा तो जास्त शस्त्रसज्ज असला पाहिजे. अर्थात हा संदर्भ मेंदूच्या नव्हे, तर मुठीच्या शस्त्रसज्जतेचा आहे.

युरोपीय आणि अमेरिकन वर्तमानपत्रे आपल्या वाचकांची सांस्कृतिक पातळी खालावण्याच्या उद्योगात झटून गुंतली आहेत आणि त्यांचा जवळजवळ हाच एकमेव उद्योग आहे असे म्हणणे अतिशयोक्त ठरणार नाही. वस्तुत: त्यांच्या मदतीविना त्यांच्या वाचकांची सांस्कृतिक पातळी आधीच पुरेशी खालावलेली आहे. स्वत:च्या मालकांच्या, भांडवलदारांच्या, हितसंबंधांची सेवा बजावणारे आणि माशीला हत्तीचा आकार देण्यात वाकबगार असलेले पत्रकार, डुकराला वठणीवर आणण्याचे उद्दिष्ट मात्र ठेवत नाहीत. खरे म्हणजे हे डुक्कर जबरदस्त पिसाळल्याचे त्यांना स्पष्ट दिसते आहे.

तुम्ही लिहिता : " आम्ही जेव्हा युरोपमध्ये होतो, तेव्हा आम्हाला कटू सत्याची जाणीव झाली की, युरोपीय माणसे आमचा तिटकारा करतात." हे विधान फारच " आत्मनिष्ठ " आहे आणि आत्मनिष्ठवादामधून तुम्हाला सत्याचा अंश काढता आला, तरी संपूर्ण सत्य त्याने तुमच्यापासून लपविले : युरोपमधील सर्व भांडवलदार परस्पर तिटकाऱ्याच्या वातावरणात राहतात हे तुमच्या ध्यानात आले नाही. लुटले गेलेले जर्मन फ्रान्सचा द्वेष करतात, तर सोन्याच्या अतिरेकापायी गुदमरलेले फ्रेंच ब्रिटिशांचा तिरस्कार करतात, त्याचप्रमाणे इटालियन फ्रेंचांचा तिटकारा करतात आणि सर्व भांडवलदार एकमुखाने सोविएत संघाचा तिटकारा करतात. इंग्रज लॉर्ड आणि दुकानदार यांच्याविषयीच्या द्वेषाने तीस कोटी हिंदुस्थानी पेटलेले आहेत; पंचेचाळीस कोटी चिनी जपान्यांचा आणि सर्व युरो-

पीयांचा तिरस्कार करतात. चीनला लुटण्याची सवय झालेले युरोपीय, जपान्यांचा द्वेष करायला सज्ज आहेत, कारण चिनी लोकांना लुटणे केवळ आपली मक्तेदारी आहे असे जपान्यांना वाटते. सर्वांविषयी सर्वांना वाटणारी ही तिरस्काराची भावना वाढत आहे, अधिक दाट बनत आहे, तिला अधिक दुर्गंध येत आहे. चिघळणाऱ्या जखमेप्रमाणे भांडवलदारांमध्ये ती सुजत आहे आणि मग कदाचित पृथ्वीवरील लोकांच्या सर्वोत्तम व अत्यंत निकोप रक्ताच्या परत एकदा नद्या वाहतील. दशलक्षावधी दणकट व्यक्तींचा युद्धामुळे नाश होईल. शिवाय अगणित संपत्तीचा आणि तिला बनविणाऱ्या कच्च्या मालाचा विध्वंस होईल. परिणामी, मानवजातीचे आरोग्य नष्ट होईल, तिचे धातूचे व इंधनाचे साठे रिते होतील, भांडवलदाराच्या राष्ट्रीय गटांमधील परस्परद्वेष युद्धामुळे नष्ट होणार नाही, हे सांगण्याची जरुरी नाही.

" वैश्विक मानवी संस्कृतीची सेवा करण्यास समर्थ आहोत " असे तुम्हाला वाटते आणि " रानटी अवस्थेच्या गर्तेत पडण्यापासून तिला वाचविणे तुमचे कर्तव्य आहे " अशी तुमची भावना आहे. फार छान. पण स्वतःला एक साधा प्रश्न विचारा : ह्या संस्कृतीला वाचविण्यासाठी तुम्ही आज अथवा उद्या काय करू शकता ? जाता जाता सांगायचे म्हणजे ही संस्कृती " वैश्विकरीत्या मानवी " कधीच नव्हती आणि कामकरी लोकांना अजिबात जबाबदार नसलेल्या व एका राष्ट्रजमातीविरुद्ध दुसऱ्या राष्ट्रजमातीला बिथरवणाऱ्या राष्ट्रीय-भांडलदारी सरकारी संघटना अस्तित्वात असताना तशी ती राहूच शकत नाही.

उदाहरणार्थ, तुम्ही स्वतःला प्रश्न विचारा : बेकारी नाहीशी करण्यासाठी, अथवा कामगारवर्गाच्या आरोग्यावर उपासमारीमुळे होणारा खंगण्याचा परिणाम टाळण्यासाठी, अथवा बालवेश्याव्यवसायाच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी तुम्ही काय करू शकता ? जनसमूहांचे खंगणे म्हणजे संस्कृती जिच्यातून उद्‌भवते त्या मातीचे खंगणे, हे तुम्हाला समजते काय ? कदाचित तुम्हाला जाणीव आहे की, तथाकथित " सुसंस्कृत स्तर " नेहमीच जनसमूहांची निर्मिती होता. तुम्हाला हे उत्तम माहीत असले पाहिजे, कारण अमेरिकेमध्ये वर्तमानपत्रे विकणारी पोरे प्रेसिडेंटांच्या प्रतिष्ठेला वर पोहोचू शकतात, अशी प्रौढी मिरविण्याची तुम्हा अमेरिकनांना सवय आहे.

प्रेसिडेंटांच्या गुणांची नव्हे, तर पोरांच्या धूर्तपणाची नोंद करण्यासाठी केवळ मी हा उल्लेख केला. प्रेसिडेंटांच्या गुणांविषयी मला काहीही माहिती नाही.

आणखी एका प्रश्नावर तुम्ही चिंतन करू शकाल : ब्रिटनचे गुलाम म्हणून राहण्याची भूमिका देवाने देऊ केलेली नाही ह्याची तीस कोटी हिंदुस्थानींना जाणीव होऊ लागली असताना, पंचेचाळीस कोटी चिनी लोकांना युरोपीय व

अमेरिकन भांडवलाचे गुलाम करणे शक्य आहे, ह्यावर तुमचा विश्वास बसतो का? जरा विचार करा : अब्जावधी कष्टकऱ्यांच्या शक्तीच्या आधारे हजारो लुटारू आणि साहसवादी कायमचे निवांत राहू इच्छितात! ही सामान्य स्थिती आहे असे तुम्ही म्हणता! तशी ती होती आणि आहेसुद्धा, पण तशी ती असलीच पाहिजे असे म्हणण्याची तुमची हिंमत आहे का? कोणे एके काळी, मध्ययुगात, प्लेगसुद्धा सामान्य समजला जात होता, पण आता प्लेग जवळजवळ नाहीसा झाला आहे आणि पृथ्वीवरील त्याची भूमिका भांडवलदारवर्ग वठवीत आहे. सबंध वर्णीय जगताला तो दूषित करीत आहे. श्वेतवंशाबद्दल अत्यंत घृणेची आणि चिडीची बाधा त्याला करीत आहे भांडवलशाही वंशीय युद्धांना भडकवत आहे असे तुम्हाला, संस्कृतीच्या रक्षणकर्त्यांना भासत नाही काय?

तुम्ही माझ्यावर आरोप करता की, मी "द्वेषाची शिकवण" देतो आणि त्याऐवजी मी "प्रेमाचा प्रचार" करावा असा मला सल्ला देता. कामगारांना शपथ घालण्यास मी समर्थ आहे अशी बहुधा तुमची समजूत झालेली दिसते : भांडवलदारांवर प्रेम करा, कारण तुमची ताकद ते फस्त करतात : त्यांच्यावर प्रेम करा, कारण तुमच्या पृथ्वीच्या खजिन्यांची ते निष्फळ उधळपट्टी करतात : तुम्हाला नष्ट करणाऱ्या तोफा बनविण्यासाठी तुमच्या लोखंडाची ते उधळण करतात म्हणून ह्या माणसांवर प्रेम करा : ह्या हरामखोरांवर प्रेम करा, कारण त्यांच्यामुळे तुमची मुले उपाशीपोटी मरताहेत; ते स्वतः आरामात आणि तृप्त राहावेत म्हणून तुम्हाला नष्ट करणाऱ्यांवर प्रेम करा; भांडवलदारांवर प्रेम करा, कारण त्यांचे चर्च तुम्हाला अज्ञानाच्या अंधकारात ठेवते.

बायबल अशाच धर्तीची काहीशी शिकवण देत आहे आणि ही आठवण ठेवून "ख्रिश्चन धर्माचा" तुम्ही "संस्कृतीप्रेमी" म्हणून संदर्भ देता. काळाच्या तम्ही फार फार मागे आहात. "प्रेमाच्या आणि नम्रतेच्या तत्त्वा"च्या सांस्कृतिक प्रभावाबद्दल बोलण्याचे प्रामाणिक लोकांनी केव्हाच बंद केले आहे. आपल्या काळात ह्या प्रभावासंबंधी बोलणे अयोग्य आणि अशक्य आहे. ख्रिश्चन भांडवल-दारांनी मायदेशी आणि वसाहतींमध्ये अशा दोन्ही ठिकाणी लीनता बिंबवली आहे व "जाळपोळ आणि तलवार" ह्यांच्या मदतीने स्वतःच्या गुलामांना लीनतेवर प्रेम करण्याची सक्ती केली आहे. "जाळपोळ आणि तलवार" ह्यांचा अवलंब ते कधी नव्हते एवढ्या मोठ्या प्रमाणात करू लागले आहेत. तुम्हाला माहीतच आहे की, आजकाल तलवारीची जागा मशिनगन आणि बॉंबनी घेतली आहे व "वरच्या देवाच्या आवाजाने"सुद्धा घेतली आहे. पॅरिसचे एक वर्तमानपत्र बातमी देते :

"आफ्रिडींविरुद्धच्या युद्धात ब्रिटिशांनी एक धाडस केले आहे आणि त्याचा त्यांना उत्तम उपयोग होत आहे. अगम्य पर्वतांवरील पठारावर बंडखोरांच्या एका

ओटाने आश्रय घेतला आहे. अचानक त्यांच्या माथ्यावर खूप उंचावरून उडणारे एक विमान अवतरते. आफ्रिडी स्वतःची शस्त्रे घ्यायला धावतात. पण बाँब पडत नाहीत. त्याऐवजी, विमानामधून शब्द ओघळू लागतात. स्वर्गामधील एक आवाज त्यांच्या भाषेत आर्जवपूर्वक बोलू लागतो, त्यांनी शस्त्रे खाली ठेवावीत व ब्रिटिश साम्राज्याविरुद्धची निरर्थक स्पर्धा थांबवावी, अशी त्यांना विनंती करतो. आकाशवाणी ऐकून दचकलेल्या अनेक बंडखोरांनी खरोखरीच लढणे सोडून दिल्याचे प्रसंग घडले आहेत.

"फॅसिस्ट मिलिशियाच्या स्थापनेचा वर्धापनदिन साजरा करताना देवाच्या आवाजाची युक्ती मिलानमध्ये परत वापरण्यात आली. फॅसिझमच्या कौतुकाचे काही मोजके शब्द दैवी वाणीमधून उच्चारलेले सबंध शहराने ऐकले. जनरल बाल्बो यांचे बोलणे ऐकण्याचा योग आलेल्या मिलानवासींना आकाशवाणीमध्ये त्यांचा खर्ज आवाज ओळखू आला."

अशा रीतीनें देवाचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी एक साधी युक्ती शोधण्यात आली आणि रानटी लोकांना शरण आणण्यासाठी देवाचा आवाज वापरण्यात आला. एक दिवस सानफ्रान्सिस्को अथवा वॉशिंग्टनच्या डोक्यावर देव अवतरेल आणि जपानी हेलात इंग्लिशमधून बोलेल, अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

"थोर माणसांचे, चर्चच्या उपदेशकांचे" उदाहरण तुम्ही माझ्यासमोर धरत आहात. तुम्ही गंभीरपणे असे बोलत आहात ही खरेच गंमतीची गोष्ट आहे. चर्चची थोर माणसे कशाची आणि कशी बनली, हे आपण विचारायला नको. पण आधारासाठी त्यांच्यावर टेकताना, प्रथम त्यांच्या भक्कमपणाची आणि स्थैर्याची तुम्ही आधी खात्री करून घेणे इष्ट ठरेल. "चर्च"वरील तुमच्या विवेचनांमध्ये तुम्ही तो "अमेरिकन कल्पनावाद" दाखवता, जो केवळ प्रगाढ अज्ञानामधूनच उत्पन्न होऊ शकतो. प्रस्तुत बाबतीत ख्रिश्चन चर्चच्या इतिहासाबद्दलच्या तुमच्या अज्ञानाचा एकच खुलासा असू शकतो की, माणसाच्या मनावर आणि सदसद्विवेकबुद्धीवर बळजबरी करणारी चर्च ही संघटना आहे, असे अमेरिकेतील रहिवाशांना स्वतःच्या कटू अनुभवांद्वारे माहीत होण्याचा कधी प्रसंगच आलेला नाही व युरोपातील रहिवाशांप्रमाणे ह्याचा गहिरा अनुभव त्यांना कधीच आलेला नाही. अखिल ख्रिस्ती धर्ममंडळांमध्ये "चर्चच्या थोर शिक्षकांचे" ज्या क्रूरतेने, महत्त्वाकांक्षेने आणि स्वार्थाने रक्तपाती दंगे घडतात, त्यांची तुम्ही ओळख करून घेतली पाहिजे. विशेषतः इफेससच्या मंडळातील भोंदूगिरीच्या कहाणीपासून तुम्हाला बरेच काही ऐकायला मिळेल. पाखंडीपणाच्या इतिहासाचे तुम्ही थोडे वाचन केले पाहिजे, ख्रिश्चन धर्माच्या आरंभीच्या शतकांमधील "पाखंड्यां"च्या उच्चाटनांशी, ज्यूंच्या हत्याकांडांशी, आल्बीगेनीज आणि ताबोराइटांच्या कत्तलींशी, ख्रिस्ताच्या

चर्चच्या एकूण रक्तपाती धोरणाशी तुम्ही परिचय करून घेतला पाहिजे. धर्मविचारणी सभेचा इतिहास कमीशिक्षितांना स्वारस्यपूर्ण आहे, पण तुमचा देशबांधव वॉशिंग्टन ली याने सांगितलेल्या हकीकतीनुसार मात्र अर्थातच नव्हे. धर्मविचारिणी सभेच्या स्थापनेत पुढाकार घेणाऱ्या व्हॅटिकनच्या नियंत्रण मंडळाने ली यांच्या लेखनाला मंजुरी दिलेली आहे. ह्या सर्व गोष्टींचा जर तुम्ही परिचय करून घेतलात, तर अगदी सहज शक्य आहे की, अल्पसंख्यांची बहुसंख्यांवर सत्ता दृढ करण्यासाठी चर्चच्या पाद्र्यांनी अत्यंत उत्साहाने कार्य केले होते, अशा निष्कर्षाला तुम्ही याल. त्यांनी पाखंडीपणाविरुद्ध लढे दिले, कारण चर्चच्या माणसांच्या लबाडीचा कामकरी जनसमूहांना अंतःप्रेरणेने सुगावा लागल्यामुळे त्यांच्यातच पाखंडी विचारांचा जन्म झाला होता. चर्चच्या माणसांनी गुलामांच्या धर्माचा पुरस्कार केला. मालकांनी हा धर्म केवळ गैरसमजुतीपायी अथवा गुलामांच्या भीतीपायी स्वीकारला होता. तुमचे इतिहासकार व्हॅन लोन 'महान ऐतिहासिक घोटाळे' ह्या लेखात दावा करतात की, 'शुभ वर्तमाना'मधील शिकवणींसाठी नव्हे, तर त्यांच्या विरुद्ध चर्चला लढावे लागले होते. ते म्हणतात की, जेरूसलेम नष्ट करण्यात टीटसने ब्रह्मघोटाळा केला. कारण पॅलेस्टाईनमधून हकालपट्टी झालेले ज्यू सगळ्या देशभर विखुरले आणि त्यांनी स्थापन केलेल्या समाजामध्येच ख्रिश्चन धर्म परिपक्व झाला व वाढला. आणि भांडवलदारी राज्यांना मार्क्स व लेनिन यांचे विचार जेवढे घातक आहेत, तेवढाच ख्रिश्चन धर्म रोमन साम्राज्याला घातक होता.

तर प्रत्यक्षात हे असे होते आणि हे असे आहे : 'शुभ वर्तमाना'मधील भाबड्या कम्युनिझमविरुद्ध ख्रिश्चन चर्च लढले. त्याच्या संपूर्ण "इतिहासा"चा हा आशय आहे.

सध्याच्या दिवसात चर्च काय करते आहे? अर्थात सर्वप्रथम ते प्रार्थना करते. यॉर्कचे आर्चबिशप आणि कॅंटरबरीचे आर्चबिशप – ज्या माणसाने सोविएत संघाविरुद्ध "धर्मयुद्ध" करा अशी काहीशी शिकवण दिली – अशा ह्या दोन आर्चबिशपनी एक नवी प्रार्थना रचली आहे. तिच्यात इंग्लिश ढोंगाचा बेमालूमरीत्या इंग्लिश विनोदाशी मेळ घातलाय. "आमचे फादर" ह्या प्रार्थनेच्या धर्तीवर ही काहीशी प्रदीर्घ रचना आहे. पुढील शब्दांमध्ये आर्चबिशप देवाला आवाहन करतात :

"कर्ज आणि समृद्धीची पुनःस्थापना करण्याच्या आमच्या सरकारच्या धोरणासंबंधात, तुझ्या इच्छेप्रमाणे होवो. हिंदुस्थानच्या भावी राज्यघटनेसाठी जे काही हाती घेण्यात येत आहे त्या सर्व गोष्टींसंबंधात, तुझ्या इच्छेप्रमाणे होवो आगामी निःशस्त्रीकरण परिषदेसंबंधात आणि पृथ्वीवर शांतता प्रस्थापित करण्या-

साठी हाती घेण्यात येणाऱ्या सर्व गोष्टींसंबंधात, तुझ्या इच्छेप्रमाणे होवो. व्यापार कर्ज आणि परस्पर सख्य यांच्या पुन:स्थापनेसंबंधात, आम्हाला आमची रोजची भाकर दे. सामायिक कल्याणासाठी सर्व वर्गांचे सहकार्य घडवण्यासंबंधांत, आम्हाला आमची रोजची भाकर दे. राष्ट्रीय गर्व बाळगल्याचा अपराध जर आमच्याकडून घडला असेल आणि आमच्यापरीने सर्वोत्तमरीत्या इतरांना मदत करण्याऐवजी, इतरांवर सत्ता गाजवण्यात जर आम्हाला अधिक मोठे समाधान लाभले असेल, तर आमच्या पापांची आम्हाला क्षमा कर. आमच्या घडामोडींबाबत आम्ही स्वार्थी वर्तन केले आहे आणि इतरांच्या हिताऐवजी आमच्या हिताला व आमच्या वर्गाच्या हिताला आम्ही प्राधान्य दिले आहे, आमच्या पापांना क्षमा कर."

भेदरलेल्या दुकानदारांची ठरीव प्रार्थना! ह्या प्रार्थनेदरम्यान, त्यांच्या "पापांना" देवाने "क्षमा" करावी म्हणून सुमारे डझनभर वेळा ते देवाची आळवणी करतात, पण ती पापे इत:पर करणार नाही असे एकदाही कबूल करण्याची भाषा त्यांच्या तोंडून निघत नाही. आणि फक्त एका बाबतीत देवाच्या "क्षमेची" ते मागणी करतात :

"राष्ट्रीय उर्मटपणाच्या आम्ही आहारी गेलो आहोत, इतरांना मदत करण्यात नव्हे तर इतरांवर सत्ता गाजवण्यात आम्हाला समाधान लाभले आहे. हे देवा, आम्हाला क्षमा कर!"

ह्या पापाबद्दल आम्हाला क्षमा कर, पण पापाचरण थांबविणे आम्हाला शक्य नाही, असे ते म्हणतात. बहुसंख्य इंग्लिश धर्मगुरूंनी ही क्षमायाचनेची प्रार्थना नाकारली. तिचे वाचन करणे विचित्र आणि अपमानास्पद ठरेल, असे कदाचित त्यांचे मत पडले असेल.

लंडन येथे सेंट पॉल कॅथेड्रलमध्ये २ जानेवारी रोजी ब्रिटिश देवाच्या सिंहासनासमोर ही प्रार्थना "सादर करण्यात" येणार होती. ज्या धर्मगुरूंना ही प्रार्थना आवडली नाही, त्यांना ती न वाचण्याची परवानगी कॅंटरबरीच्या आर्चबिशपनी दिली.

ख्रिश्चन चर्च किती मूर्ख आणि ग्राम्य बाष्कळपणा करू शकते हे तुम्ही पाहता. धर्मगुरूंनी स्वत:च्या देवाला वरिष्ठ दुकानदाराच्या पातळीला मनोरंजकरीत्या खाली कसे आणले आहे व युरोपातील सर्वोत्तम दुकानदारांच्या व्यापारी उलाढालींमध्ये कसे गोवले आहे पाहा. पण फक्त इंग्लिश धर्मगुरूंबद्दल बोलणे अन्यायाचे ठरेल. इटालियनांनी पवित्र भुताची बँक स्थापन केली आहे हे विसरणे योग्य ठरणार नाही. रशियन स्थलांतरितांचे पॅरिसमधील वृत्तपत्र बातमी देते की, १५ फेब्रुवारीला फ्रान्समध्ये म्यूलूएझे येथे :

"ॲबे एजी यांच्या निर्देशनाखालील कॅथलिक 'युनियन' पब्लिशिंग

हाऊसतर्फे चालवण्यात येणाऱ्या पुस्तकभांडाराच्या मॅनेजरला आणि विक्रेत्याला पोलिस अधिकाऱ्यांनी अटक करण्याचा हुकूम दिला. जर्मनीहून आयात केलेली संभोग छायाचित्रे व लैंगिक विषयांवरची पुस्तके पुस्तकभांडारात विकली जात होती. "माल" जप्त करण्यात आला आहे. काही पुस्तके केवळ संभोगविषयक नाहीत, तर धर्माची निंदा आणि कुटाळी करणारी आहेत."

अशा प्रकारच्या शेकडो वस्तुस्थिती दाखविता येतील आणि त्या एकच गोष्ट सूचित करतात: चर्च भांडवलशाहीचे आश्रित आणि नोकर आहे व भांडवलशाहीला नष्ट करणाऱ्या रोगांचीच चर्चला बाधा झाली आहे. "चर्चच्या नैतिक अधिकाराला" भांडवलदारांनी मान्य करण्याचा एक काळ होता असे गृहीत धरायचे ठरविले, तर हा "मनाच्या पोलिसाचा" अधिकार होता असे मान्य केले पाहिजे. कामकरी जनतेला दडपून टाकण्यात मदत करणाऱ्या एका संघटनेचा हा अधिकार होता. चर्चने "सांत्वना केली" असे तुम्ही म्हणता? मी हे नाकारत नाही. पण बुद्धीला नष्ट करणाऱ्या पद्धतींपैकी ही एक सांत्वना-पद्धत आहे.

छे: छे:, श्रीमंतावर प्रेम कर असा गरीबाला उपदेश करण्याचा, मालकावर प्रेम असा कामगाराला उपदेश करण्याचा, माझा व्यवसाय नाही. सांत्वना करण्यास मी समर्थ नाही. मला फार उत्तम माहीत आहे आणि फार पूर्वीपासून माहीत आहे की, सबंध जग द्वेषाच्या वातावरणाने कोंदून गेलेले आहे. आता ते अधिक दाट बनत असल्याचे, अधिकाधिक क्रियाशील व परोपकारी बनत असल्याचे मला आढळत आहे.

"व्यावहारिक माणसे होऊ इच्छिणाऱ्या तुम्हा मानवतावाद्यांना" आता जाणीव होण्याची वेळ येऊन ठेपली आहे की, जगामध्ये दोन द्वेष कार्यान्वित आहेत. एक द्वेष लुटारूंमध्ये निर्माण झाला आहे. त्यांच्यातील परस्परस्पर्धा आणि भविष्याविषयीची त्यांची भीती यांच्यापायी तो उत्पन्न झाला आहे. भविष्यकाळात लुटारूंचा नाश घडणे अपरिहार्य आहे. दुसरा द्वेष कामगारवर्गीयांमध्ये निर्माण झाला आहे. आयुष्य जसे आहे त्याबद्दलच्या तिटकाऱ्यापायी तो उत्पन्न झाला आहे आणि कामगारवर्गाच्या सत्ता गाजविण्याच्या हक्काच्या जाणीवेने तो अधिकाधिक तेजस्वीपणे उजळून उठत आहे. ह्या दोन्ही द्वेषभावना अशा तीव्रतेला पोहोचल्या आहेत की, काहीही व कुणीही त्यांच्यात समन्वय घडवू शकणार नाही. त्यांचे शारीरिक द्योतक असलेल्या वर्गांमध्ये लढाई होणे अटळ आहे आणि कामगारवर्गीयांच्या विजयानेच केवळ जगाची द्वेषापासून मुक्तता घडेल.

तुम्ही लिहिता: "इतर अनेकांप्रमाणे आम्हालाही असे वाटते की, तुमच्या देशातील कामगारवर्गाच्या हुकूमशाहीमुळे शेतकऱ्यांवर अत्याचार घडत आहेत." सामाजिक परिस्थितीचा प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या वैज्ञानिक विचाराने

साध्य केलेले शिखर म्हणजे मार्क्स आणि लेनिन यांच्या शिकवणी आहेत व सामाजिक न्यायाकडे, संस्कृतीच्या नव्या प्रकारांकडे, थेट जाण्याचा रस्ता केवळ ह्या शिकवणींच्या शिखरावरूनच स्पष्टपणे दिसतो, अशी एव्हाना जाणीव होऊ लागलेल्या काही अत्यंत थोड्या बुद्धिजीवींप्रमाणे तुम्ही जीवनाचा विचार करा, असा मी सल्ला देईन. ज्या वर्गाचा संपूर्ण इतिहास म्हणजे श्रमिक मानवजातीच्या समूहावरील – कामगारांच्या आणि शेतकऱ्यांच्या – शारीरिक व मानसिक अत्याचारांची एक प्रदीर्घ कहाणी आहे, त्या वर्गाशी असलेले तुमचे जवळचे नाते निदान काही काळापुरते थोडा प्रयत्न करून विसरा. असा प्रयत्न करा आणि तुम्हाला समजेल की, तुमचा वर्ग हाच तुमचा शत्रू आहे. कार्ल मार्क्स खूप शहाणा माणूस होता आणि मिनर्व्हा देवतेप्रमाणे तो ज्युपिटरच्या मस्तकामधून जगात अवतीर्ण झाला असे मानणे चुकीचे ठरेल. तसे नाही. न्यूटन आणि डार्विन यांच्या सिद्धांतांप्रमाणेच, शास्त्रीय अनुभवाच्या आधारावर प्रतिभावंताने रचलेल्या वरवंडीप्रमाणे त्यांची शिकवण आहे. लेनिन मार्क्सपेक्षा अधिक सोपे आहेत आणि शिक्षक म्हणून तेवढेच शहाणे आहेत. तुम्ही ज्याची सेवा बजावता त्या वर्गाचे प्रथम सत्ता आणि वैभवकाळातील दर्शन तुम्हाला ते घडवतील. रक्तपात, धार्मिक कपटभाषा आणि खोटेपणा यांच्यामधून, अमानुष अत्याचारांमधून, त्याने स्वतःला अनुरूप "संस्कृती" कशी उभारली, ह्याचे दर्शन तुम्हाला ते घडवतील. मग ह्या संस्कृतीच्या ऱ्हासाची प्रक्रिया तुम्हाला ते दाखवतील. तिचा पुढील, सद्यःकालीन, भ्रष्टाचार तुम्ही स्वतःच पाहू शकता. नेमक्या ह्या प्रक्रियेमधूनच धास्ती उद्भवते व तुम्ही मला लिहिलेल्या पत्राद्वारे तिला अभिव्यक्ती लाभली आहे.

"अत्याचारा"बद्दल बोलू या. कामगारवर्गीय अधिसत्ता तात्पुरती बाब आहे. निसर्गाच्या आणि भांडवलदारी राज्याच्या कोट्यवधी माजी गुलामांना पुनर्शिक्षित करून त्यांचे त्यांच्या देशाच्या व त्याच्या सर्व संपदेच्या एकच एक मालकात रूपांतर घडविणे आवश्यक आहे. जेव्हा सर्व कामकरी लोक, सर्व शेतकरीवर्ग, समान सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीमध्ये राहू लागेल, स्वतःच्या कुवतीनुसार काम करणे आणि स्वतःच्या गरजांनुसार मोबदला प्राप्त करणे जेव्हा प्रत्येक व्यक्तीला शक्य होईल, तेव्हा कामगारवर्गीय अधिसत्ता गरज म्हणून अस्तित्वात राहणार नाही. तुमच्या आणि "इतर अनेकांच्या" मनातील "अत्याचारा"ची कल्पना म्हणजे गैरसमजूत आहे. पण अनेकदा, सोविएत संघाच्या कामकरी वर्गाविषयीचे आणि त्याच्या पक्षाविषयीचे ते कुभांड आहे; त्यांच्याविषयीची निष्कारण नालस्ती आहे. सोविएत संघातील कामगारवर्गाच्या सांस्कृतिक कार्याला – देशाचे पुनरुज्जीवन करण्याच्या आणि नवे आर्थिक प्रकार संघटित करण्याच्या कार्याला – बदनाम करण्याच्या उद्दिष्टाने, सोविएत संघातील चालू असलेल्या सामाजिक

प्रक्रियेला "अत्याचार" असा शब्दप्रयोग सोविएत कामगारवर्गाच्या शत्रूंनी वापरला आहे.

सक्तीबद्दल बोलणे योग्य ठरेल असे मला ह्याबाबत वाटते. अत्याचारापेक्षा ही बाब अगदी वेगळी आहे. तुम्ही मुलांना साक्षर बनायला शिकवता तेव्हा त्यांच्यावर अत्याचार करत असता का? सोविएत संघाचा कामगारवर्ग आणि त्याचा पक्ष किसानवर्गाला सामाजिकदृष्टया व राजकीयदृष्टया साक्षर व्हायला शिकवत आहे. त्याचप्रमाणे तुम्हा लोकांना, बुद्धिजीवींना, कुणाचीतरी सक्ती जाणवत आहे अथवा "घण आणि ऐरण यांच्या दरम्यान" सापडल्याची शोककारक भावना जाणवत आहे. तुम्हालासुद्धा सामाजिक आणि राजकीय साक्षरतेचे मूळ धडे कुणीतरी शिकवत आहे, पण अर्थात तो कुणीतरी म्हणजे मी नव्हे.

सर्व देशांमध्ये किसानवर्गामधून – दशलक्षावधी छोटे मालक – लुटारू व परपुष्ट निर्माण होतात. ह्याच मातीतून राक्षसी कुरूपतेसह भांडवलशाही निर्माण झाली. शेतकऱ्याच्या सर्व शक्ती, क्षमता आणि गुणवत्ता स्वतःच्या दरिद्री मालमत्तेच्या चितेत गुरफटलेल्या असतात. छोटया मालकाचा सांस्कृतिक वेडपटपणा कोटयधीशाच्या सांस्कृतिक वेडपटपणाशी पूर्णतः समान असतो. तुम्हा बुद्धिजीवींनी हे नीट पाहिले पाहिजे आणि जाणून घेतले पाहिजे. रशियामध्ये ऑक्टोबर क्रांती होण्यापूर्वी शेतकरी सतराव्या शतकातील परिस्थितीमध्ये राहात होते आणि रशियन स्थलांतरितसुद्धा ही वस्तुस्थिती नाकारण्याचे धाडस करणार नाहीत, सोविएत राजवटीविरुद्धचा त्यांचा राग पराकोटीच्या मूर्खतेपर्यंत पोहोचला असला तरीसुद्धा.

शेतकरी चतुर्थ दर्जाचे, अर्धरानटी लोक राहू नयेत. धूर्त शेतमजूर, जमीनदार आणि भांडवलदार यांचे ते भक्ष्य बनू नयेत. कस निघून गेलेल्या जमिनीच्या अगदी छोटया छोटया तुकडयांवर गुन्हेगारांप्रमाणे त्यांना राबावे लागू नये. स्वतःच्या जमिनीला खतपाणी घालण्यास असमर्थ असलेल्या, मशागतीला यंत्रांचा वापर करू न शकणाऱ्या अथवा शेतकीशास्त्राचा विकास करू न शकणाऱ्या दरिद्री निरक्षर मालकाला खाऊ घालण्यास असमर्थ असणाऱ्या ओसाड जमिनीवर त्यांना राबावे लागू नये. भयाण माल्थस सिद्धांताचे समर्थन शेतकऱ्यांनी करू नये. माझ्या मते त्या सिद्धांतामागे धार्मिक विचाराचा कपटीपणा दडलेला आहे. स्वतःच्या स्थानाची वास्तवता व अपमानास्पदता जाणून घेण्यास शेतकरीसमूह जर अद्यापि असमर्थ असतील, तर सक्तीचा वापर करूनसुद्धा त्यांच्यात ही जाणीव बिंबवण कामगारवर्गाचे कर्तव्य आहे. अर्थात अशा सक्तीची गरज नाही, कारण १९१४-१८ च्या कत्तलींच्या यातना भोगलेला आणि ऑक्टोबर क्रांतीने जागृत झालेला सोविएत संघामधला शेतकरी इतःपर आंधळा नाही व व्यवहारी विचार करण्यास तो समर्थ आहे. त्याला यंत्रांचा आणि खतांचा पुरवठा करण्यात येत आहे, सर्व शाळांचे रस्ते

त्याला मोकळे आहेत. दरसाल हजारो शेतकरी मुले अभियंत्यांचे, कृषितज्ज्ञांचे आणि वैद्यकशास्त्राचे अभ्यासक्रम पत्करत आहेत. कामगारवर्गाचे प्रतिनिधित्व करणारा पक्ष सोविएत संघात एकच एक मालक निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे, १६०,०००,००० डोक्यांचा व ३२०,०००,००० हातांचा एकच एक मालक निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे, ह्याची शेतकऱ्याला समज येऊ लागली आहे आणि हीच प्रमुख गोष्ट त्याने समजून घेणे आवश्यक आहे. आपल्या देशात करण्यात येणारी प्रत्येक गोष्ट सर्वांसाठी आहे आणि केवळ श्रीमंतांच्या एका छोटया गटासाठी नाही, हे शेतकरी पाहतो आहे. सोविएत संघात त्याच्यासाठी फक्त उपयुक्त गोष्टी घडत आहेत, हे शेतकऱ्याला दिसत आहे. त्याच्या जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी आणि त्याचे श्रम हलके करण्यासाठी देशातील सव्वीस शेतकी संशोधन संस्था काम करीत आहेत, हे तो पाहतो आहे.

शतकानुशतकांप्रमाणे कंगाल खेडयांमध्ये राहण्याची शेतकऱ्याची इच्छा नाही, तर शेतकी शहरांमध्ये त्याला राहायचे आहे. तेथे त्याच्या मुलांसाठी चांगल्या शाळा आणि चांगली पाळणाघरे असतील; खुद्द त्याच्यासाठी नाटयगृहे, क्लब, ग्रंथालये आणि सिनेमागृहे असतील. शेतकऱ्याला वाढत्या प्रमाणात ज्ञानपिपासा निर्माण होत आहे. सुसंस्कृत राहण्याची त्याची आवड वाढत आहे. जर शेतकऱ्याने हे सर्व समजून घेतले नसते, तर कामगारांच्या आणि शेतकऱ्यांच्या संयुक्त शक्ती-मधून गेल्या पंधरा वर्षांत सोविएत संघात भव्य फलश्रुती साध्य करता आल्या नसत्या.

भांडवलदारी देशांमध्ये कामकरी लोक म्हणजे यंत्रशक्ती आहेत आणि त्यांच्या समूहात स्वतःच्या श्रमाचे सांस्कृतिक महत्त्व न जाणणारे अडाणी आहेत. तुमच्या देशांमध्ये राष्ट्रीय शक्तींच्या लुटारूंच्या, कामकरी जनतेवर परपुष्ट होणाऱ्यांच्या संघटना, ट्रस्ट ह्या मालक आहेत. त्या एकमेकींमध्ये झगडे करतात, पैशामार्फत कार्ये करतात, एकमेकींना नष्ट करण्याचा प्रयत्न करतात. सट्टेबाजारात भयानक उलथापालथी घडवून आणतात. आणि आता सरतेशेवटी, त्यांच्या अराजकवादा-मुळे देशावर अभूतपूर्व अरिष्ट कोसळले आहे. कोटयवधी कामगार उपासमारीमुळे मरत आहेत. राष्ट्राचे आरोग्य निष्फळरीत्या नष्ट होत आहे. बालमृत्यूंचे प्रमाण भयानकपणे वाढत आहे, आत्महत्या वाढल्या आहेत आणि संस्कृतीच्या मूळ मातीचा – तिच्या सजीव मानवी शक्तीचा – क्षय होत आहे. तरीसुद्धा, बेकारांच्या तातडीच्या मदतीसाठी ३७.५ कोटी डॉलर मंजूर करण्याचा लाफोल्लेत्त – कास्टीगन कायदा तुमच्या सेनेटने फेटाळून लावला. 'न्यूयॉर्क अमेरिकन'मध्ये प्रकाशित झालेली आकडेवारी दाखविते की, न्यूयॉर्कमध्ये १९३० मध्ये १५३७३१ बेकार होते आणि घरभाडे न भरल्याबद्दल त्यांच्या कुटुंबियांना घरांमधून बाहेर काढण्यात आले, तर बाहेर काढण्यात आलेल्यांचा १९३१ चा आकडा १९८७३८ होता. यंदाच्या

जानेवारीत, न्यूयॉर्कमध्ये दररोज शेकडो बेकारांना त्यांच्या घरांमधून हाकलून लावण्यात येत होते.

सोविएत संघामध्ये राज्यकारभार करण्याचे आणि कायदे बनवण्याचे काम कामगार व शेतकऱ्यांचा एक सुजाण विभाग करतात. ह्या शेतकऱ्यांच्या विभागाला आता समजले आहे की, जमिनीची खासगी मालकी नष्ट केली पाहिजे, शेतांचे सामाजिकीकरण केले पाहिजे, यांत्रिक पद्धतीने मशागत केली पाहिजे; त्यांना समज आली आहे की, गिरण्या व कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांप्रमाणेच आपणही कामगार आहोत अशी स्वतःची मानसशास्त्रीय पुनर्घडण त्यांनी केली पाहिजे. दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचे तर, त्यांनी देशाचे अस्सल आणि एकमेव मालक बनले पाहिजे. शेतकरी सामुदायिकवाद्यांची आणि कम्युनिस्टांची संख्या सतत वाढत आहे. भूदासपद्धतीच्या वारशामधून नवी पिढी स्वतःला जेव्हा मुक्त करील, शतकानुशतकांच्या गुलामी अस्तित्वामधून जन्माला आलेल्या भोळ्या समजुतींपासून नवी पिढी स्वतःला जेव्हा मुक्त करील, तेव्हा ही संख्या अधिक वेगाने वाढेल.

सोविएत संघात खालून कायदे तयार होतात, कामकरी समूहांमध्ये त्यांचा उद्भव होतो व त्यांच्या महत्त्वाच्या कार्यांमधून ते प्रवाहित होतात. कामगारांच्या आणि शेतकऱ्यांच्या श्रमप्रक्रियांमधून जे परिपक्व बनते – समानांचा समाज निर्माण करणे हे त्या श्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे – तेवढेच फक्त सोविएत सरकार व पक्ष सूत्रबद्ध करतात आणि कायदेशीररीत्या त्याची अंमलबजावणी करतात. पक्ष एवढ्याच मर्यादेपर्यंत हुकूमशहा आहे की, कामकरी समूहांच्या मज्जा-मेंदू व्यवस्थेचे तो संयोजन केंद्र आहे. प्रत्येक व्यक्तीच्या आणि लोकसंख्येतील संपूर्ण समूहाच्या गुणांच्या व क्षमतांच्या विकासाला स्वातंत्र्य आणि संधी उपलब्ध करून देता याव्यात म्हणून शारीरिक शक्तीच्या जास्तीत जास्त भागाचे शक्य त्या वेगाने बौद्धिक शक्तीमध्ये रूपांतर घडविणे, हे पक्षाचे उद्दिष्ट आहे.

व्यक्तिवादाचा स्वीकार केलेले भांडवलदारी राज्य स्वतःच्या हितसंबंधांना आणि परंपरांना अनुसरून युवकांना दक्षपणे शिक्षित करते. अर्थात असे घडणे स्वाभाविक आहे. पण आम्हाला असे आढळते की, नेमके भांडवलदारी समाजातील युवकांमध्येच बव्हंशरीत्या अराजकी विचार व सिद्धांत निर्माण झाले होते व निर्माण होत आहेत. हे अस्वाभाविक आहे. लोक ज्यामध्ये घुसमटत आहेत त्या वातावरणाच्या विचित्र आणि रोगट अवस्थेचे हे निदर्शक आहे. परिणामी, व्यक्तीला अमर्याद स्वातंत्र्य साध्य व्हावे म्हणून समाजाचा नाश करण्याची स्वप्ने ते पाहू लागतात. तुम्हाला कल्पना आहेच की, तुमचे युवक केवळ अशी स्वप्ने पाहात नाहीत, तर त्यांच्यानुसार वागतात. युरोपीय वर्तमानपत्रांमध्ये तुमच्या आणि युरोपीय भांडवलदारी युवकांच्या "चेष्टां"च्या बातम्या – गुन्हेगारी स्वरूपाच्या

चाळचांच्या – वारंवार प्रसिद्ध होत असलेल्या आमच्या दृष्टोत्पत्तीस येत आहे. हे गुन्हे भौतिक गरजांपायी घडत नाहीत, तर "कंटाळवाण्या जीवना"पायी, कुतूहलापायी, "थरारकते"च्या इच्छेपायी घडतात आणि ह्या सर्व गुन्ह्यांच्या तळाशी व्यक्ती व तिचे जीवन यांच्याबद्दलचे अत्यंत कनिष्ठ मत असते. कामगारांच्या आणि शेतकऱ्यांच्या अत्यंत गुणी प्रजेला स्वतःमध्ये सामावून घेऊन व स्वतःच्या हितसंबंधांसाठी तिला सक्तीने राबवून, "विशिष्ट वैयक्तिक समृद्धी", एक आरामशीर गुंफा, एक सोयीस्कर बीळ साध्य करण्याच्या व्यक्तीच्या "स्वातंत्र्या"ची भांडवलदारवर्ग बढाई मारतो. अर्थात तुम्ही नाकारणार नाही की, ग्राम्य समृद्धीच्या वाटेवर, भांडवलदारी आयुष्यातील परिस्थितींनी वाटेत ठेवलेल्या अडथळ्यांना ओलांडून जाण्यास असमर्थ ठरल्यामुळे, तुमच्या समाजातील हजारो गुणी माणसे नष्ट होत आहेत. निष्फळ अंत घडलेल्या गुणी माणसांच्या वर्णनांनी युरोप व अमेरिकेतील साहित्य गच्च भरलेले आहे. भांडवलदारवर्गाचा इतिहास हा त्याच्या मानसिक दारिद्र्याचा इतिहास आहे. आपल्या काळात कोणत्या गुणांची तो प्रौढी मिरवू शकेल ? विविध हिटलरांविना, गौरवोन्मादाची बाधा झालेल्या खुज्या माणसांविना, प्रौढी मिरविण्यास त्याच्यापाशी दुसरे काहीही नाही.

सोविएत संघातील लोक पुनरुत्थानाच्या युगात प्रवेश करीत आहेत. ऑक्टोबर क्रांतीने लक्षावधी गुणी लोकांना महत्त्वाच्या कार्यांना प्रवृत्त केले आहे, पण कामगारवर्गाने स्वतःसमोर धरलेल्या महान ध्येयांच्या पूर्तीसाठी त्या सर्वांची संख्या अद्यापि फारच तोकडी आहे. सोविएत संघात एकही बेकार नाही. आणि मानवी प्रयत्नांच्या सर्व क्षेत्रांमध्ये जरी कधीही व कुठेही नव्हत्या एवढ्या वाढत्या वेगाने काम चालू असले, तरी शक्ती अद्यापि अपुऱ्या पडत आहेत.

तुम्हा बुद्धिजीवींनी, "संस्कृतीच्या मिरासदारांनी," समजून घेतले तर बरे होईल की, कामगारवर्गाने एकदा स्वतःच्या हाती राजकीय सत्ता घेतली, म्हणजे सृजनशील सांस्कृतिक प्रयत्नांना विशाल संधी तुम्हाला उपलब्ध होतील.

भांडवलदारवर्ग संस्कृतीचा कट्टर वैरी आहे आणि इतःपर वैराशिवाय दुसरी कोणतीही भावना त्याच्यात असणे शक्य नाही भांडवलदारी वास्तवतेने, भांडवलदारी राज्यांच्या सपूर्ण व्यवहाराने, ह्या सत्याला दुजोरा दिलेला आहे. सार्वत्रिक निःशस्त्रीकरणाचा सोविएत संघाचा प्रकल्प भांडवलदारांनी नाकारला. एवढी एकच गोष्ट आम्ही असे विधान करण्यास पुरेशी समर्थनीय आहे की, भांडवलदार सामाजिकदृष्टचा धोकेबाज लोक आहेत, नव्या महायुद्धाची तयारी ते करत आहेत. तीव्र संरक्षणसिद्धतेच्या परिस्थितीत ते सोविएत संघाला ठेवत आहेत; सोविएत संघावर हल्ला करण्याची तयारी करणाऱ्या आणि ह्या महाप्रचंड देशाला स्वतःची वसाहत, स्वतःची बाजारपेठ बनवू पाहणाऱ्या भांडवलदारांविरुद्ध संरक्षणअस्त्रे उत्पादन करण्यासाठी कामगारवर्गाला प्रचंड मौलिक वेळ आणि

साधनसामग्री खर्च करायला भाग पाडत आहेत. भांडवलदारांविरुद्ध स्वतःचे रक्षण करण्यासाठी सोविएत संघातील लोकांना प्रचंड प्रमाणात शक्ती व साधने खर्च करावी लागत आहेत. वस्तुतः त्यांचा वापर मानवजातीच्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाला चालना देण्यासाठी केल्यास निर्विवाद हितकर ठरेल, कारण सोविएत संघातील उभारणी प्रक्रिया अखिल मानवजातीच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

द्वेषामुळे आणि भविष्यकाळाच्या भीतीने वेडपट बनलेला भांडवलदारांचा दुर्गंधमय परिसर वाढत्या संख्येने वेडे निर्माण करीत आहे. आपण कोणत्या आरोळ्या ठोकत आहोत ह्याची त्या वेड्यांना अजिबात जाण नाही. त्यांच्यातील एकजण "युरोपातील सभ्य सत्ताधारी आणि मुत्सद्दी" यांना आवाहन करतो : "तिसरी इंटरनॅशनल चिरडून टाकण्यासाठी युरोपने पिवळ्या वंशाचा वापर करण्याची वेळ येऊन ठेपली आहे." ह्या वेड्याने स्वतःच्याच जातीच्या "सभ्य मुत्सद्दी व सत्ताधारी" यांची स्वप्ने आणि इरादे बरळले असणे अगदी सहज शक्य आहे. हा वेडा जे मोठ्यांदा ओरडला, ते करण्याचा गंभीरपणे विचार करणारे "सभ्य गृहस्थ" अस्तित्वात असणे अगदी सहज शक्य आहे. युरोप आणि अमेरिकेवर अदम्य "सभ्य गृहस्थ" सत्ता गाजवतात. हिंदुस्थान, चीन, इंडोचीन येथील घडामोडी युरोपीय लोकांविषयी व एकूण "गोऱ्यां"विषयी वांशिक द्वेष भडकवण्यास कारणीभूत ठरतील. हा तिसरा द्वेष असेल. तुम्ही, मानवतावाद्यांनो, ह्यावर चिंतन केलेत तर बरे होईल की, तुम्हाला अथवा तुमच्या मुलांना ह्या द्वेषाची गरज आहे काय? आणि जर्मनीतील "वांशिक शुद्धते"च्या शिकवणीमधून म्हणजे परत एकदा वांषिक द्वेषामधून, तुम्हाला कोणत्या चांगल्या गोष्टीचा लाभ होणार आहे? हा एक नमुना :

"गोएथेच्या आगामी शंभराव्या पुण्यतिथीनिमित्त वायमार येथे येणाऱ्या, गेरहार्ट हॉप्टमान्न, थॉमस मान्न, वॉस्टर व्हॉन मोलो आणि सोरबोन्नचे प्राध्यापक हेन्री लीख्तेनबेर्जे ह्यांच्या आगमनाचा निषेध करण्याचा हुकूम थूरींगियामध्ये नात्सी पुढारी झौकेल यांनी नॅशनल-सोशिलिस्ट वायमार गटाला दिला आहे. हे लोक बिगर-आर्य वंशाचे आहेत असा झौकेल यांचा आरोप आहे."

त्याचप्रमाणे, एका साध्या प्रश्नाचा तुम्ही निर्णय घेण्याची वेळ येऊन ठेपली आहे : "संस्कृतीच्या मिरासदारांनो," तुम्ही कोणाबरोबर आहात? संस्कृतीच्या हातकामगारांच्या बाजूने तुम्ही आहात का आणि जीवनाचे नवीन प्रकार निर्माण करण्याची तुमची तयारी आहे का? अथवा तुम्ही त्यांच्या विरुद्ध आहात आणि बेजबाबदार लुटारूंच्या जातीची, डोक्यापासून पायांपर्यंत सडलेल्या जातीची, केवळ सुस्तीमधून कार्य करणाऱ्या जातीची, परंपरा पुढे राखण्याचा तुमचा इरादा आहे?

१९३२ □

कामगारवर्गीय लेखक

पत्रोवस्क शहरातील तंत्रविद्यालयाच्या साहित्यवर्तुळाच्या सदस्यांना पत्र

प्रिय साथीहो ! मी " कामगारवर्गीय " अथवा " बिगर–कामगारवर्गीय " लेखक आहे ह्याबद्दलच्या टीकाकारांमधील वादात वैयक्तिकरीत्या मला मुळीच रस नाही. सोविएत संघाच्या सर्व कानाकोपऱ्यांमधील कामगारांकडून महोत्सवानिमित्त मला आलेल्या अभिनंदनांमध्ये " आमचा ", " कामगारवर्गीय ", " साथी " असे कामगारांनी एकमुखाने मला संबोधले आहे. आणि टीकाकारांपेक्षा कामगारांचा आवाज निश्चितच मला जास्त महत्त्वाचा वाटतो. कामगार मला परका मानत नाहीत, तर स्वतःचा " साथी " मानतात, ह्या वस्तुस्थितीचा मला फार अभिमान वाटतो. माझा हा प्रामाणिक अभिमान आहे आणि मोठा गौरव आहे.

सोविएत जनता ज्या वास्तव परिस्थितीमध्ये आहे, त्या परिस्थितीशी " कामगारवर्गीय " हा शब्दप्रयोग पूर्णतः सुसंवादी ठरत नाही असे मला वाटते.

तुम्हाला माहीतच आहे की, स्वतःच्या मिळकतीवर राहणाऱ्या आणि अस्तित्वाची इतर कोणतीही साधने नसलेल्या लोकांचा वर्ग म्हणजे " कामगारवर्ग ". पण ह्या देशात ज्यांनी राजकीय सत्ता हस्तगत केली आहे आणि आता हळूहळू देशाच्या अर्थव्यवस्थेला व भांडारांना जे स्वतःच्या कबजात घेत आहेत, अशा सोविएत कामगारांना आणि शेतकऱ्यांना, कामकरी समूहांना, ही प्रवृत्ती लागू करणे शक्य आहे का ? हा प्रश्न सोडविणे तुमचे काम आहे.

तुम्ही विचारता : " खरा कामगारवर्गीय लेखक कोणत्या लक्षणांवरून ओळखायचा ?" अशी खूप लक्षणे आहेत असे मला तरी वाटत नाही. माणसाला आतून आणि बाहेरून अशा दोन्ही बाजूंनी दडपणाऱ्या प्रत्येक गोष्टीबद्दल लेखकाला वाटणारा सक्रिय तिटकारा; माणसाच्या क्षमतांच्या मुक्त वाढीला आणि विकासाला अटकाव करणाऱ्या प्रत्येक गोष्टीबद्दल लेखकाला वाटणारा तिटकारा; रिकामटेकडे, परपुष्ट, हलकट माणसे, हांजीखोर आणि एकूण कोणत्याही प्रकारचा व दर्जाचा प्रत्येक खलपुरुष, ह्यांच्याबद्दल लेखकाला वाटणारा कठोर तिटकारा.

माणूस हा सर्व सृजनशील शक्तींचा उगम आहे, जगातील सर्व प्रकारच्या

वस्तूंचा आणि सर्व चमत्कारांचा निर्माता आहे, असा मानवाबद्दल लेखकाला वाटणारा आदर; माणूस हा नैसर्गिक आपत्तींविरुद्ध झुंजणारा आहे आणि नव्या " दुसऱ्या " निसर्गाचा निर्माता आहे, म्हणून लेखकाला वाटणारा आदर. स्वतःच्या शारीरिक शक्तींच्या वृथा व्ययातून – वर्गीय राज्यात अपरिहार्यपणे मूर्ख आणि दुष्ट असलेले व्यय – मुक्तता व्हावी म्हणून मानवाने स्वतःच्या कष्टांमधून, विज्ञानामधून आणि तंत्रांमधून हा नवा " दुसरा " निसर्ग निर्माण केला आहे.

सामुदायिक श्रमाला लेखकाने दिलेले काव्यात्म रूप : एका माणसाची दुसऱ्यावर सत्ता आणि निरर्थक शोषण ह्यांना पूर्णतया वगळून टाकणारे नवे जीवन-प्रकार निर्माण करणे, सामुदायिक श्रमाचे ध्येय आहे.

स्त्री म्हणजे केवळ शरीरसुखाचे साधन नाही, तर खडतर जीवनक्रमातील ती खात्रीशीर साथी आणि मदतनीस आहे, असा लेखकाचा स्त्रीविषयीचा दृष्टिकोन.

मुलांविषयी दयाळू वृत्ती : आपण करीत असलेल्या प्रत्येक गोष्टीबाबत आपण मुलांना जबाबदार असतो.

जीवनाबाबत वाचकांचा क्रियाशील दृष्टिकोन जागा करण्याचे, स्वतःच्या सामर्थ्याबाबत त्यांच्यात विश्वास बिंबविण्याचे, जीवनाच्या महान आशयाला व श्रमाच्या आनंदाच्या महान महत्त्वाला समजून – जाणून घेण्यास आतून – बाहेरून त्यांना प्रतिबंध करणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर ते विजय मिळवू शकतील असा विश्वास त्यांच्यात निर्माण करण्याचे, लेखकाचे प्रयत्न.

असा लेखक श्रमिक जगताला आवश्यक आहे असे थोडक्यात माझे मत आहे.

तुम्हाला माहीत आहे की, सत्ता हाती घेण्याची इच्छा श्रमिक जगात जागी होत आहे आणि ही प्रक्रिया सबंध जगभर चालू आहे; केवळ युरोपातच नव्हे तर आशिया आणि आफ्रिकेतही.

आणि तुम्हाला, सोविएत संघातील कामगारसामर्थ्याच्या अग्रदलाला, ठाऊक पाहिजे की, जगामधील कामकरी समूहांच्या दृष्टीने तुम्ही एक उदाहरण आहात, एक धडा आहात; कोटचवधी डोळे तुमच्याकडे पाहात आहेत आणि कोटचवधी कान तुमच्याकडे लागले आहेत.

तुम्हा तरुण मंडळींवर इतिहासाने एक फार मोठी कामगिरी सोपविली आहे – मानवाबद्दलच्या नव्या दृष्टिकोनाचे पुरस्कर्ते होणे; नवजीवनाच्या उभारणीचे शिक्षक होणे. ह्यामुळे परिश्रमपूर्वक अभ्यास करणे तुम्हाला क्रमप्राप्त आहे-माणूस जेवढा अधिक ज्ञानी बनतो, तेवढा तो अधिक सामर्थ्यवान होतो, ही गोष्ट निर्विवाद आहे. आपले ध्येय किती महान आहे आणि भव्य आहे, ही जाणीव माणसाला अधिक सामर्थ्यवान बनविते.

आणि मग सर्वसामान्य अशा "जीवनातील सर्व क्षुल्लक गोष्टी", सगळी जुनी गलिच्छता आणि घाण, "शतकानुशतकांची धूळ", "क्षुद्र प्रवृत्तिवादा"ची "मध्यमवर्गीय" लाजिरवाणी मनोरचना बनविणाऱ्या सर्व गोष्टी, लेखकाच्या दृष्टीने अस्तित्वात राहात नाहीत; त्यांची त्याला बाधा होऊ शकत नाही.

"घरकोंडी वृत्ती"च्या फालतू विषाला लेखकाने बळी पडू नये. त्याने त्याविरुद्ध निग्रहाने संघर्ष करावा. "जीवनातील क्षुल्लक गोष्टींचा" त्याला अडथळा होतो, अडचण घडते असे त्याने विव्हळू नये. दैनंदिन जीवनातील दोष प्रत्येकाला अडथळा करतात. तक्रार करणे चांगले नव्हे, कट्टर संघर्ष आणि आनंददायी श्रम ह्यांच्या साह्याने आपल्या जीवनातील सर्व अडचणींवर मात करता येते, हे त्याला माहीत असावे.

लेखकाला ठाम माहीत असावे आणि त्याने आठवण ठेवावी की, माणूस स्वभावतः "खलपुरुष" नाही, पण वर्गीय शासनसंस्थेच्या तिरस्करणीय समाज-रचनेमुळे तो बिघडला आहे. हिंसेविना, मत्सर, लोभ, तिटकारा ह्यांना जागृत केल्याविना, सक्तीच्या आणि अनेकदा निरर्थक अशा श्रमाबद्दल चीड निर्माण केल्याविना, सहजप्राप्तीच्या प्रयत्नांविना, हलक्या आणि नीच सुखाविना, व्यसनांविना, मद्यपान व इतर हलकट गोष्टींविना, ही शासनसंस्था अस्तित्वातच राहू शकत नाही.

तुम्हा तरुण मंडळींना माहीत हवे आणि तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे की, कुणीही "जन्मतः हलकट" असतो असे प्रतिपादन करणे फायदेशीर व आवश्यक असलेली माणसे आहेत. ही माणसे म्हणतात की, कुणाच्याही शारीरिक, पाशवी अंतःप्रवृत्तींमध्ये नीचपणा दडलेला असतो, "सैताना"मार्फत त्या नीचपणाला जागे करण्यात आले आणि करण्यात येते, सर्व मानवी कृत्ये म्हणजे "मानवी आत्म्याच्या कबजासाठी सैतान व देव यांच्यात चाललेल्या चिरंतन संघर्षाचे प्रतिबिंब" आहेत.

अधिक चांगल्या जीवनाबद्दलच्या, श्रमाला आणि सृजनाला मुक्त करण्याच्या मानवी इच्छेला मर्यादा घालण्याची, त्या इच्छेला ठार मारण्याची आकांक्षा, मानवाला वर्गीय शासनसंस्थेचा आणि समाजाचा गुलाम बनविण्याची आकांक्षा' अशा प्रवचनाचा आधार आहे. माणूस म्हणजे कच्चा माल आहे, कच्चा धातू आहे व त्याच्यापासून कुऱ्हाडी, साखळ्या, इस्त्र्या – थोडक्यात, सर्व हत्यारे आणि उपकरणे – बनविता येतात, असे हे प्रवचन मानते.

ह्या सिद्धान्ताचे पुरस्कर्तेही हलकट आहेत. म्हणजे प्रामाणिक, क्रियाशील, कामकरी जीवनाला हे लोक नालायक आहेत. कामकरी लोकांच्या दृष्टीने दुष्ट आणि अपमानास्पद अशा जीवनाच्या प्रकारांविना इतर जीवनप्रकारांची जे कल्पनाच करू शकत नाहीत व तशी कल्पना करण्याची ज्यांची इच्छा नाही, असे

हे लोक आहेत. तथाकथित "जंगली" – आफ्रिकी निग्रो टोळ्या अथवा याकुत, बुर्यात, तुंगूस ह्या सैबेरियातील जमाती – प्रत्यक्षात अत्यंत दयाळू माणसे असल्याचे मानववंशशास्त्रज्ञांनी दाखवून दिले असल्यामुळे, "जन्मतः" अथवा सैतानाने निर्माण केल्यापायी दुष्ट अंतःप्रवृत्ती असतात हा सिद्धान्त सहजरीत्या खोटा पाडता येतो.

ह्या प्रवचनकारांपैकी अधिक सुजाण अथवा अधिक धूर्त लोकांनी "उत्क्रांतीचा सिद्धान्त" नामीरीत्या शोधून काढला आहे. सामाजिक आणि शासनसंस्थीय जीवनप्रकारांचा मंद, सातत्यशील विकास.

पण सुजाणता आणि धूर्तता जवळजवळ एकच व सारखी गोष्ट आहे. तुम्हाला एव्हाना माहीत आहे की, भांडवलदारी समाजाच्या "उत्क्रांती"मधून चार वर्षेपर्यंत रक्तपाती कत्तली घडल्या; अत्यंत निकोप प्रकृतीच्या दशलक्षावधी माणसांचा त्या कत्तलींमध्ये नाश घडला; कामगारांचा, "उत्क्रांती"च्या रक्षक स्वरूपावर विश्वास ठेवणाऱ्या सोशलिस्टांचाही त्यांनी बळी घेतला; "सांस्कृतिक" युरोपचे प्रचंड जंगलीकरण घडले; रक्तपातामधून अफाट संपत्तिसंचय करणारे अगणित सट्टेबाज निर्माण झाले; नव्या आणि अधिक घनघोर युद्धाचा धोका निर्माण झाला आहे.

सरतेशेवटी तुम्हाला ठाऊक आहे की, सोविएत संघाने सादर केलेला सार्वत्रिक निःशस्त्रीकरणाच्या कराराचा मसुदा उत्क्रांतीच्या सिद्धांताच्या संरक्षक स्वरूपावर विश्वासणाऱ्या सांस्कृतिक लोकांनी फेटाळून लावला.

तुम्हाला जाणीव झाली पाहिजे आणि तुम्ही नेहमी लक्षात ठेवले पाहिजे की, राष्ट्रसंघाचा कुप्रसिद्ध भेकडपणा म्हणजे दुसरेतिसरे काहीही नव्हे, तर युरोपीय संस्कृतीची आणि स्वतःच्या मानवताविरोधी आशयाला उघड केलेल्या वर्गीय समाजाची अंतिम दिवाळखोरी आहे.

तुम्हाला प्रामाणिक माणसे बनायचे असेल, तर तुम्ही क्रांतिकारक झाले पाहिजे.

१९२८

☐

कामगारवर्गीय मानवतावाद

"जग आजारी आहे" – केवळ बोल्शेविकांनी असे प्रतिपादन केले नाही, तर काव्यात्म प्रवृत्तीच्या मानवतावाद्यांनीही असे प्रतिपादन केले. अखेरीस त्यांनाही समजून चुकले की, स्वतःचा लांडग्यासमान "स्वभाव", "मानवप्रेम", "दया", "औदार्य" आणि इतर भावनांखाली लपविण्याचा प्रयत्न करणारे द्विपाद हिंस्र पशू व्यावहारिक उपयोगात आणता येत नाहीत, त्याचे क्रयवस्तूत रूपांतर करता येत नाही आणि त्यांना ग्राहक मिळत नाहीत. उलट, व्यापारी आणि औद्योगिक नफ्यावर त्यांचा अपायकारक परिणाम घडतो.

"जग वेडं बनलंय" – श्रमजीवींच्या जगावर भांडवलाच्या बेजबाबदार आणि अमानुष सत्तेचे रक्षण व समर्थन करण्याचा, तसेच, कामगारांच्या शक्तीचे मालकांनी चालविलेल्या अनिर्बंध आणि एव्हाना निरर्थक अशा शोषणाचे समर्थन करण्याचा ज्यांनी व्यापार बनविला आहे असे लोक जास्त मोठ्यांदा ओरडत आहेत.

भांडवलदारवर्गाने सरंजामदारांच्या दुबळ्या हातांमधून सत्ता खेचून घेतल्यानंतर जवळजवळ ताबडतोब भांडवलशाहीचे "आजारपण" सुरू झाले. ह्या आजाराची सर्वप्रथम दखल घेतली आणि त्याबाबत आकांताने ओरड केली फ्रीड्रिख नीत्शे ह्या कार्ल मार्क्स यांच्या समकालीनाने. योगायोग नामक गोष्ट अस्तित्वात नाही. जीवनातील प्रत्येक घटनेला तिचे कारण असते. आणि हा योगायोग नव्हे की, मार्क्स जेव्हा शास्त्रशुद्धरीत्या व निर्विवादरीत्या भांडवलशाहीच्या अधःपाताची अटळता आणि कामगारवर्गाच्या सत्तेची अपरिहार्यता दाखवीत होते, त्याच वेळी "सोनेरी पशू"च्या अनिर्बंध सत्तेच्या कायदेशीरपणाचा विकृत आणि भेदरलेल्या माथेफिरूच्या बेभानतेने नीत्शे पुरस्कार करीत होते. नीत्शेपूर्वी भांडवलदारी शासनसंस्था, धर्म आणि नीतिमत्ता ह्यांना मॅक्स स्टर्नरनी दूषणे दिली होती. व्यक्तीच्या अनिर्बंध अहंकारवादाच्या हक्काचा त्यांनी पुरस्कार केला होता. ही अराजकवादी निंदा निश्चितरीत्या "मानवतावादा"ची निंदा आहे. सरंजामशाही व सरंजामदारांचे सैद्धांतिक पुढारी चर्च, यांच्याविरुद्ध

मध्य युगात भांडवलदारवर्गाने संघर्ष सुरू केला तेव्हापासूनच त्याने मानवतावादाला उत्क्रांत करण्यास आरंभ केला होता. ल्यूथर, काल्विन इत्यादींच्या चर्चमधील सुधारणांमधून निर्माण झालेल्या ह्या "मानवतावादा"मधील अडचणींची आणि आत्मविसंगतींची भांडवलदारांना स्वतःच्या व्यावहारिक जीवनात फार लवकरच जाणीव झाली होती. ह्या सुधारणांनी "मानवतावादी" तत्त्वांची जागा बायबलने घेतली असून त्याच्यानुसार भांडवलदारी राज्य ज्याविना अस्तित्वातच राहू शकणार नाही अशा टोळी-वैमनस्याला, कत्तलीला, दरोडेखोरीला, फसवणुकीला व बाकीच्या सर्व गोष्टींना अगदी स्वाभाविकच नव्हे तर कौतुकास्पदही मानले होते. ल्यूथरपूर्वी चर्चने संस्कृतीच्या कारागीरांना ख्रिस्तासाठी धीराने यातना सोसण्याची शपथ घातली होती. पण धर्मगुरूंना न शोभणाऱ्या सडेतोडपणे सोळाव्या शतकात किसान-कारागीरांच्या क्रांतिकारक उठावावेळी त्याने शिकविले : "अशा रीतीनं जगा आणि काम करा ज्यायोगे राजांना आणि सरदारांना तुमच्यावर नियंत्रण राखणं सोपं व सुखाचं होईल. संयम राखा, आधीन व्हा, देह आणि मालमत्ता शरण करा, तुमच्या वरिष्ठांविरुद्ध आणि जुलूमशहांविरुद्ध उठाव करू नका ! "

आपल्या काळातील भांडवलदारी "मानवतावादा"चा खोटेपणा आणि ढोंगीपणा दाखविण्याची गरज नाही. भांडवलदार फॅसिझमला चालना देत आहेत आणि हिंस्र पशूचे सुळे इतःपर झाकू न शकणारा जुनाट बुरखा फेकून द्यावा. त्याप्रमाणे स्वतःच्या मानवतावादाचा त्याग करीत आहेत. असा त्याग करण्याचे कारण म्हणजे त्यांना समजून चुकले आहे की, त्यांच्या विभक्त व्यक्तिमत्त्वाला आणि ऱ्हासाला कारणीभूत ठरलेल्या अनेक गोष्टींमध्ये मानवतावादाचाही समावेश आहे. उपरीनिर्दिष्ट वस्तुस्थिती दाखवितात की, जगातील दुष्टाव्यांना पाहून जेव्हा संवेदनाशील माणसे अस्वस्थ होतात आणि ह्या दुष्टाव्यांना कमी करण्याच्या उद्देशाने मानवी प्रेमाचा पुरस्कार करण्याचा भाबडा यत्न करतात, अथवा भाषणबाजीच्या बुरख्याखाली त्या दुष्टाव्यांना लपवू पाहतात. तेव्हा जीवनाचे मालक — दुकानदार — जी माणसे दारिद्र्याने, जुलुमाने, दडपशाहीने व दुकानदारांच्या जगव्यापी "सांस्कृतिक" कारवायांच्या अटळ इतर परिणामांपायी संत्रस्त बनली आहेत, त्या माणसांना शांत करण्याचा प्रयत्न म्हणूनच केवळ अशा शिकवणीला परवानगी देतात. पण कामकरी जनसमूहांच्या ह्या संत्रस्ततेने ज्या क्षणी सामाजिक–क्रांतिकारक रूपे धारण केली, त्याच क्षणी भांडवलदारांनी "कृती"ला "प्रतिगामित्वा"चा टोला दिला.

आमच्या उदारमतवादी भांडवलदारवर्गाने ह्या कायद्याला आनंदाने मान्य केले. १९०५–०६ च्या घटनांनंतर, 'वेखी' ह्या पश्चात्तापदग्ध पुस्तकात त्यांनी जाहीरपणे घोषित केले. "लोकांच्या संतापापासून बागनेटांनी आमचे रक्षण केल्या-

बद्दल आम्ही सरकारचे कृतज्ञ राहिले पाहिजे." सरकार त्यावेळी स्तोलीपिन नामक मंत्र्याच्या हाती होते. त्याने हुकूमशाही गाजवून पाच हजारांहून अधिक कामगार-किसानांना फासावर चढविले.

आपल्या आजच्या काळात सरकारला ऐतिहासिक आणि शास्त्रशुद्ध पाया असलेल्या, अस्सल वैश्विकरीत्या मानवी अशा मार्क्स–लेनिन ह्यांच्या कामगारवर्गीय मानवतावादाला भयानकरीत्या तोंड द्यावे लागते. भांडवलाच्या लोखंडी नख्यां-मधून सर्व वंशांच्या आणि राष्ट्रांच्या कामकरी लोकांची संपूर्ण मुक्ती करणे हे त्या मानवतावादाचे ध्येय आहे. मानवी प्रेमाच्या ह्या अस्सल तत्त्वप्रणालीने निर्विवाद-रीत्या सिद्ध केले आहे की, भांडवलाच्या लोखंडी नख्या कामगार बनवतात आणि कामगारवर्गीय भांडवलशाहीसाठी "सुरेख जीवन" निर्माण करतात, पण स्वतः मात्र पददलित कंगाल राहतात.

हा क्रांतिकारक मानवतावाद कामगारवर्गाला भांडवलशाहीविरुद्ध कठोर युद्ध करण्याचा ऐतिहासिकरीत्या समर्थनीय हक्क देतो; भांडवलशाही जगताच्या सर्व राक्षसी अधिष्ठानांना नष्ट करण्याचा आणि त्यांचा संहार करण्याचा हक्क देतो. मानवजातीच्या इतिहासात प्रथमच अस्सल मानवी प्रेमाला सृजनशील शक्ती म्हणून संघटित करण्यात येत आहे. अत्यंत नगण्य अल्पसंख्यांच्या अमानुष आणि अर्थहीन सत्तेमधून शेकडो दशलक्षावधी कष्टकऱ्यांना मुक्त करण्याचे ध्येय त्याने स्वतःसमोर ठेवले आहे. शरीरश्रम करणाऱ्या शेकडो दशलक्षावधी मजुरांना ते सांगते आहे की, त्यांच्याच श्रमांमधून संस्कृतीची सर्व भांडारे निर्माण झाली आहेत आणि ह्या भांडारांचा वापर करून कामगारवर्गीयांनी एक नवी, सार्वत्रिकरीत्या मानवी, समाजसत्तावादी संस्कृती निर्माण केली पाहिजे व जगातील कामकरी लोकांमध्ये ती बांधिलकी आणि समता ठामपणे स्थापन करील.

हा कामगारवर्गीय मानवतावाद म्हणजे केवळ कल्पनारंजन नव्हे, अथवा तत्त्वप्रणाली नव्हे. समाजसत्तावादी सोविएत संघाचा कामगारवर्ग त्याला लढाऊ-रीत्या, धीटपणे आणि शौर्याने आचरणात आणीत आहे व त्याने एव्हाना दाखवून दिले आहे की, असंख्य राष्ट्रीय आणि वांशिक घटकांच्या पूर्वीच्या भांडवलदारी, शेतगड्यांच्या "रानटी" रशियामध्ये राष्ट्रजमातींची बांधिलकी व समता खरो-खरीच साध्य करण्यात आली आहे; शारीरिक शक्तीच्या अफाट साठ्यांना बौद्धिक शक्तीमध्ये रूपांतरित करण्याची प्रक्रिया खरोखरीच आणि निर्विवादपणे विकसित होत आहे.

कामगारवर्गाच्या क्रांतिकारक जाणीवेच्या वाढीला तोंड देण्यासाठी सर्व देशांचे भांडवलदार काय करीत आहेत ?

अब्जावधी कामकरी लोकांवर स्वतःची सत्ता कायम राखण्यासाठी आणि

अर्थहीनरीत्या श्रमाचे शोषण करण्याच्या स्वतःच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी भांडवलदार आपल्या शक्तीचा प्रत्येक औंस खर्च करीत आहेत व फॅसिझम संघटित करीत आहेत. फॅसिझम म्हणजे भांडवलदारी समाजातील निःशक्त अशा शरीरदृष्टचा व नैतिकदृष्टचा रोगट स्तराचे भांडवलाने केलेले एकत्रीकरण आणि संघटन. १९१४-१८ च्या युद्धाचे परिणाम घडलेल्या वेडसर मुलांचे एकत्रीकरण. मध्यमवर्गाच्या पराभवाचा आणि पराभवाएवढ्याच भांडवलदारवर्गाला अनर्थकारी ठरलेल्या विजयांचा " उलट सूड घेणाऱ्यांच्या " मुलांचे एकत्रीकरण. पुढील वस्तुस्थितीवरून ह्या तरुणांच्या मनाची घडण स्पष्ट होते. यंदाच्या मे महिन्याच्या आरंभी, जर्मनीतील एस्सेन गावी

> " चौदा वर्षांच्या हाईन्झ ख्रिस्तेन ह्या मुलाने त्याचा तेरा वर्षांचा मित्र फ्रिटझ वाल्केनहोर्स्ट ह्याला ठार मारले. खुन्याने शांतपणे सांगितले की, त्याच्या मित्रासाठी त्याने आधीच थडगे खणून ठेवले होते, मग त्याने त्याला त्या थडग्यात जिवंत लोटून दिले व तो घुसमटून मरेपर्यंत त्याचे डोके वाळूत दाबून ठेवले. वाल्केनहोर्स्टपाशी असलेला हिटलरी हल्ला चढविणाऱ्या सैनिकाचा गणवेष हस्तगत करण्यासाठी खून करण्यास तो प्रवृत्त झाला असे तो म्हणाला."

फॅसिस्टांच्या कवायती पाहिलेल्या कुणालाही समजेल की, आजारी माणसांच्या सर्व भावनावेगांनिशी जगण्याची इच्छा बाळगणाऱ्या आणि त्यांच्या विषारी रक्तामधील कुजक्या क्षोभाला वाट मोकळी करून देण्याचे स्वातंत्र्य त्यांना लाभवून देईल अशी कोणतीही गोष्ट स्वीकारण्याची तयारी असलेल्या, हाडे वाकलेल्या, रक्तपिती झालेल्या, क्षयी तरुणांच्या त्या कवायती असतात. हजारो फिकट आणि रक्तक्षयी चेहऱ्यांमध्ये निकोप व टवटवीत चेहरे अत्यंत ठळकपणे उठून दिसतात, कारण ते फार थोडे असतात. अर्थात ते चेहरे असतात कामगारवर्गाच्या जाणीवबद्ध वर्गशत्रूंचे अथवा मध्यमवर्गीय साहसवाद्यांचे, कालच्या सामाजिक-लोकशाहीवाद्यांचे, अथवा मोठे व्यापारी होऊ इच्छिणाऱ्या छोट्या व्यापाऱ्यांचे. जर्मन फॅसिस्ट पुढारी कामगार-किसानांना वंचित ठेवून ह्या छोट्या व्यापाऱ्यांना थोडे इंधन अथवा बटाटे मोफत भेट देतात आणि त्यांची मते विकत घेतात. मुख्य वेटरना स्वतःच्या मालकीची छोटी रेस्तराँ हवी असतात, मोठ्या चोरांना सत्ताधाऱ्यांनी परवानगी दिलेल्या चोऱ्या करण्याची छोट्या चोरांची इच्छा असते — आणि अशा लोकांमधून फॅसिझम स्वतःचे " सदस्य " निवडतो. फॅसिस्ट कवायत ही भांडवलशाहीच्या सामर्थ्याचे आणि दुर्बलतेचे दर्शन एकाच वेळी घडविणारी कवायत असते.

ह्या इकडे डोळेझाक करायला नको : क्रांतिकारक कामगारवर्गाच्या निर्णायक

सामर्थ्याची अद्यापि जाणीव न झालेले अनेक कामगार फॅसिस्टांमध्ये आहेत. जागतिक परपुष्ट – भांडवलशाही – अद्यापि चांगलाच सामर्थ्यवान आहे, कारण कामगार आणि शेतकरी अजूनही त्याच्या हाती शस्त्रे व खाद्यपदार्थ ठेवीत आहेत, अजूनही स्वतःच्या रक्ता–मांसाने त्याचे पोषण करीत आहेत, ही गोष्ट आपण स्वतःपासून लपवून ठेवायला नको. ह्या वादळी काळामधील ही अत्यंत शोचनीय आणि लाजिरवाणी परिस्थिती आहे. बाजारपेठेमधील किंमतींची विशिष्ट पातळी कायम राहावी म्हणून अन्नपदार्थांचा नाश करण्यासारख्या गोष्टी बेकार आणि उपाशी लोक संयमाने सहन करतात ही किती आश्चर्यकारक बाब आहे. ज्या काळात बेकारी वाढत आहे, वेतने खाली घसरत आहेत आणि मध्यमवर्गाची क्रयशक्तीसुद्धा घटत आहे, अशा वेळी बेकारांचा आणि भुकेल्यांचा संयम आश्चर्यजनक आहे.

एखाद्याला वाटेल की, ब्रिटिश कामगारवर्गाच्या बेकार बंधूंच्या पुढे उद्‌धृत केलेल्यासारख्या दुष्ट अपमानांनी ब्रिटिश कामगारवर्गाच्या मानवी प्रतिष्ठेत सखोल व सक्रिय तिटकाऱ्याची खळबळ माजेल :

> "इंग्लंडातील सेरे शहरात कुत्र्यांसाठी पेस्ट्री पक्वान्ने विकणारे एक दुकान प्रथमच उघडण्यात आले आहे. ह्या दुकानात सर्व कुत्र्यांसाठी पेस्ट्री विकण्यात येतात आणि घर नसलेल्या व उपाशी कुत्र्यांना अन्न आणि निवारा देण्यात येतो. ब्रॉकहर्स्ट येथे काही आठवड्यांपूर्वी निधन पावलेल्या मि. जेम्स पॅटरसन यांनी देणगी दिलेल्या निधीमधून हे दुकान उघडण्यात आले आहे."

अशा प्रकारच्या लज्जास्पद आणि माणूसघाण्या उधळमाधळीचे अनेक प्रकार इंग्लंडात – "उमरावी वंशाच्या" भूमीत – वारंवार घडत आहेत. फार मोठी शक्यता आहे की, स्वतःचा ऱ्हास अपरिहार्य असल्याची पॅटरसनांना आंतरिक जाणीव झाल्याचे ते द्योतक आहेत आणि जीवनाचा अखेरचा निरोप घेताना जास्तीत जास्त घाण करून मनातील सूडभावनेला वाट मोकळी करून देण्याच्या पॅटरसनांच्या उमरावी ऊर्मीचे निदर्शक आहेत.

पौगंडावस्थेतील मुलांना आणि युवकांना रिवॉल्वरांबरोबरच कालबाह्य राष्ट्रवादी व वंशवादी विचारांनी शस्त्रसज्ज करून आणि सामाजिक माणूसघाणेपणाची व खून-संहाराची दुष्ट वासना युवकांच्या मनात बिंबवून, क्रांतिकारक कामगारवर्गाविरुद्धच्या लढाईत त्यांना पोलिसांचे हस्तक बनविण्याचे कामच केवळ भांडवलदार करीत आहेत असे नाही, तर त्यांचे विषामध्ये रूपांतर करीत आहेत. मानवी संहाराच्या आधुनिक यांत्रिक शस्त्रास्त्रांनी सुसज्ज अशा

कामगारांच्या आणि शेतकऱ्यांच्या सेनेत हे विष टोचण्यात येईल. भांडवलदारांना चांगली आठवण आहे की, पाशवी बराकी प्रशिक्षणाची शिस्त अंगी बाणवलेल्या कामगारांनी आणि शेतकऱ्यांनी १९१८–२० मध्ये दाखविले होते की, स्वतःच्या वर्गशत्रूची मूर्खपणाने, आत्मघातकीपणाने आणि यांत्रिकपणे ते किती सेवा बजावतील ह्याची एक मर्यादा आहे; आणि त्या मर्यादेपलीकडे – दशलक्षावधी कामगारांनी आणि किसानांनी एकमेकांच्या कत्तली केल्यावर व एकमेकांना अपंग बनविल्यावर – बागनेटे आणि तोफा भांडवलाच्या हितसंबंधांची सेवा करीत नाहीत. "कधीच नसण्यापेक्षा थोडा उशीर झाला तरी चालेल" हे अर्थात खरे, पण ह्या बाबतीत वर्गशत्रूपासून शिकणे उत्तम : कामगाराला आपला प्रामाणिक हात भांडदाराविरुद्ध कायद्याने उगारायला अवसर मिळण्यापूर्वीच भांडवलदार कामगाराला नष्ट करतो.

युरोपातील युवकांवर फॅसिझमने घडविलेल्या संहारक आणि आचारभ्रष्ट प्रभावाची शेकडो उदाहरणे साक्ष देत आहेत. ह्या वस्तुस्थितीची गणना करू लागल्यास पोटात ढवळून येते; एवढेच नव्हे तर ज्या वाढत्या उत्साहाने आणि विपुल प्रमाणात भांडवलदारवर्ग घाण पसरवीत आहे तिला मनात साठवून ठेवण्यास स्मरणशक्ती नकार देत आहे, पण मी निर्देश करीन की, ज्या देशात कामगारवर्ग धीटपणे आणि यशस्वीपणे सत्ता गाजवीत आहे तेथे तरुणांना भ्रष्ट करणारा समलिंगी संभोगाचा दुर्गुण हा कायद्याने शासन घडणारा सामाजिक गुन्हा मानला जातो, तर थोर तत्त्वज्ञांच्या, शास्त्रज्ञांच्या आणि संगीतकारांच्या "सुसंस्कृत" देशात समलिंगी संभोग मुक्तपणे आणि निर्भयपणे करण्यात येतो. उपहासात्मक वाक्प्रचार एव्हाना प्रचलित बनलाय : "समलिंगी संभोग नष्ट करा आणि फॅसिझम अदृश्य होईल." असा निर्देश केला पाहिजे की, जरूरच पडली तर ज्या वंशाचे लोक स्वतःच्या विशुद्धतेची प्रौढी मिरवू शकतील, ज्या लोकांनी मानवजातीला सस्कृतीच्या खऱ्याखुऱ्या थोर प्रभूंची देणगी दिली – त्या सर्वात थोर, कामगारवर्गाचा अस्सल प्रेषित, कार्ल मार्क्स – त्या ज्यू लोकांना जर्मनीतील फॅसिस्ट भांडवलदारवर्ग हाकून लावीत आहे, तर ब्रिटनमधील फॅसिस्टसुद्धा – जेथे राज्याच्या मूर्धस्थानी अनेक ज्यू आहेत व त्या भूमीच्या उमराववर्गात ज्यांचा स्वीकार झाला आहे – ज्यूविरोधी लाजिरवाण्या विचारप्रणालीचा प्रचार करू लागले आहेत.

विविध राष्ट्रांचे भांडवलदार आणखी एका जागतिक युद्धाची जोराने तयारी करीत आहेत. कामगारांच्या आणि शेतकऱ्यांच्या श्रमाचे अधिक व्यापकपणे व सोयीस्करपणे शोषण करता यावे म्हणून जगाची फेरविभागणी करण्यास ते उत्सुक आहेत. मोठ्या देशांच्या पोलादी पंजांमध्ये सापडण्याचा धोका छोट्या देशांना

परत एकदा निर्माण झाला आहे. स्वतःच्या संस्कृतीचा मुक्तपणे विकास करण्याचा छोटया देशांचा हक्क गमावला जाण्याची परत धास्ती निर्माण झाली आहे.

भिन्न भाषांच्या आणि वंशांच्या कामगारवर्गामध्ये राष्ट्रीय तेढ, वांशिक मग्रूरता आणि तिरस्कार ह्यांची दुष्ट बीजे साम्राज्यवाद व फॅसिझम पेरीत आहेत. त्यांचे वांशिक द्वेषात रूपांतर घडू शकेल व त्यामुळे कष्टकऱ्यांच्या जगतात त्यांच्या वर्गीय हितसंबंधांच्या ऐक्यजाणीवेच्या विकासात अडथळा येण्याची शक्यता आहे. ती तारक ऐक्यजाणीवच केवळ विचारहीन दुकानदारांच्या संरक्षणहीन व दलित गुलामी अवस्थेतून जगातील कामगारांची आणि शेतकऱ्यांची मुक्तता करू शकेल. त्या दुकानदारांमधील राष्ट्रीय व्यापारी व औद्योगिक वैमनस्य सहजरीत्या वांशिक शत्रुत्वात आणि वांशिक युद्धांमध्ये परिणत होऊ शकेल व एव्हाना तसेच घडू लागले आहे. आज ते ज्यूविरोधाचा प्रचार करीत आहेत आणि एव्हाना अधमपणे त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करीत आहेत. उद्या ते स्लावविरोधी प्रचाराकडे परत वळतील; मॉमसेन, त्रेयचके व इतरांच्या स्लावांबद्दलच्या लज्जास्पद मतांची आठवण करून देतील आणि पोल व चेक लोकांनी जर्मन संस्कृतीला किती गुणी माणसे उपलब्ध करून दिली हे विसरतील. युरोपातील सर्व कारखानदार व दुकानदार एकाच प्रकारच्या वस्तूंचे उत्पादन आणि व्यापार करीत असल्यामुळे जर्मन वंशाची रोमन तसेच आंग्ल-सॅक्सन वंशाविरुद्ध युद्धे घडणे अगदी स्वाभाविक आहे. अर्थात तेथे सख्ये घडतात, पण जर विक्री करणे भाग असेल, तर विश्वासघात का करू नये ? उदाहरणार्थ, ब्रिटनचे जपानशी सख्य आहे, पण जपानी लंडनमध्ये रेशमी पायमोजे तीन पेन्स जोडी विकतात. अर्थात ही छोटी बाब आहे, पण पिवळ्या वंशाबद्दल वैर आणि द्वेष वाढायला जपानी "स्वस्त माल" पुरेसे कारण आहे. जपानी साम्राज्यवादी मांचूरियात, चीनमध्ये, जे काही निर्भयपणे करीत आहेत ते युरोपातील साम्राज्यवाद्यांना मोह घालणारे आहे.

वांशिक विचारप्रणाली हे मरणोन्मुख भांडवलशाहीचे शेवटचे "सैद्धांतिक" राखीव पान आहे, पण तिचा दुर्गंधी उच्छ्वास भक्कम मनाच्या लोकांनाही विषबाधा करण्यास समर्थ आहे, कारण निःशस्त्र हिंदूंना, चिन्यांना आणि निग्रोंना नखशिखांत शस्त्रसज्ज युरोपीय गोरे गुलाम करीत असलेले प्रदीर्घ काळ पाहिल्यामुळे एकूण लोक भ्रष्ट बनलेले आहेत.

आपल्या वर्गबंधूंना राक्षसीरीत्या बेधडक लुटताना पाहण्याच्या विश्वासघातकी विषाला प्रतिकार करण्यास फक्त संयुक्त आघाडीत दाखल झालेले क्रांतिकारक कामगारवर्गीय समर्थ आहेत.

मार्क्सवादी-लेनिनवादी विचारप्रणालीमध्ये शिक्षित झालेल्या ह्या कामगारवर्गाने जगाला दाखवून दिले आहे की, त्याच्या बहुराष्ट्रिक भूमीत सर्व टोळयांना

नअणि विंशां जगण्याचा, श्रम करण्याचा आणि स्वतःच्या संस्कृतीचा विकास घडविण्याचा समान हक्क आहे. ज्यांना पूर्वी स्वतःची लिपी नव्हती अशा अर्ध-रानटी माणसांसाठी, निरक्षरांसाठी, रशियन कामगाराने ज्ञानाचा रुंद दरवाजा उघडा केला आहे.

सोविएत संघातील लोकांच्या सांस्कृतिक वाढीची वेगवानता सर्व देशांमधील नेक स्त्री-पुरुषांनी मान्य केली आहे. एखाद्याला वाटेल की, ही वस्तुस्थिती मान्य केल्यानंतर, नेक स्त्री-पुरुष अगदी सोपा, नैतिकदृष्टया स्वच्छ असा निष्कर्ष त्यापासून काढतील : आत्मनिष्ठरीत्या आणि वस्तुनिष्ठरीत्या, सामाजिक रोगांनी मरणांतिक पछाडलेल्या व हमखास नष्ट होऊ घातलेल्या माध्यमापेक्षा निकोप माध्यमात राहणे खूप उपयुक्त, खूप प्रामाणिकपणाचे आहे. कामगारवर्ग सामाजिक सृजनशीलतेस समर्थ आहे असे मान्य केल्यानंतर, त्याच्या ज्ञानपिपासेला आणि गुणांच्या विकासाला हरप्रकारे उत्तेजन देणे व १७ कोटी लोकसंख्येच्या देशात एव्हाना आपले ऐतिहासिक कार्य सुरू केलेल्या कामगारवर्गीय समूहामध्ये त्याच्या ऐतिहासिक कार्याच्या जाणीवेच्या विकासाला उत्तेजन देणे फार फार उपयुक्त आहे. दुकान-दारांच्या संस्कृती-नकारामुळे, मानवांचा संहार करण्याच्या हेतूने आखलेल्या युद्धाच्या तंत्रशास्त्राव्यतिरिक्त सर्व तंत्रशास्त्रांच्या वृद्धीला विरोध करण्याच्या दुकानदारांच्या मोहिमेमुळे, संस्कृतीच्या प्रभूंची, "मानवतावाद्यांची", प्रतिष्ठेची भावना विलक्षण दुखावली असली पाहिजे असे एखाद्याला वाटेल. पण फॅसिझमने अमान्य केलेली पुस्तके जाळल्यामुळे, राष्ट्रवादी आणि वंशवादी विचारप्रणालींमध्ये अनुस्यूत असलेल्या द्वेषाचा पुरस्कार केल्यामुळे, नव्या आणि भयानक युद्धाच्या पूर्वतयारीमुळे, भांडवलदारी संस्कृतीचे प्रभू दुखावल्याचे आढळत नाही. कोटयवधी अत्यंत निकोप व्यक्तींना निरर्थकपणे नष्ट करण्यासाठी, शतकानुशतकांची सांस्कृतिक भांडारे आगीने पुन्हा नष्ट करण्यासाठी, शहरे जमीनदोस्त करण्यासाठी आणि ज्यांनी गिरण्या व कारखाने उभारले, शेते नांगरली, पूल आणि रस्ते बांधले, त्या जन-समूहांच्या खडतर श्रमांमधून निर्माण झालेल्या वस्तू नष्ट करण्यासाठी नव्या युद्धाची पूर्वतयारी चालली आहे. लुटारूंचा पिसाटपणा भाषणबाजीने शमविता येत नाही. वाघ आणि तरसे पेस्ट्री खात नाहीत.

"मानवतावादी" खरोखर मानवजातीवर प्रेम करण्यास समर्थ आहेत असे आढळत नाही, त्याचप्रमाणे आपल्या युगातील सर्वोच्च व शौर्यशाली नाटयाची त्यांना जाणीव नाही अथवा त्या नाटयातील नायक नेमके कोण ह्याचा त्यांना पत्ता नाही. अशी वेळ येत आहे जेव्हा क्रांतिकारक कामगारवर्ग खाद्या हत्तीप्रमाणे दुकानदारांच्या पिसाट आणि प्रक्षोभक वारुळावर पाय ठवील व त्याला मातीत गाडून टाकील. हे घडणे अपरिहार्य आहे. विशिष्ट

नगण्य अल्पसंख्य सृजनशीलरीत्या जराग्रस्त बनले आहेत व जीवनाबद्दलच्या त्यांना वाटणाऱ्या धास्तीमुळे आणि संपत्तीबद्दल वाटणाऱ्या विकृत व कधीही बऱ्या न होणाऱ्या लालसेमुळे त्यांना भ्रष्टतेची बाधाला होऊन ते ऱ्हासाला लागले आहेत, एवढ्यासाठी मानवजात स्वतःला नष्ट होऊ देणार नाही. ह्या अल्पसंख्यांचा नाश करणे न्यायाची सर्वोच्च कृती ठरेल आणि कामगारवर्गाने ही कृती करावी अशी इतिहास आज्ञा करीत आहे. ह्या महान कृतीनंतर जगातील लोक सार्वत्रिक सुसंवादाने आणि बांधिलकीने नव्या जीवनाच्या मुक्त आणि शोभिवंत उभारणीच्या कामाला आरंभ करतील.

ही केवळ श्रद्धा आहे का ? श्रद्धा आणि ज्ञान खोटेपणा व सत्य ह्यांच्या-एवढेच अपायकारक असण्याचा काळ कामगारवर्गाच्या दृष्टीने उलटून गेला आहे. जेथे कामगारवर्ग सत्ता गाजवतो आणि त्याच्या बलाढ्य हातामधून प्रत्येक गोष्ट निर्माण होते, तेथे ज्ञान व श्रद्धा यांच्यामधील कलहाला वाव नाही. तेथे श्रद्धा म्हणजे माणसाच्या स्वतःच्या तर्कशक्तीच्या ज्ञानाची निर्मिती आहे.

१९३४ □

तरुण लेखकांबरोबर वार्तालाप

बहुतेक माणसे चिंतन आणि युक्तिवाद करतात ते जीवनाच्या परिस्थितीचे अवगाहन करण्याची त्यांचो इच्छा असते म्हणून नव्हे, तर त्यांच्या विचाराला सुरक्षित निवारा शोधण्याचा आणि विविध "निर्विवाद सत्यांना" चटकन प्रस्थापित करण्याचा त्यांचा इरादा असतो. निर्विवाद सत्यांचे हे असे थोतांड रचणे टीकाकारांमध्ये अगदी प्रचलित आहे आणि लेखकांच्या कामावर त्याचा अत्यंत अपायकारक परिणाम घडतो. लेखकांच्या अत्यंत जबाबदार कार्यावर सिद्धतत्त्वे, प्रमाणवचने अथवा कोणतीही "घरगुती" बनावटीची निर्विवाद सत्ये लादल्यास प्रत्येक आणि वेगाने बदलणाऱ्या वास्तवाच्य. अर्थांवर अटळपणे मर्यादा पडतात, त्यांचे विपरीत अर्थ बनतात. फ्रेड्रिक एंगल्स. सारख्या शहाण्या माणसाने म्हटले होते की, "आमची शिकवण म्हणजे प्रमाणवचन नव्हे, तर कृतीची मार्गदर्शक आहे" आणि एकत्र केलेल्या आमच्या सर्व कृतींचा रोख "जुने जग बदलून" नवे निर्माण करण्याकडे असतो. "जुन्या जगाची" व्यवस्था कमालीच्या वेगाने कोसळून पडत असलेल्या युगात आपण जगत आहोत आणि काम करीत आहोत. ह्या कोसळण्याची कारणे पूर्णतया अभ्यासण्यात आली आहेत व त्यांचे भाकीत करण्यात आले होते. वर्गीय समाज कालबाह्य झाल्यामुळे विघटित होत आहेत. स्वतःच्या पोलादी कणखरपणाची शेखी ते अगदी परवा परवापर्यंत मिरवीत होते, सामाजिक दुर्गुणांच्या विपुलतेला सृजनशील सामर्थ्याचे अस्तित्व समजण्याची चूक करीत होते. आजच्या काळात सबंध जगभरचा भांडवलदारवर्ग ठळकपणे स्वतःची अगतिकता आणि नपुंसकता व्यक्त करीत आहे. त्याच्यापाशी असलेल्या एकमेव सामर्थ्याचे प्रदर्शन करीत आहे – राजकीय दुष्टपणाचे. सर्व देशांमधील दुकानदार राजकीय साहसवाद्यांना नेतृत्व देत आहेत, स्वसंरक्षणाचे त्यांचे एकमेव तंत्र असलेल्या दहशतवादाचा ते आश्रय घेत आहेत. फॅसिझम हा त्यांच्या मुक्तीचा एकमेव मार्ग असल्याचे ते घोषित करीत आहेत. म्हणजे समाजातील गाळाला (कपटी, वेडे, अधःपतित आणि स्वतःच्या

उपासमारीच्या भीतीने अंध झालेले लोक) अट्टल मारेकऱ्यांच्या सेनेत एकवटायचे त्यांचे नेतृत्व पोलिसांना द्यायचे व सामाजिक सृजनाला कार्यक्षम असलेल्या क्रांति - कारक कामगारवर्गाची निकोप शक्ती निपटून काढायची. भांडवलदारवर्गाच्या शक्तींच्या विघटनाच्या प्रक्रियांच्या अर्थाची व महत्त्वाची संकल्पना आम्हा सोवि एत लेखकांना पुरेशा स्पष्ट प्रमाणात नाही. विघटनामधून निर्माण झालेल्या गोष्टींच्या साहाय्याने स्व-सरक्षणाची उभारणी करण्याचे भांडवलदारवर्गाचे प्रयत्न, आम्हाला नीटसे आकलन झालेले नाहीत. सोविएत कामगारवर्गीयांच्या शौर्यशाली श्रमाच्या ह्या सोळा वर्षांनी आणि साध्य केलेल्या अफाट यश:सिद्धींनी, कामगार-वर्गाच्या टिकाऊपणाची आणि बुद्धिमानतेची, त्याच्या सृजनशील सामर्थ्याच्या अफाट संचयाची जगाला साक्ष पटली आहे. ह्या श्रमाच्या महाप्रचंड क्षमतेची आम्हा सोविएत लेखकांना अद्यापि कल्पनाच नाही अथवा त्या श्रमाच्या यश:-सिद्धींच्या विविधतेची आणि विपुलतेची आम्हाला कल्पना नाही. वस्तुत: ह्या गोष्टी आपल्याला माहीत असणे आवश्यक आहे. अगदी आत्ता आत्तापर्यंत आपला देश रानटीरीत्या अशिक्षित होता, सर्व प्रकारच्या भोळ्या समजुतींचे आणि दूषित पूर्वग्रहांचे विष आपल्यात खोलवर भिनलेले होते व स्वत:च्या प्राचीन छंदीपणा-विषयीचा चिवटपणा हे त्याचे एक ठळक वैशिष्टच आहे, ह्या गोष्टी विसरण्याकडे आपला कल असतो.

ललित साहित्याला घडविणारे घटक कोणते ? म्हणजे प्रतिमांना, नमुन्यांना आणि व्यक्तिरेखांना शब्दांच्या साहाय्याने निर्माण करणारे, शब्दांच्या साहाय्याने प्रत्यक्ष घटनांचे, दृश्यांचे आणि विचारप्रक्रियांचे वर्णन करणारे घटक कोणते ?

मूलभूत घटक आहे भाषा. हे मुख्य उपकरण आणि वस्तुस्थिती व जीवना-तील परिस्थिती मिळून साहित्याचा मसाला बनतो. एका चतुर लोककोड्याचे उत्तर, भाषा असे आहे : "काय असेल ? मध नाही, पण प्रत्येक गोष्टीला चिकटते !" दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचे तर नाव प्राप्त न झालेली एकही गोष्ट जगात नाही. सर्व वस्तुस्थितींची, सर्व विचारांची वस्त्रे म्हणजे शब्द. पण वस्तुस्थितींचे गर्भित सामाजिक अर्थही असतात आणि प्रत्येक विचारामागे त्याचे गर्भित कारण असते. सामाजिक जीवनातील लपलेल्या वस्तु-स्थितींचा अर्थ पूर्ण महत्त्वासह, पूर्णत्वाने आणि स्पष्टपणे उघड करण्याच्या हेतूने रचलेले ललित साहित्य मुद्देसूद, नि:संदिग्ध भाषेत आणि काळजीपूर्वक निवडलेल्या शब्दांमध्ये लिहिले पाहिजे. "अभिजात" ग्रंथ असे लिहिले गेले. शतकानुशतकांच्या क्रमात सहाणेवर भाषेला कष्टपूर्वक धार लावून. त्यांची खरी साहित्यिक भाषा आहे. जरी ती भाषा कष्टकरी जनसमूहांच्या बोलीभाषेतून घेतलेली असली, तरी मूळ उगमापासून ती अगदी वेगळी भासते, कारण वर्णनात्मक शैलीमध्ये ती बोली-

भाषेतील सर्व प्रासंगिक, तात्पुरत्या आणि अस्थिर गोष्टी वगळून टाकते; चंचल आणि ध्वनिदृष्टया विपरीत बनलेल्या गोष्टी वगळून टाकते; राष्ट्रीय भाषेच्या मुख्य "वृत्तींशी", अथवा धाटणीशी विविध कारणांनी विसंगत ठरणाऱ्या सर्व गोष्टी वगळून टाकते. रेखाटलेल्या पात्रांच्या थेट भाषणात बोलीभाषा वापरली जाते हे सांगणे न लगे, पण हा वापर असतो केवळ त्या पात्रांना सजीव करण्यापुरता आणि त्यांचा ठळकपणा प्रतीत करण्यापुरता.

मी खूप लहान होतो तेव्हा नवे शब्द रचण्याचा प्रयत्न केला होता. बचावाच्या वकिलांची आणि फिर्यादी वकिलांची भाषणे ऐकून मला तशी भाबडी स्फूर्ती येत असे. "चांगले" आणि "वाईट" यांना अवगुंठन घालण्यासाठी सुंदर शब्दांचा वापर होत असलेला पाहून मला आश्चर्य वाटायचे. बचावाचा आणि फिर्यादी असे दोन्ही पक्ष सारख्याच चातुर्याने सारखीच शब्दसंपदा वापरत हे पाहून मला आश्चर्य वाटायचे. म्हणून "स्वतःचे शब्द" तयार करण्यासाठी मी हास्यास्पदरीतीने खटपट करीत होतो, वहीमागून वही भरून काढीत होतो. तो आणखी एक "बालरोग" होता मला सांगायला आनंद वाटतो की, वास्तवता सर्वोत्तम गुणकारी उपाय आहे आणि ह्या उपायाने लवकरच मी बरा झालो.

ज्या युगांमध्ये अत्यंत जोमदार सार्वजनिक कार्ये, विविध नवीन श्रमतंत्रे ह्यांचा मिलाफ झाला व वर्गविग्रह तीव्र बनले, त्या युगांमध्ये भाषा अत्यंत वेगाने समृद्ध बनली, असे संस्कृतीचा इतिहास आपल्या शिकवतो.

लोककथांमध्ये, म्हणींमध्ये, वाक्प्रचारांमध्ये, गाण्यांमध्ये आपल्याला ह्याचा दुजोरा मिळतो. बोलीभाषेच्या स्वाभाविक विकासाचा पुरावा मिळतो. ज्यांचा अर्थ एव्हाना कायमचा पुसून टाकलेला आहे अशा कालबाह्य शब्दांचा पुराणमतवादी बचाव जेवढा व्यर्थ, तेवढेच कृत्रिम, योजलेले "पालट" व्यर्थ आहेत. पूष्कीन स्वतःची म्हातारी दाई, आरीना रोदीओनोवना, हिच्याकडून खूप काही शिकला होता ह्याची आठवण करू या. त्याचप्रमाणे, बोलीभाषेचे अत्युत्तम ज्ञान असलेला लेस्कोवसुद्धा स्वतःच्या दाईकडून, एका सैनिकाच्या बायकोकडून, शिकला होता. एकूण असे म्हटले पाहिजे की, आपल्या दाया, आपले गाडीवान, मच्छीमार, खेड्यातील शिकारी आणि इतर कष्टकरी माणसे – अशा ह्या सर्वसामान्य जनांनी आपल्या साहित्यिक भाषेच्या विकासावर निर्विवाद प्रभाव पाडलेला आहे. पण मग लेखकांनी धान्यातील भूस काळजीपूर्वक पाखडून अत्यंत अचूक, योग्य व अर्थपूर्ण शब्द निवडले. आपल्या सद्यःकालीन लेखकांना अशा निवडीच्या गरजेचे मुळीच महत्त्व वाटत नाही व त्यांचा त्यांच्या लेखनांवर प्रतिकूल परिणाम घडलेला दिसतो ह्या अभावापायी गुणवत्तेच्या चर्चेमध्ये विसंवाद निर्माण होतो आणि आळशी व दुतोंडी चलाख लोकांना चर्चा दाबून टाकण्याची संधी मिळते.

केवळ व्याकरणविषयक प्रश्नांपर्यंत त्या चर्चेला ते संकुचित बनवून टाकतात. उलट दर्जाच्या समस्येला आपल्या देशात ठाम आणि प्रगाढ सामाजिक आशय आहे.

साहित्याचा दुसरा घटक म्हणजे विषय. लेखकाने वैयक्तिक अनुभवाच्या दरम्यान मनात आकारलेली कल्पना. ही कल्पना आपोआप त्याला स्फुरलेली असते, पण अद्यापि तिला पुरते पंख फुटलेले नसतात व प्रतिमांच्या रूपाने, शब्दांच्या आकारात तिला रूप मिळावे म्हणून ती लेखकाला प्रेरणा देत असते.

तथाकथित "चिरंतन" विषय आहेत : मृत्यू, प्रेम आणि व्यक्तिवादावर आधारलेल्या समाजाने निर्माण केलेले इतर विषय : मत्सर, सूड, कृपणता इ. एक पुरातन म्हण आहे की, "प्रत्येक गोष्ट बदलते" आणि त्या दृष्टीने "चंद्राखालचे" आणि "सूर्याखालचे" "काहीही चिरंतन नाही." आपल्या जगावर क्रांतीचा तेजस्वी सूर्य उगवत आहे आणि आपल्याला दाखवत आहे की, वर्गांमधील तीव्र संघर्षावर आधारलेल्या, भाकरीसाठी आणि सत्तेसाठी प्रत्येकजण प्रत्येकाविरुद्ध लढत असलेल्या, समाजामधील व्यक्तीच्या शोकदायी एकाकीपणाच्या व अगतिकपणाच्या जाणीवेमधून हे "चिरंतन" विषय नेहमी उगम पावले आहेत. केवळ प्राथमिक हातातोंडाचा मेळ घालता येईल एवढ्या अस्तित्वासाठी बहुसंख्य समाजघटकांना स्वतःची सर्व ताकद खर्च करावी लागणे, हे भांडवलदारवर्गीय समाजाचे ठळक आणि सुधारता न येण्याजोगे वैशिष्ट्य असल्याचे प्रत्येकाला ठाऊक आहे. लोकांना त्यांच्या अस्तित्वाच्या तिरस्करणीय आणि अपमानास्पद "वैशिष्ट्या"ची सवय झाली आहे. जरी प्रत्येकाला केवळ स्वतःचीच चिंता करणे भाग पडत आहे, "स्वतःच्याच प्रयत्नांवर लक्ष एकवटावे लागत आहे" तरी समाजव्यवस्थेच्या कुरूपतेची जाण फारच कमी लोकांना आहे. एकूण पाहता, माणसे ज्या परिस्थितीत राहतात आणि जे काही पाहतात, त्यातील अत्यल्प भागच तेवढा त्यांना समजतो. जे काही ती पाहतात, त्याच्या अर्थाचे चिंतन करायला त्यांच्यापाशी वेळ नाही. स्वतःविषयीच्या क्षुल्लक चिंतांच्या दास्यात ती तडफडत राहतात. स्वतःच्या शारीरिक गरजा भागविण्याच्या, स्वतःच्या अहंकाराला तृप्त करण्याच्या आणि जीवनात अधिक मुलायम जागेला प्राप्त करण्याची महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याच्या धडपडीत ही माणसे गुंतलेली असतात. अर्थात जगण्यासाठी त्यांना असे करावे लागते. जे काही दिसते त्यावर विचार न करण्याची सवय अंगी बाणविल्यामुळे अनेकांना आत्मसंरक्षणाचे चांगले साधन लाभते. आत्मसंरक्षणासाठी आणि अत्यंत क्षुल्लक गोष्टींसाठी आपण किती शक्ती वाया घालवितो ह्याची जर भांडवलदारी समाजातील लोकांनी गोळाबेरीज केली, तर त्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण कदाचित दहा पटींनी वाढेल.

पण दिसलेल्या गोष्टींवर जरी माणसाने चिंतन केले नाही, तरी तो जे

काही पाहतो ते कोणत्याही परिस्थितीत त्याच्या स्मृतींच्या भांडारात साठविले जाते, त्याला ते टोचत राहते, जीवनाच्या निरर्थकपणाची निराशाजनक भावना त्याच्या मनात निर्माण करते, "कोण कसा जगतो" ह्याला काहीही महत्त्व नाही अशा हीन निष्कर्षाला त्याला आणते. सरतेशेवटी त्याला गूढवादाकडे, अराजकवादाकडे आणि दुष्टतेकडे नेते. अशा रीतीने भांडवलदारी समाज स्वतःची विषे स्वतःच उत्पन्न करतो व ती विषे आपले नाशकारी कार्य सतत करीत राहतात. भांडवलदारी समाजाचे कुजणे आणि विघटन होण थांबविण्याचे सामर्थ्य धार्मिक, नीतिपर आणि कायदेविषयक प्रमाणवचनांमध्ये नाही असे आपण पाहतो. वर्गविहीन समाजसत्तावादी समाजामार्फत निर्माण होत असलेल्या परिस्थितीमध्ये "चिरंतन" विषय अंशतः पूर्णतया नष्ट होतील आणि अंशतः त्यांना वेगळा अर्थ प्राप्त होईल. कोणतेही सामाजिक मूल्य असलेल्या कुणा व्यक्तीच्या मृत्यूपेक्षा अतुलनीयरीत्या फार महत्त्वाचे आणि लोकांतिक विषय आपले युग आपल्यासमोर सादर करीत आहे. व्यक्तिवाद्यांना हे आवडणार नाही, पण व्यक्तिवादाला इतिहासाने मरणाची शिक्षा फर्मावली आहे.

साहित्याचा तिसरा घटक म्हणजे कथानक. दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचे तर ही ना ती व्यक्तिरेखा अथवा नमुना आकार घेत असताताच्या क्रमातील संगती, विसंगती, सहानुभूती, वैमनस्ये आणि एकूण लोकांमधील संबंध.

साहित्य म्हणजे "काल्पनिक"– नाटक, कादंबरी, कथा – असे जर आपल्याला अभिप्रेत असेल, तर साहित्याच्या संकल्पनेला हे तीन घटक पुरेसे आहेत असे मला वाटते. तंत्रे आणि "शैली"बद्दल आपण बोलू शकू, पण तो एव्हाना लेखकाच्या आत्मगत क्षमतांचा प्रश्न आहे. अर्थातच त्यांच्या मागेही त्यांच्या उगमाची आणि विकासाची वस्तुनिष्ठ निर्देशके लपलेली असतात.

१९ व्या शतकातील साहित्याची मुख्य, विस्तृततम आणि अत्यंत फलदायी प्रवृत्ती असलेल्या वास्तववादाबद्दल आता चार शब्द. ही प्रवृत्ती २० व्या शतकात पसरली आहे. धारदार बुद्धिप्रामाण्यवाद आणि टीका तिची वैशिष्टचे आहेत. भोवतालच्या माणसांपेक्षा बौद्धिकरीत्या अधिक पक्व बनलेल्या, आणि रांगड्या, शारीरिक सामर्थ्यामधून स्वतःच्या वर्गाचे सामाजिकदृष्टया सृजनाचे नपुंसकत्व स्पष्ट पाहू शकणाऱ्या लोकांनी ही प्रवृत्ती प्रामुख्याने सुरू केली. ह्या लोकांना भांडवलदारवर्गाचे "उधळे पुत्र" म्हणता येईल. बायबलमधील उधळ्या पुत्राच्या कथेप्रमाणे, त्यांनी आपल्या वाडवडिलांच्या बंधनापासून, प्रमाणवचनांच्या आणि परंपरांच्या बंधनापासून, दूर पळ काढला. ह्या फुटोरांपैकी फारच थोडे लोक चरबीयुक्त कोकरू खायला त्यांच्या वर्गात परतले, ही गोष्ट त्यांना स्पृहणीय आहे. त्यांची भाषा, शली व त्यांचे कथानक ह्यांच्या गुणावगुणांची भांडवलदारी टीका

कारांनी चर्चा केली; पण त्यांच्या पुस्तकांमधील मजकुरातील वस्तुस्थितीचा सामाजिक अर्थ उघड करण्याचा मात्र त्या टीकाकारांचा मुळीच इरादा नव्हता आणि १९ व्या शतकातील ह्या युरोपीय वास्तववादी लेखकांबद्दल आपला स्वतःचा दृष्टिकोन घडविण्यात त्यांनी नकळतपणे काहीशी महत्त्वाची कामगिरी बजावली. बाल्झाकच्या कार्याचे सामाजिक महत्त्व फक्त एंगल्स आणि मार्क्स यांनी जाणले. स्तेन्दालना टीकाकार केवळ " टाळून गेले." आपल्या देशात परकी साहित्य मूळ स्वरूपात फार कमी प्रमाणात वाचले जाते आणि पश्चिमी लेखकांच्या जीवनचरित्रांबद्दल, त्यांच्या व्यावसायिक कारकीर्दीबदल, तंत्रांबद्दल आणि तत्सम गोष्टींबद्दल माणसांना त्याहूनही कमी माहिती असते.

वास्तवाबद्दलच्या टीकात्मक दृष्टिकोनासाठी भांडवलदारांच्या " उधळ्या पुत्रां "चे साहित्य अत्यंत मौल्यवान होते. पण शिष्ट आणि तृप्त वर्गाने निर्माण केलेल्या व राखून ठेवलेल्या गलिच्छ गोंधळातून बाहेर मार्ग कसा काढायचा हे मात्र ह्या लेखकांनी सांगितले नाही. काही थोडे आणि मुख्यतः दुय्यम दर्जाचे लेखक सवंग तत्त्वज्ञानाला आणि प्रभावी टीकेला बळी पडले. त्यांनी दुराराध्य विरोधांचा समन्वय घडवून काही विशिष्ट पोथीनिष्ठ सत्यांना स्थापन करण्याचा प्रयत्न केला. भांडवलदारी समाजव्यवस्थेमधील ठळक आणि कुप्रसिद्ध खोटेपणाला झाकण्याचा त्यामागे इरादा होता. १९ व्या शतकामध्ये विज्ञान आणि अभियांत्रिकी अत्यंत यशस्वीरीत्या भांडवलदारी राज्यांचा भौतिक पाया विस्तृत व बळकट करीत होते, पण युरोपच्या मध्यमवर्गीयांच्या ह्या " यांत्रिक " कार्याबद्दल अथवा त्यांच्या " यांत्रिक " प्रगतीबद्दल फ्रान्सच्या साहित्याने – युरोपातील अग्रणी साहित्याने – क्वचितच आनंद व्यक्त केला होता.

स्वतःच्या सामाजिक अस्तित्वाच्या असुरक्षिततेची व्यक्तीची निराशावादी जाणीव, हा १९ व्या शतकातील साहित्याचा मुख्य विषय होता शॉपेनहॉवर, हार्टमान, लेओपार्दी, श्तीर्नेर आणि इतर अनेक तत्त्वचिंतकांनी जीवनाच्या वैश्विक अर्थहीनतेचा प्रचार करून ही जाणीव दृढ केली. अर्थात ह्या शिकवणीचे मूळही व्यक्तीच्या सामाजिक संरक्षणहीनतेच्या आणि सामाजिक एकाकीपणाच्या त्याच जाणीवेत होते. सोविएत संघात कामगारवर्गीय अधिसत्तेने निर्माण केलेल्या नव्या वास्तवतेमध्ये, एखादी व्यक्ती जरी उत्तर ध्रुवावरील बर्फखंडांमध्ये अडकली असली आणि कोणत्याही क्षणी स्वतःचा नाश होऊ शकेल हे तिला माहीत असले, तरी तिला एकाकी वाटत नाही अथवा अगतिक वाटत नाही.

१९ वे शतक मुख्यतः निराशावादी शिकवणीचा कालखंड होता. २० व्या शतकात त्या शिकवणीचे स्वाभाविकच सामाजिक दुष्टाव्याच्या प्रचारात अधःपतन घडले. " परोपकारी वृत्तीचे " पूर्णतः आणि ठामपणे खंडन करण्यात आले. त्या

परोपकारी वृत्तीचा क्षुद्रबुद्धीच्या लोकांनी सर्वत्र चातुर्याने गाजावाजा केला व अक्षरश: फुशारकी मिरवली. अनेकांनी स्वीकारलेल्या शॉपेनहॉवरच्या धार्मिक, दयेच्या आणि करुणेच्या ढोंगी नीतिमत्तेचा नीत्शेने त्वेषाने त्याग केला आणि त्याहीपेक्षा अधिक ठामपणे व सध्या प्रत्यक्षरीत्या फॅसिझम तिचा धिक्कार करीत आहे. हिटलरचा फॅसिझम म्हणजे स्वत:च्या दुबळ्या बनलेल्या, पण अजूनही चिवट पकड असलेल्या निसटणाऱ्या सत्तेसाठी चाललेल्या मध्यमवर्गीयांच्या वर्गीय लढ्यातील निराशावादाची अभिव्यक्ती होय.

आणखी असेही सांगितले पाहिजे की, व्यक्तीच्या सामाजिक अस्तित्वाच्या आत्यंतिक अस्थिरतेची आणि असुरक्षिततेची भांडवलाच्या अधिक गुणी सेवकांना जाणीव नव्हती आणि प्रत्यक्ष समज नव्हती असे नाही. १९ व्या शतकातील जवळजवळ सर्व " थोर " आणि " प्रसिद्ध " माणसे त्यांच्या एव्हाना प्रकाशित झालेल्या आठवणींमधून, रोजनिशींमधून आणि पत्रांमधन म्हणतात की, भांडवलदारी समाज किती वाईटरीत्या संघटित केलेला होता.

सोविएत संघातील कामगारवर्गीय अधिसत्तेने बजावलेल्या कामगिरीची यादी करताना तिच्यात एक वस्तुस्थिती समाविष्ट करणे अत्यावश्यक आहे की, आश्चर्यकारक शौर्यशाली कार्याद्वारे ती जगावरील निराशावादाची बुरशी व गंज खरवडून स्वच्छ करीत आहे.

भांडवलदारवर्गाच्या " उधळ्या पुत्रां "चा वास्तववाद टीकात्मक वास्तववाद होता. समाजातील कीड उघडकीस आणत असताना, कौटुंबिक परंपरांच्या, धार्मिक प्रमाणवचनांच्या आणि कायदेशीर दंडकांच्या पापामधील व्यक्तीच्या " जीवनाचे " चित्रण करीत असताना, त्या दास्यातून बाहेर कसे पडायचे तो मार्ग टीकात्मक वास्तववाद लोकांना दाखवू शकला नाही. प्रत्येक गोष्टीवर टीका करणे सोपे होते. पण अशा सामाजिक अस्तित्वातील आणि " एकूण आयुष्यातील " उघड निरर्थकतेशिवाय प्रतिपादन करण्यासारखे दुसरे काहीच नव्हते. अनेक मोठ्या आवाजांमध्ये हे प्रतिपादन घडले. बहुधा बायरनपासून त्याचा आरंभ झाला आणि १९३२ मध्ये वारलेल्या थॉमस हार्डीपर्यंत त्याची परंपरा चालू होती. शातोब्रियानच्या ' थडग्यातील टिपणं ' आणि इतरांपासून ते ज्यांचा संशयवाद निराशावादाच्या अगदी जवळ येऊन ठेपला होता त्या बॉदलेअर आणि आनातोल फ्रान्सपर्यंत. काही लेखकांनी निराशावादाऐवजी कॅथलिक धर्म स्वीकारला. पण दोन्ही तेवढेच वाईट होते, कारण सर्व चर्चनी सारख्याच आग्रहपूर्वक लोकांमध्ये त्यांच्या अस्तित्वाच्या संघर्षाची अगतिकता भिनविण्याचा प्रयत्न केला होता. चर्चच्या राजांच्या भौतिक आणि स्वार्थी हितसंबंधांना पूरक न ठरणाऱ्या व इतरत्र रोख असलेल्या कोणत्याही शक्तीला दडपून टाकण्याचा धर्माने जो प्रयत्न केला,

त्यातून धर्माची अपायकारकता अत्यंत ठळकपणे व्यक्त झाली आहे. एका धर्म- गुरूने अगदी योग्यपणे म्हटले होते की, " ख्रिश्चन धर्म हा उपाध्येपणाचा सर्वात नफादायी धंदा होता."

आपल्या देशात समाजसत्तावादी वास्तववादाबद्दल खूप काही लिहिण्यात येते आणि गोगोलवर नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका लेखात लेखकाने अत्यंत कुतूहलजनक शोध लावला आहे: तो म्हणजे, गोगोल समाजसत्तावादी वास्तव- वादी होता. अत्यंत ओबडधोबडरीत्या तयार केलेली साहित्यिक–टीकात्मक सत्ये कोणत्या मूर्खपणाच्या थरापर्यंत जाऊ शकतात ह्याचे ह्या " शोधा "वरून दर्शन, घडते. तसेच, हा मूर्खपणा करणाऱ्या लेखकाला स्वत:च्या शब्दांच्या जबाबदारीची अगदी थोडी अथवा मुळीच जाणीव नसल्याचे दिसून येते.

साहित्यामधील वास्तववाद जीवनातील सत्य वस्तुस्थितीचा परामर्श घेतो. ' अंमलदार ' आणि ' मृतात्मे ' लिहिण्यात आली, त्या काळात रशियामध्ये समाजसत्तावादी वस्तुस्थितीचे कुणीही पालन करीत नव्हता. म्हणून ख्लेस्ताकोव चिचिकोव, सबाकेविच, नझ्द्रेव, प्ल्यूश्कीन आणि आपल्या इतर पात्रांच्या सामा- जिक कार्यात अशा वस्तुस्थितीचे गोगोलने दर्शन घडविणे शक्य नव्हते. ह्याचा अर्थ गोगोलवर समाजसत्तावादी वास्तववादाचा शिक्का चुकीने मारण्यात आला आहे. तो टीकात्मक वास्तववादी होता आणि एवढा प्रभावी होता की, स्वत:च्या टीकेच्या सामर्थ्याला पाहून खुद्द त्याचीच भीतीने दातखीळ बसली होती. वेडेपणाला प्रगाढ प्रबोधनपर सामाजिक–तत्त्वज्ञानविषयक महत्त्व प्राप्त झाल्याचा त्याचा काही एकमेव प्रसंग नव्हता. उलट अर्धवट शहाणपणाला एवढे महत्त्व कधीच नव्हते आणि तसे ते कधीच असू शकले नसते. काही लेखक ह्या गोष्टीला समजू शकले नाहीत याचे मला आश्चर्य वाटते.

साहित्यामधील समाजसत्तावादी वास्तववाद म्हणजे व्यवहारातील समाज- सत्तावादी सृजनाच्या वस्तुस्थितीचे केवळ प्रतिबिंब असू शकतो. अशा प्रकारचा वास्तववाद आपल्या साहित्यात असू शकेल का ? अर्थातच असू शकेल आणि तसा तो असणे अपरिहार्य आहे, कारण क्रांतिकारक समाजसत्तावादी सृजनाच्या वस्तुस्थिती एव्हाना आपल्यापाशी आहेत आणि त्यांची संख्या वेगाने वाढत आहे. आपण अशा देशात राहात आणि काम करीत आहोत, जेथे " गौरवास्पद आणि सन्मानास्पद " पराक्रम नित्याचे बनले आहेत व त्या सर्वांचा उल्लेख करण्याची तसदीसुद्धा इत:पर वर्तमानपत्रे घेत नाहीत. आपले कादंबरीलेखकही त्यांचा उल्लेख करीत नाहीत ह्याचे साधे कारण म्हणजे " जीवनाच्या नकारात्मक बाजू "वर स्वाभाविकपणे आणि यथार्थपणे " पारंगतता " मिळविलेल्या टीकात्मक वास्तववादाच्या जुन्या मार्गानुसार त्यांचे अवधान अद्यापि एकवटलेले आहे. ह्या

क्षणी लेखकांना आठवण करून देणे इष्ट ठरेल की, मठ्ठपणा, लबाडी, ढोंग आणि तत्सम विक्षिप्तपणे ह्यांसारख्या दोषांमागेही स्वाभाविक कारणे आहेत आणि ती कारणे नाहीशी करण्याजोगी आहेत.

टीकात्मक वास्तववादाच्या सनातनी कणखरपणाचे एक प्रमुख कारण म्हणजे व्यावसायिक तांत्रिक कसबाचा लेखकांमधील अभाव. अथवा साध्या शब्दांमध्ये सांगायचे, तर त्यांचे अज्ञान, निरीक्षणाची आणि "अभिज्ञे"ची त्यांची असमर्थता. अनेकदा ह्या कारणाचा संयोग होतो भूतकाळाशी भावनिक आकर्षण असण्याशी. स्वतःची उत्तरक्रिया उत्तम कशी पार पडेल एवढी एकच "जीवनाकांक्षा" धरलेल्या आजोबांशी झालेली मनाची गुंतवणूक. ह्याच्या जोडीला कमीत कमी प्रतिकाराच्या धोरणाची जोड द्या : दगडापेक्षा लाकडावर काम करणे अधिक सोपे, लोखंडापेक्षा दगड सोपा, पोलादापेक्षा लोखंड सोपे आणि दगडापासून अथवा ओतीव काँक्रीटपासून बांधलेल्या अनेक मजली गाळ्यांच्या इमारतीमधील जीवनाचे चित्रण करण्यापेक्षा छोट्या लाकडी खोपटामधील कौटुंबिक प्रसंग चितारणे अधिक सोपे.

क्षुल्लक प्रश्नांवर काम करण्याच्या सवयीमुळे मोठा विषय हाताळण्याचे सामर्थ्य राहात नाही. उदाहरणार्थ, औद्योगिक कारखान्याची उभारणी. मुख्य विषयावर, सैद्धांतिक संदेशावर, असंख्य बारीक तपशीलांच्या वर्णनाचा बोजा लेखक रचतो आणि स्वतःच्या वक्तृत्वशक्तीमधून उमललेल्या कागदी फुलांना — बहुधा ती फारशी तेजस्वी नसतात — त्या महाप्रचंड ढिगाखाली गाडून टाकतो. तपशीलांचे वर्चस्व अत्यंत योग्य स्थळी असले तरी ते हानिकारक आहे. उदाहरणार्थ, सामुदायिक शेतीच्या विकासाची कहाणी सांगताना व्यक्तिवाद्याचे सामुदायिकवाद्यात हळूहळू रूपांतर कसे घडले ह्याचा मागोवा घेत असताना. माझ्या मते, तपशीलांच्या ह्या छंदापायी आणखी एक खेदजनक सवय आपल्यात मुरली आहे : लेखक आपल्या पुस्तकाचा पहिला भाग प्रकाशनासाठी सुपूर्द करतो, पण दुसऱ्या भागाच्या लेखनाला त्याने अद्यापि आरंभही केलेला नसतो, कारण त्याने गोळा केलेला सर्व तपशील एव्हाना वापरलेला असतो व अधिक सांगण्यासारखे त्याच्यापाशी काहीही नसते.

नवोदित लेखकाने मोठ्या कादंबरीने आरंभ करणे अगदी वाईट आहे आणि केवळ ह्यापायी आपल्या देशात प्रचंड शाब्दिक कचरा प्रकाशित होतो. कसे लिहावे हे शिकण्यासाठी लघुकथा उत्तम माध्यम आहे. सर्व प्रमुख परकी आणि रशियन लेखकांनी ह्याच मार्गाचा अवलंब केला होता. नवशिक्या लेखकाने शब्द काटकसरीने कसे वापरावेत, स्वतःच्या साहित्याचे वाटप तार्किकरीत्या कसे करावे आणि मूळ विषय स्पष्टपणे व प्रभावीपणे कसा मांडावा ह्याचे प्रशिक्षण

लघुकथालेखनात मिळते. असे असले तरीही, एका प्रतिभाशाली लेखकाला एकदा मी सल्ला दिला की, जाडजूड कादंबऱ्यांचे लेखन करण्यापासून त्याने विश्रांती घ्यावी आणि बदल म्हणून लघुकथा लिहाव्यात. त्यावर तो लेखक उत्तरला : " छे: छे: लघुकथा हा फार अवघड लेखनप्रकार आहे." असे दिसते की, पिस्तूल बनविण्यापेक्षा तोफ तयार करणे अधिक सोपे आहे. नव्या लेखकांना त्यांच्या कारकीर्दीसमोर उभ्या राहणाऱ्या अडचणींची माहिती असली पाहिजे; युगाने त्यांच्यापासून ठेवलेल्या अपेक्षांची त्यांना जाणीव असली पाहिजे व वाचकाबद्दलच्या त्यांच्या थोर जबाबदारीची त्यांना माहिती पाहिजे. आपल्या सोविएत वाचकाला लेखकांचे जेवढे प्रेम आणि आदर याचा लाभ झाला आहे, तसे आजवर जगातल्या एकाही वाचकाबाबत कधीही घडले नव्हते.

सत्ये ज्ञानाची उपकरणे असतात, लोकांनी त्यांचा पायऱ्यांसारखा वापर करून वर चढायचे असते. मानवी प्रयत्नांमधून सत्यांची निर्मिती होते आणि मानवजातीच्या सांस्कृतिक विकासाच्या संपूर्ण इतिहासाने हे सत्य अत्यंत ठामपणे स्थापन केले आहे.

माणसाचे उद्दिष्ट जेवढे अधिक वरचे, तेवढी त्याच्या क्षमतांच्या आणि गुणांच्या विकासाची सामाजिकदृष्टचा उत्पादकता अधिक, असे मी वारंवार म्हटले आहे. माझ्या एकूण आयुष्यातील अनुभवाच्या जोरावर, जे काही मी निरीक्षण केले, वाचले, ज्या काही तुलना केल्या व जे चिंतन केले, त्याच्या बळा-वर, हे आणखी एक सत्य मी प्रतिपादन करत आहे. अर्थात त्याला अत्यंत खात्रीलायकरीत्या आणि भक्कमरीत्या दुजोरा मिळतो आपल्या सोविएत वास्तवाचा.

व्लादीमिर लेनिन ह्यांच्या क्रांतिकारक बुद्धिमत्तेने सोविएत संघातील कामगारवर्गापुढे सर्वोच्च ध्येय ठेवले आणि आता सोविएत संघातील दश-लक्षावधी कामगारवर्गीय ह्या उत्तुंग ध्येयाच्या प्राप्तीसाठी प्रभावी संघटन करून वाटचाल करीत आहेत, सर्व देशांमधील कामगारवर्गाच्या क्रांतिकारक शक्तीला अधिकाधिक ठळकरीत्या उत्तेजित बनवीत आहेत, प्रामाणिक लोकांच्या आदरणीय आश्चर्याला व हरामखोरांच्या दुष्ट द्वेषाला जाग आणत आहेत.

" विपुल सर्वसामान्य अक्कल " असलेले लोक, म्हणजे उदासीन राहणे शहाणपणाचे असे मानणारे लोक, वस्तुस्थितीच्या, परंपरांच्या, प्रमाणवचनांच्या आणि नियमांच्या सत्तेपुढे शांतपणे नतमस्तक होणे सर्वोत्तम समजतात. कामगार-वर्गाच्या ह्या ध्येयाला ते अवास्तव आणि तऱ्हेवाईक समजतात. लढायां-मध्ये ते भाग घेत नाहीत, पण विजयांची फळे मात्र चतुराईने चाखतात. दान्तेच्या

'नरक' वर्तुळांमध्ये अशा माणसांसाठी एक खास जागा राखलेली आहे व त्या स्थानाला हे लोक अगदी सुपात्र आहेत.

सोविएत संघामध्ये आमच्या "तऱ्हेवाईक" ध्येयाच्या सिद्धीपायी विलक्षण पराक्रम घडतात, शौर्यशाली प्रयत्न होतात आणि अत्यंत धाडसी इरादे स्फुरतात. ह्यासाठी मी त्यांची जंत्री देणार नाही, पण इरादे साध्य होण्यापूर्वीच वस्तुस्थिती कसे बनतात, ह्याची आपल्या लेखकांना माहिती असली पाहिजे. भाकर खाणे चांगले, पण दरसाल शेतांना नांगरण्यासाठी खर्च होणारी प्रचंड शक्ती दुसरीकडे वापरता यावी म्हणून गव्हाला बारमाही पीक बनविण्यासाठी कोणते प्रयत्न चालू आहेत हे माहीत असणेही चांगले.

अशा रीतीने वर्गविहीन समाजसत्तावादी समाज उभारण्याच्या सर्वोच्च उद्दिष्टाने सामाजिकदृष्टचा उपयुक्त श्रमाद्वारे सत्यांची निर्मिती करण्यात येत आहे. माणसाकडून व्यर्थरीत्या खर्च होणाऱ्या शारीरिक शक्तीचे ह्या समाजात बौद्धिक शक्तीमध्ये रूपांतर करण्यात येईल. व्यक्तीच्या क्षमतांच्या आणि गुणांच्या विकासासाठी ह्या समाजात अमर्याद संधी देण्यात येतील.

ह्या कामकरी जीवनाचे चित्रण करणे आणि पात्रांच्या व नमुन्यांच्या रूपाने सत्यांचे प्रतिमांमध्ये रूपांतर घडविणे, हे साहित्याचे कार्य आहे. एक म्हण आहे: "जेवढ्या जास्त उंचीवर उभे राहाल, तेवढा जास्त दूरचा पल्ला दिसेल." तर मग ह्या ध्येयाच्या उंचीवर उभे राहून पाहू या आणि क्रांतीने चालना दिलेल्या सृजनशक्तीच्या मुख्य महत्त्वाकांक्षेशी तुमच्या पुस्तकांच्या विषयांचा व कथानकांचा सुसंवाद कितपत जमतो, ह्या जबरदस्त उत्तेजनाचा प्रभाव तुम्ही स्वतः कितपत अनुभवत आहात, त्याचा अंदाज घेऊ या.

१९३४ □

मी लिहायला कसा शिकलो ?

कॉम्रेडहो !

जेथे जेथे मला तुमच्याशी बोलण्याची संधी मिळाली, तेथे तेथे तोंडी अगर लेखी स्वरूपात मला अनेकांनी विचारले आहे की, मी लिहायला कसा शिकलो ? हाच प्रश्न सोविएत संघाच्या सर्व भागांमधून पत्रांद्वारे विचारण्यात आला आहे. सर्वसाधारणपणे नुकताच लिहायला आरंभ केलेल्या तरुण मंडळींकडून हा प्रश्न विचारण्यात आला आहे. "कथा कशा लिहाव्यात ह्यावर एक पुस्तक तयार करा," अथवा "साहित्याच्या सिद्धांताचा विकास करा," किंवा "साहित्यावर क्रमिक पुस्तक प्रसिद्ध करा," अशी विनंती मला अनेकांनी केली आहे. असे क्रमिक पुस्तक मी लिहू शकत नाही आणि तसे करणे मला शक्यही होणार नाही. शिवाय, अशी पुस्तके आधीपासूनच अस्तित्वात आहेत आणि जरी ती फार चांगली नसली. तरी उपयक्त आहेत.

लेखनाला आरंभ करणाऱ्यांना साहित्याच्या इतिहासाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. माणसाचा व्यवसाय कोणताही असो, त्याला त्याच्या विकासाचा इतिहास माहीत असावा. एखाद्या उद्यमात अगर त्याहूनही अधिक चांगले म्हणजे एखाद्या कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांना जर त्याचा उदय कसा झाला व हळूहळू विकास कसा झाला हे माहीत असेल, उत्पादन निर्दोष कसे बनविण्यात आले हे माहीत असेल, तर त अधिक चागल्या रीतीने काम करू शकतील. सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने त्यांचे श्रम किती महत्त्वाचे आहेत ह्याची त्यांना पूर्ण जाणीव असेल व ते अधिक उत्साहाने काम करतील.

परकी साहित्याचे ज्ञानही आवश्यक आहे, कारण सारत: साहित्यिक सृजनशीलता सर्व देशांमध्ये आणि सर्व माणसांशी सारखीच असते. पुष्कीनने गोगोलला 'मृतात्मे'चा विषय पुरविला, तर खुद्द पुष्कीनने तो कदाचित इंग्लिश लेखक लॉरेन्स स्टर्न ह्याच्या 'The Sentimential Journey'मधून घेतला, ह्यासारख्या वरपांगी, बाह्य दुव्यांची केवळ ही बाब नव्हे. त्याचप्रमाणे 'मृतात्मे

आणि डिकन्स ह्यांच्या ' The Pickwick Papers 'मधील विषयाचे साधर्म्यही फारसे महत्त्वाचे नाही. महत्त्वाचे आहे ह्या वस्तुस्थितीची जाणीव होणे की, अनादी कालापासून, " माणसांची मने पकडण्यासाठी " सर्वत्र जाळे विणून ठेवण्यात आले आहे आणि त्याउलट, माणसांना भोळ्या समजुती, दूषित पूर्वग्रह व पक्षपातांपासून मुक्त करणे हेच स्वतःच्या कार्याचे उद्दिष्ट मानणारे लोक नेहमी आणि सर्वत्र आहेत. हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे की, लोकांना प्रसन्न करणाऱ्या क्षुल्लक गोष्टींमध्ये गुंतून पडण्यास जसे नेहमी उत्तेजन देण्यात आले आहे, तसेच स्वतःच्या जीवनाभोवतालच्या क्षुद्र आणि वाईट गोष्टींविरुद्ध बंड करून उठणारे लोकही आहेत. अंतिम विश्लेषणात हेही जाणून घेणे महत्त्वाचे आहे की, लोकांना ज्यांनी पुढचा मार्ग दाखविला व त्या मार्गावरून जाण्यास त्यांना प्रवृत्त केले, त्या बंडखोरांनी वर्गीय समाजाने, भांडवलदारी सरकारने, निर्माण केलेल्या दुष्ट परिस्थितींशी जुळवून घेण्याचा आणि समझोता घडविण्याचा प्रचार करणाऱ्यांवर वरचष्मा प्रस्थापित केला आहे. भांडवलदारी समाजाने कामकरी लोकांना लोभाची, मत्सराची, श्रमाविषयी आळस व तिटकाऱ्याची, अशा किळसवाण्या दुर्गुणांची बाधा घडविली आहे.

मानवी श्रम आणि सृजनशीलता ह्यांचा इतिहास मानवाच्या इतिहासापेक्षा खूपच अधिक रंजक आणि महत्त्वाचा आहे. शंभर वर्षे पुरी करण्यापूर्वीच माणूस मरतो, पण त्याच्या कलाकृती शतकानुशतके जगतात. स्वतःच्या विषयाच्या विकासाचा इतिहास माहीत असलेला शास्त्रज्ञ विज्ञानाच्या प्रचंड सिद्धींचा व त्याच्या जलद वाढीचा खुलासा करू शकतो. विज्ञान आणि साहित्य ह्यांच्यात खूप साम्य आहे : दोन्हींमध्ये निरीक्षण, तुलना आणि अभ्यास मुख्य भूमिका बजावतात; लेखक आणि शास्त्रज्ञ अशा दोघांनाही कल्पनाशक्ती व " अंतर्ज्ञान " पाहिजे.

वस्तुस्थितींच्या साखळीतील मोकळ्या फटी भरून काढण्यास कल्पनाशक्ती व अंतर्ज्ञान मदत करतात; " गृहीते " व सिद्धांत निर्माण करण्यास शास्त्रज्ञाला मदत करतात. त्यायोगे नैसर्गिक शक्ती व परिस्थिती यांविषयीच्या मनातील कुतूहलांना कमीअधिक प्रभावी प्रमाणात मार्गदर्शन लाभते. हळूहळू त्या नैसर्गिक शक्तींवर आणि परिस्थितींवर प्रभुत्व प्राप्त करून माणसाचे मन व त्याची इच्छाशक्ती मानवी संस्कृतीला निर्माण करतात आणि ही मानवी संस्कृती म्हणजेच प्रत्यक्षात आपला " दुसरा स्वभाव " बनते.

दोन वस्तुस्थितींद्वारा हे विधान उत्तमरीत्या सिद्ध करता येईल : ख्यातनाम रसायनशास्त्रज्ञ द्मित्री मेन्देलेयेव ह्यांनी त्या काळात ज्ञात असलेल्या घटकांच्या — लोह, शिसे, गंधक, पारा इ. — अभ्यासावर आधारित स्वतःचा तक्ता बनविला. त्यात नमूद केले होते की, अद्यापि शोध न लागलेले अनेक घटक निसर्गात अस्तित्वात

होते. ह्या अज्ञात घटकांपैकी प्रत्येकाचे विशिष्ट गुरुत्वही त्यांनी नमूद केले होते. त्यानंतर हे सर्व घटक सापडले आहेत; त्याशिवाय, खुद्द मेन्देलेयेव ह्यांनाही ज्या घटकांच्या अस्तित्वाची अजिबात कल्पना नव्हती, असे घटक शोधून काढण्यात मेन्देलेयेव-पद्धती उपयोगी पडली आहे.

आणखी एक वस्तुस्थिती : ख्यातनाम फ्रेंच कादंबरीकार आणि एक श्रेष्ठ लेखक, होनारे दे बाल्झाक ह्यांनी स्वतःच्या एका पुस्तकात म्हटले होते की, मानवी शरीरयंत्रणेत तेव्हा विज्ञानाला कदाचित अज्ञात असलेले काही जोमदार स्राव घडत होते अशी त्यांची धारणा होती व त्यांचा माणसाच्या विविध मानसिक –शारीरिक वैशिष्टयांवर परिणाम घडत होता. त्यानंतर अनेक दशकांनी, मानवी शरीरयंत्रणेतील स्राव निर्माण करणाऱ्या, पूर्वी अज्ञात असलेल्या अशा अनेक "ग्रंथीं"चा शोध लागला व त्यातून पुढे अत्यंत महत्त्वाचे असे "स्रावग्रंथीं"चे शास्त्र निर्माण झाले. शास्त्रज्ञांच्या आणि प्रमुख लेखकांच्या सृजनशील कार्याचा असा संयोग अनेकदा घडला आहे. लोमोनोसोव व गोएथे एकाच वेळी कवी आणि शास्त्रज्ञ होते. तीच कथा कादंबरीकार स्त्रिन्द्रबेर्ग यांच्याबाबत. वातावरणातून नत्रवायू वेगळा काढणे शक्य असल्याचे आधी जाणणाऱ्या लोकांमध्ये त्याच्या 'कप्तान कोल' ह्याचा समावेश होता.

व्यक्तिरेखांना आणि "नमुन्यां"ना आकार देण्याशी संबंधित असलेल्या साहित्यिक सृजनाच्या कलेसाठी कल्पनाशक्तीची आणि शोधकतेची गरज असते. एखादा दुकानदार, मुलकी नोकर, अगर कामगार रेखाटताना जर लेखकाने स्वतःच्या ओळखीच्या एकाच माणसाचे कमी-अधिक प्रामाणिक छायाचित्र निर्माण केले, तर ते केवळ एक छायाचित्र ठरेल. त्याला कोणतेही सामाजिक, शैक्षणिक महत्त्व असणार नाही व अथवा माणूस अथवा जीवन ह्यांच्याविषयीचे आपले ज्ञान विस्तारण्यात ते काहीही मदत करणार नाही.

मात्र वीस, पन्नास अथवा शंभरसुद्धा दुकानदारांची, मुलकी सेवकांची अगर कामगारांची सर्वात वैशिष्टयपूर्ण अशी वर्गीय वैशिष्टये, त्यांच्या सवयी, आवडी-निवडी, हातवारे, समजुती आणि बोलण्याची ढब साररूपाने सादर करण्यात जर लेखक समर्थ ठरला, एकाच दुकानदाराच्या, मुलकी सेवकाच्या अथवा कामगारांच्या व्यक्तिरेखेत ह्या सर्व गोष्टींना संक्षेपरूपाने सामावण्यात जर समर्थ ठरला, तर त्यायोगे तो एक "नमुना" निर्माण करतो आणि ती कला आहे. कलाकाराच्या निरीक्षणांचा पल्ला आणि त्याचा संपन्न जीवनानुभव त्याला अशी ताकद प्राप्त करून देतात जी त्याच्या वस्तुस्थितिविषयक वैयक्तिक दृष्टिकोनावर –दुसऱ्या शब्दात, त्याच्या आत्मनिष्ठ दृष्टिकोनावर – मात करते. वैयक्तिकरीत्या बाल्झाक भांडवलदारी समाजव्यवस्थेचा कैवारी होता, पण त्याच्या पुस्तकांमधून

मात्र त्याने आश्चर्यकारक आणि निष्ठुर नागवेपणाने मध्यमवर्गीयांच्या दुष्ट व हलक्या प्रवृत्तीचे वर्णन केलेले आहे. लेखक आपापल्या वर्गाचे व काळाचे वस्तुनिष्ठ इतिहासकार बनल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. प्राणी कोणत्या परिस्थितीत खातात आणि जगतात, त्यांच्या पुनरुत्पादनाची आणि नष्ट होण्याची कारणे, ह्यांचा अभ्यास करणाऱ्या व प्राण्यांच्या पाशवी जीवनसंघर्षाची वर्णने करणाऱ्या पंडिती प्राणीशास्त्रज्ञांच्या तोलाची वस्तुनिष्ठता अशा लेखकांच्या लेखनात असते.

जीवनसंघर्षामध्ये माणसाच्या आत्मरक्षणाच्या प्रेरणेने त्याच्यात दोन प्रभावी सृजनशील शक्ती निर्माण केलेल्या आहेत – ज्ञान आणि कल्पनाशक्ती. ज्ञान, अभिज्ञेची देणगी म्हणजे नैसर्गिक परिस्थिती आणि सामाजिक जीवनातील घडामोडी निरीक्षण करण्याची, त्यांची तुलना करण्याची व त्यांचा अभ्यास करण्याची समर्थता. थोडक्यात, ज्ञान म्हणजे विचार करणे. कल्पनाशक्तीसुद्धा सारतः जगाबद्दलचा विचार करण्याची एक तऱ्हा होय. पण प्रतिमांच्या स्वरूपात तो विचार असतो. निसर्गातील वस्तूंना व महाभूतांच्या शक्तींना मानवी गुण, भावना आणि इरादेसुद्धा चिकटविण्याची समर्थता म्हणजे कल्पनाशक्ती असे म्हणता येईल.

वारा " विव्हळतो " अथवा " कण्हतो ", चंद्राचा " खिन्न प्रकाश ", " बडबडा " ओढा, " कुजबुजणारा " निर्झर अशा व तत्सम अनेक नैसर्गिक परिस्थितींना अधिक ठळक बनविण्याच्या उद्दिष्टाने वापरलेल्या अभिव्यक्ती आपण ऐकतो आणि बोलतो.

ह्याला " सगुणरूप " देणे म्हणतात. माणूस ज्या ज्या गोष्टी पाहतो त्या त्या सर्वांना स्वतःचे मानवी गुण चिकटविण्याची माणसाची एक तऱ्हा आहे, असे येथे ध्यानात येईल. ह्या गोष्टींची तो कल्पना करतो व नैसर्गिक परिस्थितीबरोबर त्यांना जोडतो; स्वतःच्या श्रमामधून आणि मनामधून निर्माण होणाऱ्या प्रत्येक गोष्टीशी सांगड घालतो. सगुणरूपाला साहित्यात थारा देऊ नये असे मानणारे काही लोक आहेत. सगुणरूप साहित्याला विरोधी आहे असेही ते मानतात. पण हीच माणसे म्हणतात : " गारठ्याने त्याच्या कानांना चिमटा काढला ", " सूर्याने स्मित केले ", " मे नजीक आला "; एवढेच नव्हे तर " दुष्ट हवा " म्हणतात. वस्तुतः हवेच्या संदर्भात नैतिक मापदंड लावणे अवघड ठरेल.

झेनोफानीस ह्या प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्त्याने प्रतिपादन केले होते की, प्राण्यांना जर कल्पनाशक्तीची देणगी लाभली असती, तर देव म्हणजे एक महाप्रचंड आणि अजिक्य सिंह आहे असे सिंहांना वाटले असते, उंदरांना देव म्हणजे उंदीर वाटला असता, इत्यादी. डासांचा देव बहुधा डास असता, तर क्षयरोगग्रंथींच्या सूक्ष्म जंतूंचा देव हा सूक्ष्म जंतू असता. माणसाने स्वतःच्या देवाला सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान आणि सर्वोत्पादक बनविले आहे. दुसऱ्या शब्दात, स्वतःच्या

सर्वोत्तम आकांक्षा त्याने देवाला प्राप्त करून दिल्या आहेत. "जीवनाच्या आत्यंतिक दारिद्रचा "मधून आणि जीवनाला अधिक संपन्न, अधिक न्याय्य व चांगले बनविण्याच्या माणसाच्या अंधुक ऊर्मीमधून निर्माण झालेली बनावट गोष्ट म्हणजे देव. सर्वसामान्य जीवनापासून देवाला वरच्या पातळीवर चढविण्यात आले आहे, कारण स्त्री-पुरुषांच्या सर्वोत्तम गुणांना व इच्छांना जीवनाच्या वास्तवांमध्ये जागा सापडत नाही. त्यांचे जीवन म्हणजे निव्वळ निर्वाहासाठी चाललेला खडतर संघर्ष असते.

आपल्याला दिसते की, अंगच्या सर्वोत्तम गुणांचा बंधनविरहित विकास घडविण्यासाठी जीवनाची नवी घडी कशी घातली पाहिजे हे कामगारवर्गातील काही लोकांना जेव्हा समजले तेव्हा आपोआप कालबाह्य बनलेला देव एक अनावश्यक वस्तू ठरला. त्यांच्यातील सर्वोत्तम देवाच्या प्रतिमेस उदात्त करण्याची इतःपर गरज उरली नाही, कारण त्या सर्वोत्तमाचे आता सजीव आणि ऐहिक वास्तवतेत रूपांतर करणे शक्य ठरले.

साहित्यिक "नमुने" जसे निर्माण करतात त्याचप्रमाणे संक्षेपाच्या व साकार करण्याच्या नियमांनुसार देव निर्माण करण्यात आला. विविध वीरांनी केलेल्या वैशिष्टचपूर्ण पराक्रमांचे संकलन करून अथवा त्यांचा "संक्षेप" करून, मग त्यांना एकाच वीराच्या व्यक्तिमत्त्वात साकार करण्यात आले. उदाहरणार्थ, हर्क्यूलस अथवा विख्यात रशियन शेतकरीवीर इल्या मूरोमेत्स. कोणत्याही व्यापाऱ्याची, उमरावाची अथवा शेतकऱ्याची खास वैशिष्टचे "संक्षिप्त" करण्यात येतात व नंतर कुणा एका व्यापाऱ्याच्या, उमरावाच्या अथवा शेतकऱ्याच्या व्यक्तिमत्त्वात त्यांचे नमुनेकरण होते. दुसऱ्या शब्दात, आता "साहित्यिक नमुना" निर्माण झाला.

अशा पद्धतीने फाऊस्ट, हॅम्लेट आणि डॉन क्विक्झोट निर्माण करण्यात आले. तल्स्तोयनी दीन व "देवभोरू" प्लातोन कारातायेव निर्माण केला, दस्तोयेवस्कींनी कारामाझोव आणि स्विद्रीगायलोव निर्माण केले, गोन्चारोवनी अब्लोमोव निर्माण केला.

ही माणसे वास्तवात कधीही अस्तित्वात नव्हती, पण त्यांच्यासारखे अनेकजण होते. केवळ अधिक क्षुद्र आणि घडणीचा कमी एकेरीपणा असलेले. एकेक विटांमधून बांधकाम करणारे ज्याप्रमाणे मनोरे व मंदिरे उभारतात, त्याप्रमाणे लेखकांनी साहित्यिक "नमुने" निर्माण केले आहेत. त्यांच्यात विशिष्ट मानवी गुण सारांशाने असतात. थापाड्याला आपण ख्लेस्ताकोव म्हणतो, तर हांजीखोराला मोल्चालिन म्हणतात, ढोंग्याला तार्त्यूफ म्हणतात आणि मत्सरी माणसाला अथेल्लो म्हणतात. ही यादी खूप लांबविता येईल.

साहित्यात दोन "प्रवाह" अथवा पठड्या आहेत : रोमांचवाद आणि वास्तववाद. लोकांचे आणि त्यांच्या जीवनपरिस्थितीचे खरेखुरे, चकाकी न दिलेले चित्रण म्हणजे वास्तववाद. रोमांचवादाच्या अनेक व्याख्या पुढे सादर करण्यात आल्या आहेत, पण साहित्याच्या सर्व इतिहासकारांचे समाधान घडेल अशी नेमकी अथवा सर्वसमावेशी व्याख्या आजपर्यंत निर्माण झालेली नाही. दोन अगदी परस्परविरोधी प्रवृत्ती रोमांचवादात आढळून येतात : निष्क्रिय आणि सक्रिय जीवनाला सुशोभित बनवून माणसाला त्याच्या जीवनाशी पुन्हा जुळवून घ्यायला लावण्याचा निष्क्रिय रोमांचवाद प्रयत्न करतो; अथवा त्याच्या अंतरंगातील जगाच्या निरर्थक आत्मनिरीक्षणाद्वारे, प्रेम, मृत्यू आणि इतर निर्भार अशा "जीवनाच्या न सोडविता येणाऱ्या समस्यांच्या" विचारांच्या – ज्या समस्या "तर्का"ने अथवा चिंतनाने नव्हे, तर केवळ विज्ञानामार्फतच सोडविता येतात – आत्मनिरीक्षणाद्वारे त्याच्या भोवतालच्या गोष्टींपासून त्याचे लक्ष दुसरीकडे वेधवून घेण्याचा प्रयत्न करतो. सक्रिय रोमांचवाद माणसाची जगण्याची इच्छा दृढ करतो, त्याच्या भोवतालच्या जीवनाविरुद्ध त्याला उठवितो. त्या जीवनाने लादलेल्या कोणत्याही जोखडाविरुद्ध त्याला उठवितो.

असे असले तरीही, बाल्झाक, तुर्गेनेव, तल्स्तोय, गोगोल, लेस्कोव अथवा चेखोव यांच्यासारखे अभिजात लेखक रोमांचवादी होते किंवा वास्तववादी होते हे पुरेशा अचूकपणे सांगणे अवघड आहे, कारण थोर कलाकारांमध्ये वास्तववाद व रोमांचवाद यांचा संकर झाल्याचे भासते. बाल्झाक वास्तववादी होता, पण तरीही त्याने वास्तववादापासून अतिदूर अशा 'La pean de Chagrin' ('खडबडीत कातडे') सारख्या कादंबऱ्या लिहिल्या. तुर्गेनेवनेसुद्धा रोमांचकारी शैलीत लेखन केले, तसेच गोगोलपासून ते चेखोव व बुनिनपर्यंत आमच्या सर्व आघाडीच्या लेखकांनी रोमांचकारी शैलीत लेखन केले. रोमांचवाद आणि वास्तववाद यांचा हा संयोग आमच्या थोर लेखकांचे फार मोठे वैशिष्टच ठरला आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनात अभिजातता निर्माण झाली आहे व सबंध जागतिक साहित्यावर त्यांच्या लेखनाचा सतत वाढत्या प्रमाणात आणि ठळकरीत्या जोरदार प्रभाव पडत आहे.

कॉम्रेडहो, "लिहायची ऊर्मी का निर्माण होते ?" ह्या प्रश्नाचा जर तुम्ही विचार केलात, तर वास्तववाद आणि रोमांचवाद ह्यांच्यामधील नाते तुम्हाला अधिक स्पष्टपणे समजेल. ह्या प्रश्नाची दोन उत्तरे आहेत. त्यांपैकी एक उत्तर माझ्याशी पत्रव्यवहार करणाऱ्या एका कामगाराच्या १५ वर्षांच्या मुलीने दिले आहे. मला पाठवलेल्या पत्रात तिने लिहिले होते :

"मी १५ वर्षांची आहे, पण एवढ्या लहान वयातही लेखकाचा गुण माझ्यात निर्माण झालाय, कारण जीवन अत्यंत नीरस आहे."

अर्थात, " लेखकाचा गुण " असे म्हणण्याऐवजी, " अत्यंत नीरस जीवन " उजळून संपन्न बनविण्यासाठी लेखनाची इच्छा म्हणणे अधिक बरोबर ठरले असते. मग प्रश्न निर्माण होतो: अशा प्रकारच्या जीवनपद्धतीत कशाबद्दल लिहिणे शक्य आहे ?

वोल्गा नदीतीरावरील प्रदेशात राहणाऱ्या, उराल व सैबेरियात राहणाऱ्या अनेक राष्ट्रजमातींनी ह्या प्रश्नाला उत्तर उपलब्ध करून दिले आहे. अगदी काल-पर्यंत त्यांच्यापैकी अनेकांपाशी लिपीसुद्धा नव्हती, तरीही आजपासून अनेक शतके मागच्या काळात, गाणी, कहाण्या, देवांविषयीच्या शौर्यशाली दंतकथा व पुराण-कथा निर्माण करून घनदाट जंगलांमधील, दलदलीच्या प्रदेशांमधील, पूर्वेतील ओसाड स्तेपमधील व उत्तरेतील तुंद्रामधील त्यांचे " अत्यंत नीरस जीवन " त्यांनी संपन्न बनविले आणि त्याला सुंदर केले. हे सर्व " धार्मिक सृजनशीलतेमध्ये " समाविष्ट होते, पण सारतः ते कलाप्रांतात दाखल होते.

माझ्या तरुण पत्रकर्त्रीच्या लेखनगुणाचा खरोखरीच जर विकास घडला – तसा तो घडावा अशी माझी मनःपूर्वक इच्छा आहे – तर कदाचित ती " रोमांचकारी " शैलीत लेखन करील. स्वतःच्या " अत्यंत नीरस जीवनाला " सुंदर काल्पनिक गोष्टींनी सजविण्याचा ती प्रयत्न करील व लोक आहेत त्यापेक्षा त्यांचे अधिक चांगले वर्णन करील. ' इवान इवानोविचनी इवान निकीफरोविचशी कसे भांडण केले ', ' जुन्या धाटणीचे जमीनदार ' आणि ' मृतात्मे ' ह्यांचे लेखक गोगोल आहेत, पण ' तारास बूल्बा 'सुद्धा त्यांनीच लिहिले. पहिल्या तीन कथा ' मृत आत्मे ' असलेल्या लोकांचे वर्णन करतात आणि भयानक सत्याचे चित्रण करतात, कारण अशी माणसे पूर्वी राहात होती आणि आजही तशी अस्तित्वात आहेत. अशा वर्णनांच्या वेळी गोगोल " वास्तववादी " आहेत.

' तारास बूल्बा 'मध्ये झापोरोझ्येच्या कझाकांचे चित्रण देवभीरू, उमदे आणि बलाढ्य पुरुष असे केले आहे. आपल्या शत्रूंना ते स्वतःच्या भाल्यांच्या टोकांवर हवेत उचलून धरीत; जरी स्पष्ट आहे की, माणसाच्या वजनाखाली भाल्याचा लाकडी दांडा तुटू शकतो ! गोगोलने वर्णन केलेला कझाक वास्तवात कधीच अस्तित्वात नव्हता आणि ती कथा म्हणजे कल्पित लेखनाचा एक नमुना आहे. तिच्यात, त्याचप्रमाणे सर्व ' रूडी पान्को ' कथांमध्ये, गोगोल रोमांचवादी होते. " मृतात्म्यांचे अत्यंत नीरस जीवन " निरीक्षण्याचा त्यांना खूप कंटाळा आला असावा, हे कदाचित कारण असावे.

अनेक बाबतीत माणूस अजून पशू आहे, पण त्याच वेळी सांस्कृतिक अर्थाने तो अद्यापि एक कच्चा तरुण आहे आणि त्याचे थोडे कौतुक करणे व त्याला नटविणे उपयुक्त आहे. त्यामुळे त्याच्यात आत्मप्रतिष्ठा निर्माण होते व स्वतःच्या

सृजनशक्तींमध्ये त्याला विश्वास वाटू लागतो. शिवाय, माणसाचे कौतुक करणे सर्वथा योग्य आहे, कारण त्याच्या ताकदीमधून आणि त्याच्या इच्छाशक्तीमधूनच चांगली आणि सामाजिकदृष्टचा मौल्यवान अशी प्रत्येक गोष्ट निर्माण झालेली आहे.

आत्ता जे काही मी बोललो त्या सर्वाचा अर्थ, साहित्यात रोमांचवाद आवश्यक असल्याचे मी प्रतिपादन करतो, असा होतो का ? होय, त्या गरजेची आवश्यकता मी मान्य करतो, पण केवळ अत्यंत महत्त्वाच्या अशा विशिष्ट व्यापक अर्थाने.

सतरा वर्षांच्या एका तरुण कामगार पत्रकर्त्याकडून माझ्यापर्यंत आरोळी पोहोचत आहे : " माझ्या मनात एवढे ठसे भरले आहेत की, लेखन न करणे मला अशक्य आहे."

ह्याबाबतीत लेखनाची आस जीवनाच्या " दारिद्रचा "मधून निर्माण होत नाही, तर जीवनाच्या संपदेमधून, ठशांच्या विपुलतेमधून आणि त्यांचे वर्णन करण्याच्या आंतरिक उमाळ्यामधून निर्माण होते. माझे बहुसंख्य तरुण पत्रलेखक लेखन करू इच्छितात याचे कारण केवळ त्यांच्यापाशी जीवनाचे ठसे विपुल आहेत व जे काही त्यांनी पाहिले आणि अनुभवले, त्याबाबत " गप्प राहणे त्यांना शक्य होत नाही." त्यांच्यामधून अनेक " वास्तववादी " कदाचित उदयाला येतील, पण मला वाटते की, त्यांच्या वास्तववादाला विशिष्ट रोमांचवादाची छटा लाभलेली असेल. निकोप आत्मिक उत्थानाच्या काळात असे घडणे अपरिहार्य आणि योग्य आहे व सध्या आपण अशाच काळामधून जात आहोत.

तर मी का लिहायला आरंभ केला, ह्या प्रश्नाचे मी उत्तर देतो : माझ्या-वर " अत्यंत नीरस जीवना "चा दबाव पडला म्हणून आणि त्याचप्रमाणे माझ्या मनात विपुल ठसे निर्माण झाल्यामुळे " लेखन न करणे अशक्य ठरले " म्हणून. पहिल्या कारणापायी माझ्या " नीरस " जीवनात ' बहिरीससाणा आणि गवती साप यांची गोष्ट ', ' जळत्या हृदयाची दंतकथा ', ' वादळी सागरपक्षी 'सारख्या काल्पनिक गोष्टी निर्माण करण्यास मी उद्युक्त बनलो. दुसऱ्या कारणापायी ' सव्वीस पुरुष आणि एक मुलगी ', ' ओर्लोव जोडपे ', ' आडदांड 'सारख्या " वास्तववादी " स्वरूपाच्या कथा मी लिहिल्या.

आपल्या " रोमांचवादा "च्या संदर्भात पुढील आठवण केली पाहिजे. चेखोव यांच्या ' शेतगडी ' व ' घळीत ' आणि बुनिन यांची ' खेडे ' व शेतकरीवर्गा-बाबतच्या त्यांच्या सर्व कथा अवतीर्ण होईपर्यंत, आमच्या उमरावांच्या साहित्यात शेतकऱ्याला एक दीन आणि सहनशील माणूस म्हणून सादर करण्याचा छंद होता. आणि त्याचे हे चित्रण अत्यंत कुशलपणे करण्यात येई. दुसऱ्या जगामधील " ख्रिस्ताच्या सत्या "सारख्या काही गोष्टींची आकांक्षा धरणारा, जीवनाच्या वास्तवामध्ये मुळे नसलेल्या अशा कशाचीतरी आकांक्षा बाळगणारा, असा शेतकरी

चित्रित करण्यात येई. पण तरीसुद्धा 'होर आणि कालीनिच' ह्या तुर्गेनेवच्या कथेतील कालीनिचसारख्या व तल्स्तोय यांच्या 'युद्ध आणि शांतता'मधील प्लातोन कारातायेवसारख्या शेतकऱ्यांना तशी स्वप्ने पडत होती. भूदासपद्धती रद्द करण्यापूर्वी सुमारे वीस वर्षे "देवाच्या सत्यां"ची दीनपणे आणि चिकाटीने स्वप्ने पाहणारा माणूस म्हणून शेतकरी चित्रित करण्याची प्रवृत्ती उदयाला आली. वस्तुतः तोपर्यंतो भूदास शेतकरीवर्गाच्या अडाण्यांमधून एव्हाना गुणी उद्योगपती निर्माण झाले होते. शेतकरीवर्गामधून पुढे आलेल्या त्या बलाढ्य आणि उत्तुंग व्यक्तींचा – लोमोनोसोव, कवी व नामवंत शास्त्रज्ञ – वृत्तपत्रांमधून अधिकाधिक वारंवारपणे निर्देश घडत होता.

पण कालपर्यंत नागरी हक्कांपासून वंचित असलेले कारखानदार, जहाज-बांधणीकार आणि व्यापारी आता उमरावांच्या जोडीने जीवनात स्वतःचे स्थान विश्वासपूर्वक निर्माण करू लागले व प्राचीन रोममध्ये "मुक्त गुलाम" जसे स्वतःच्या माजी मालकांपाशी एकाच मेजावर बसत, त्याप्रमाणे बसू लागले. अशी माणसे आपल्यामधून पुढे आणून शेतकरीवर्ग स्वतःच्या सुप्त सामर्थ्याची आणि गुणांची जाणीव करून देत होता. हा वास्तववादी, खरा, निर्धाराने आणि जीवन तहानेने मुसमुसलेला, उभारणीकार, संपदा गोळा करणारा आणि अत्यंत व्यवहारी माणूस, काळाचा नवा नायक म्हणून मान्य करण्यात व त्याचे चित्रण करण्यात उमरावांनी निर्मिलेल्या साहित्याला अपयश आले. उलट, सदसद्विवेकबुद्धीने जखड-लेल्या दीनवाण्या स्वभावाच्या भूदासांचे आवडीने चित्रण करण्याची प्रथा त्या साहित्याने पुढे चालू ठेवली. १८५२ मध्ये ल्येव तल्स्तोयनी 'एका जमीनदाराची सकाळ' नामक करुण व्यक्तिचित्र लिहिले होते. एका प्रेमळ अंतःकरणाच्या आणि उदार मनाच्या मालकावर त्याचे भूदास कसा अविश्वास दाखवितात ह्याचे फार सुरेख वर्णन त्यात होते. १८६२ मध्ये तल्स्तोयनी शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण द्यायला आरंभ केला, विज्ञानाला आणि "प्रगती"ला त्यांनी अमान्य केले व योग्य कसे जगावे हे शिकण्यासाठी लोकांनी शेतगड्यापाशी जावे, असा प्रचार सुरू केला. आठव्या दशकात त्यांनी "लोकां"साठी कथा लिहिल्या. ख्रिस्तप्रेमी आणि रोमां-चक वृत्तीचे शेतकरी म्हणून त्यांनी त्यांचे चित्रण केले; खेड्यातील जीवन सुखाचे आहे आणि शेतकऱ्याचे जमीन नांगरणे हे पवित्र श्रम आहेत अशी शिकवण दिली. 'माणसाला किती जमीन लागते?' ह्या कथेत शेवटी त्यांना प्रतिपादन केले की, थडग्यासाठी माणसाला फक्त सहा फूट जमिनीची गरज असते.

गरीब आणि ख्रिस्तप्रेमी माणसे प्रत्यक्ष परिस्थितीपायी आर्थिक जीवनाच्या नव्या प्रकारांची रचनाकार बनत होती. सात्तीकोव-श्चेद्रिन व ग्लेब उस्पेन्स्की यांनी वर्णिलेल्या लोभी व कबजा करणाऱ्या मध्यमवर्गीयांमध्ये आणि मोठ्या

उद्योगपतींमध्ये त्या माणसांचे रूपांतर घडत होते. त्याच वेळी बंडखोर आणि क्रांतिकारक यांचा उदय घडत होता. पण ह्या सगळ्या लोकांकडे उमरावी साहित्य मात्र दुर्लक्ष करीत होते. आपल्या साहित्यामधील एक सर्वोत्तम कादंबरी मानल्या गेलेल्या 'अब्लोमोव' मध्ये लेखक गोन्चारोव यांनी अतिरिकामटेकडेपणापायी वेड-पणाच्या अवस्थेला पोहोचलेल्या एका रशियन उमरावाच्या व्यक्तिरेखेच्या विरोधात एक जर्मन दाखविला आहे; पण एखादा "माजी" रशियन भूदास दाखविला नाही. वस्तुत: स्वत: गोन्चारोव त्या भूदासांमध्ये राहिलेले होते व एव्हाना भूदासांनी देशाचे आर्थिक जीवन हाकण्यास आरंभ केला होता. जस उमरावांमधील लेखकांनो एखाद्या क्रांतिकारकाचे वर्णन केलेच, तर तो माणूच एक तर परदेशी बल्गारियन असायचा, अथवा 'रूदीन' प्रमाणे केवळ शब्दानेर बंडखोर असायचा. काळाचा नायक ह्या नात्याने, निर्धारी आणि कृतिशील रशियनाचे साहित्यात दर्शन घडत नव्हते. पण साहित्यिकांच्या "नजरेच्या टप्प्या-पल्याड" रशियन माणूस बाँबच्या मदतीने प्रत्यक्षात बराच गोंगाट माजवीत होता. रशियन उमरावी साहित्याला सक्रिय आणि सहेतुक रोमांचवादाचे वावडे होते हे दाखविण्यास भरपूर पुरावा उपलब्ध आहे. शिल्लेरसारखा लेखक निर्माण करण्यात ते निष्प्रभ ठरले आणि 'दरोडेखोर' ऐवजी 'मृतात्मे', 'जिवंत प्रेत', 'मृत घरे', 'तीन मृत्यू' आणि इतर अनेक मृत्यूंची सुरेख चित्रणे करीत राहिले. दस्तोये-वस्कीचे 'अपराध आणि शासन' बहुधा शिल्लेरच्या 'दरोडेखोर'च्या निषेधार्थ लिहिले गेले.

सक्रिय सामाजिक क्रांतिकारकांचा रोमांचवाद राझनोचिनेत्स[१] बुद्धिमंतांच्या साहित्यालाही परका होता. राझनोचिनेत्सला स्वत:च्या भवितव्याचीच फार चिंता होती आणि जीवननाट्यात तो आपले स्थान शोधीत होता. एकतंत्री सत्तेचा घण आणि "लोकांची" ऐरण यांच्या दरम्यान तो सापडला होता.

जीवनात मूळ नसलेल्या आणि "ना मोर ना चिमणी" अशी अवस्था असलेल्या बुद्धिजीवी लोकांच्या शोकांतिकेचे वास्तव आणि प्रभावी चित्रण स्लेप्त्सो-वच्या 'कठीण काळ' आणि असीपोविच-नवोद्वोर्स्कीच्या 'ना मोर ना चिमणी अशाच्या जीवनातील प्रसंग' मध्ये होते. अथवा कूश्चेवस्कीच्या आणि गुणी, कमालीचा बुद्धिमान, पण गुणांचे पुरेसे चीज न झालेला लेखक पोम्यालोवस्की याच्या 'मोलोतोव' आणि 'क्षुद्र सुख' मध्ये अहंकारी, क्षुद्र प्रवृत्तीच्या माणसांचे दर्शन घडते. जाता जाता सांगायचे म्हणजे ह्या दोन्ही कथांचे स्वारस्य आपल्या

१. राझनोचिनेत्स—शेतकरीवर्ग, धर्मगुरू, मध्यमवर्गीय आणि कनिष्ठ उमराव, अशा समाजाच्या विभागांमधून रशियन बुद्धिजीवी वर्गात दाखल झालेल्या कुणाही माणसाला १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात मिळालेले नाव. —सं.

आजच्या काळातही टिकून राहिले आहे, कारण क्षुद्रप्रवृत्ती माणूस परत निर्माण झाला आहे आणि ज्या देशात समाजसत्तावादी संस्कृती उभारण्यासाठी कामगारवर्गाने आपल्या रक्ताचे पाट ओतून किंमत दिली आहे त्या देशात हा क्षुद्र-प्रवृत्ती यशस्वीरीत्या स्वतःसाठी विशिष्ट सवंग वैभव प्राप्त करू लागला आहे.

ग्रामीण जीवनाला आदर्शरूप देण्याच्या दक्ष प्रयत्नांमध्ये तथाकथित नरोदनिक लेखकांनी उमरावर्गातील लेखकाच्या सुरात आपला सूर मिसळला. ह्या नरोदनिकांना शेतकऱ्यामध्ये एक स्वाभाविक समाजवादी दिसला, ज्याला खेड्यातील " समुदाया "शिवाय, " मीर "शिवाय, दुसरे कोणतेही सत्य माहीत नव्हते. अत्यंत बुद्धिमान उमराव हेर्झेन ह्यांनी शेतकरीवर्गाबाबतचा हा दृष्टिकोन सर्वांत प्रथम जोपासला आणि " वास्तव " व " न्याया "चे अशी दोन सत्ये शोधून काढणाऱ्या नि. मिखायलोवस्कींनी त्यांचा मार्ग अनुसरला. नरोदनिक लेखकांचा " समाजा " वरील प्रभाव दुबळा आणि अल्पजीवी होता. त्यांचा " रोमांचवाद " हा त्यांच्य उमराव सहकाऱ्यांच्या रोमांचवादापेक्षा गुणांच्या अल्पतेत केवळ भिन्न होता आणि त्यांचे स्वप्नरंजक – मिनाय आणि मित्यायसारखे शेतकरी – म्हणजे पोलीकूष्का, कालीनिच आणि कारातायेव व इतर तत्सम धर्मभीरू शेतगड्यांच्या व्यक्तिरेखांची फक्त भ्रष्ट नक्कल होती.

आत्ताच निर्देश केलेल्या गटाशी खूप नजीक असलेले असे दोन अत्यंत महत्त्वाचे लेखक त्या काळात होते. पण नरोदनिकांपेक्षा सामाजिकदृष्टचा ते खूपच दूरदृष्टीचे होते व सर्व नरोदनिकांचे गुण एकत्र केले असते तरी ह्या दोघांच्या गुणांचे पारडे बरेच जड भरले असते. हे दोन लेखक म्हणजे दि. मामिन-सिबिऱ्याक आणि ग्लेब उस्पेन्स्की. शहरी आणि ग्रामीण जीवन, औद्योगिक कामगार आणि शेतकरी ह्यांच्यातील फरक ह्यांनी प्रथम दाखविला व ह्यांनीच त्यांची प्रथम दखल घेतली. ह्याबाबत ग्लेब उस्पेन्स्कींनी विशेष भेद दाखविला. ह्यांनी दोन श्रेष्ठ पुस्तके लिहिली : ' रास्तेऱ्यायेव रस्त्याची नीतिमत्ता ' आणि ' मातीची ताकद '. ह्या पुस्तकांचे सामाजिक मूल्य अजूनही टिकून आहे. सर्व-साधारणपणे, उस्पेन्स्कींच्या कथांचे शैक्षणिक महत्त्व कायम आहे आणि त्यांची निरीक्षणशक्ती व भोवतालच्या जीवनाचे त्यांचे व्यापक ज्ञान, ह्यापासून आमच्या तरुण लेखकांनी बोध घेतल्यास त्यांचे भले होईल.

मी आधीच नमूद केलेल्या ' शेतगडी ', ' घळीत ' ह्या कथांमधून, तसेच ' नवी हवेली 'मधूनही, शेतकऱ्याला आदर्शरूप देण्यास स्वतःचा कडवा विरोध असल्याचे आन्तोन चेखोवनी दाखवून दिले आहे. ह्या प्रवृत्तीला त्याहूनही जास्त कट्टर विरोध इवान बूनिन यांनी स्वतःच्या ' खेडे ' ह्या लघुकादंबरीत, तसेच सर्व शेतकरीकथांमधून व्यक्त केला. अत्यंत वैशिष्टचपूर्ण वस्तुस्थिती म्हणजे

सेम्योन पोद्याचेव व खूप गुणी आणि विकसनशील लेखक इवान वोल्नोव ह्यांच्यासारख्या शेतकरीलेखकांनी तेवढ्याच परखडपणे ग्रामीण जीवनाचे वर्णन केले आहे. शेतकऱ्याची मनोवृत्ती आणि ग्रामीण जीवन ह्यांसारखे विषय अत्यंत प्रचलित आणि महत्त्वाचे आहेत ही गोष्ट आमच्या तरुण लेखकांनी पूर्णत्वाने जाणून घेतली पाहिजे.

आत्ता जे काही म्हटले गेले त्या सर्वांवरून स्पष्ट होते की, " रोमांचवाद " म्हणजे जीवनाविषयीच्या सक्रिय दृष्टिकोनाची शिकवण आहे, जीवनाच्या नव्या प्रकारांच्या उभारणीमधील जगण्याच्या इच्छेचे तो स्फूर्तिस्थान आहे, ज्या जुन्या जगाच्या दुष्ट वारसाला आपण मोठ्या कष्टाने नाहीसे करीत आहोत त्या जुन्या जगाचा तो द्वेषस्थान आहे, ह्याची आपल्या साहित्याला अद्यापि माहिती नाही. क्षुद्रप्रवृत्तिवादाचे कोणत्याही प्रकारे पुनरुज्जीवन घडू नये आणि त्यापुढे, त्या क्षुद्रप्रवृत्तिवादामागे वर्गीय राज्याचे व परपुष्टांकडून आणि पुंडांकडून कामगार-शेतकऱ्यांचे शोषण घडण्याचे पुनरुज्जीवन होऊ नये, असे आपल्याला खरोखरीच वाटत असेल, तर ह्या शिकवणीची आत्यंतिक गरज आहे. सोविएत संघाचे सर्व शत्रू अशा " पुनरुज्जीवना "ची आतुरतेने वाट पाहात आहेत. जुने वर्गीय राज्य पुन्हा स्थापित करणे कामगारवर्गाला भाग पाडण्याच्या विशिष्ट उद्दिष्टाने ते सोविएत संघाची आर्थिक नाकेबंदी करीत आहेत. कामगार-लेखकाने अत्यंत स्पष्टपणे जाणून घेतले पाहिजे की, कामगारवर्ग आणि भांडवलदारवर्ग ह्यांच्यातील विरोध कधीही मिटणार नाही आणि केवळ संपूर्ण विजय अथवा संपूर्ण विनाशच हा विरोध सोडवू शकेल. ह्या शोकजनक विरोधामधून, इतिहासाच्या क्रमाने कामगारवर्गावर एवढ्या कठोरपणे लादलेल्या ह्या कार्याच्या अवघड स्वरूपामधून, सक्रिय " रोमांचवादा "चा उदय झाला पाहिजे; त्या सृजनशील आकांक्षेचा, निर्धाराच्या आणि मनाच्या त्या धाष्टर्यतेचा व रशियन क्रांतिकारक कामकरी माणसाचे नेहमी वैशिष्टच ठरलेल्या त्या क्रांतिकारक गुणांचा उदय झाला पाहिजे.

अर्थात, स्वातंत्र्याचा मार्ग सोपा नाही ह्याची मला जाणीव आहे. सुंदर मुलींच्या सहवासात चहा पीत बसण्याचा अथवा " स्वतःच्या रूपाचे कौतुक " न्याहाळीत आरशासमोर दंग राहण्याचा काळ अजून सर्वांच्या जीवनात आलेला नाही. मात्र ह्या गोष्टींमध्ये रमण्याकडे बऱ्याच तरुण मंडळींचा कल आहे. जीवनाच्या वास्तवता अधिकाधिक प्रमाणात पटवून देऊ पाहात आहेत की, सद्यःपरिस्थितीत शांततामय अलिप्त जीवनाची उभारणी अशक्य आहे; एकांतात अथवा निवडलेल्या जोडीदाराबरोबर राहूनही सुख लाभणार नाही; क्षुद्रप्रवृत्तीचे वैभव कायम टिकणार नाही, कारण तशा प्रकारच्या सुबत्तेच्या पायाचे दगड सबंध जगभर ढासळून पडत आहेत. अनेक लक्षणांमधून खात्रीलायकपणे हे सिद्ध

होत आहे : जगभरच्या क्षुद्रप्रवृत्तींना दुष्टाव्याने, दु:खाने आणि भीतीने घेरले आहे; युरोपच्या साहित्यामधून शोक ऐकू येत आहे; उद्याची भीती गुदमरवून टाकण्याच्या व्यर्थ आशेपायी समृद्ध क्षुद्रप्रवृत्ती अतिरेकी चैनीचा आश्रय घेत आहे आणि सरतेशेवटी, नीच सुखांबद्दल विकृत इच्छा निर्माण होत आहेत, गुन्हे आणि आत्महत्या यांचा प्रसार होत आहे. " जुने जग " खरोखरीच मरणांतिक आजारी आहे आणि त्याच्या अपकारक उच्छ्वासांचा परिणाम टाळण्यासाठी त्या जगाचा त्याग करण्याची आपण त्वरा केली पाहिजे.

युरोपातील माणसाचा नैतिक अध:पात घडत आहे, तर आमच्या देशातील कामकरी जनसमूहांमध्ये आमच्या सामर्थ्याबाबत ठाम विश्वास निर्माण होत आहे. आणि सामुदायिकाची सत्ता विकसित होत आहे तुम्हा तरुणांनी नेहमी जाणून घेतले पाहिजे की, अधिक चांगल्या जीवनाकडे वाटचाल करताना अडथळ्यांवर मात केल्यानंतर असा विश्वास माणसामध्ये निर्माण होत असतो आणि अशा प्रकारचा विश्वास सर्वात प्रबळ सृजनशील शक्ती आहे. तुम्हाला हेही ठाऊक पाहिजे की, त्या " जुन्या जगात " फक्त विज्ञान उदात्त आहे आणि म्हणून निर्विवादपणे मौल्यवान आहे. समाजसत्तावादाच्या विचारांचा अपवाद वगळता, " जुन्या जगात " प्रसारित होणारे सर्व " विचार " उदात्ततेला पारखे आहेत, कारण कामकरी समूहांच्या संस्कृतीचा व स्वातंत्र्याचा बळी घेऊन व्यक्तींच्या " सुखाला " आणि सत्तेला स्थापित करण्याचा व त्यांची न्याय्यता पटवून देण्याचा ह्या ना त्या प्रकारे ते विचार प्रयत्न करीत असतात.

माझ्या तारुण्यात मी आयुष्याविषयी कधी तक्रार केल्याची मला आठवण नाही. ज्या माणसांमध्ये मी राहात होतो त्यांना कुरकुर करायला आवडत असे, पण केवळ एकमेकांना मदत करायची टाळण्यासाठी धूर्तपणाने तसे ते वागत हे जेव्हा माझ्या ध्यानात आले, तेव्हा त्यांचे अनुकरण न करण्याचा मी प्रयत्न केला. लवकरच मला असे आढळून आले की, जे लोक कोणताही प्रतिकार करण्यास असमर्थ होते, जे लोक काम करू शकत नव्हते अथवा काम करणार नव्हते आणि सर्वसाधारणपणे आपल्या सोबतीच्या माणसांच्या जिवावर आराम करण्याकडे ज्यांचा कल होता, अशीच माणसे सर्वात जास्त कुरकुरत.

माझ्या काळात जीवनाबद्दलची भीती मी खूप प्रमाणात अनुभवली. आज मी त्या भीतीला आंधळ्या माणसाची भीती म्हणतो. अत्यंत खडतर परिस्थितींमध्ये मी राहिलो आहे आणि त्यांचे वर्णन करण्याचा प्रसंग मला लाभला होता. माझ्या बालपणात मी लोकांची निरर्थक पाशवी वागणूक पाहिली होती. त्यांची परस्परां-बद्दलची वैरभावना मला आकलन होत नसे. काहींवर पाठीचा कणा मोडेतो कष्ट लादलेले आणि इतरांनी केवळ मनमुराद वैभव भोगलेले पाहून मी चकित झालो

होतो. अगदी लहान वयापासून मला समजले होते की, धार्मिक माणसांची प्रवृत्ती अशी होती. जी माणसे त्यांच्यासाठी राबत होती त्यांना ती जेवढे दूर ठेवतील आणि कष्टकऱ्यांशी जेवढा अधिक कठोर व्यवहार करतील, तेवढी ती "देवाच्या जास्त जवळ" जातील. तुमच्यापेक्षा खूपच अधिक जीवनातील तिरस्करणीय प्रसंग मला पाहावे लागले आहेत, शिवाय मी त्यांना अत्यंत किळसवाण्या स्वरूपांमध्ये पाहिलेय, कारण आत्ता तुम्हाला भेटणारा क्षुद्रप्रवृत्ती माणूस क्रांतीने खूपच नरम आणलेला आहे व त्याच्या हक्काचा त्याला तेवढा विश्वास राहिलेला नाही. मी पाहिलेल्या क्षुद्रप्रवृत्तिवादाला स्वतःच्या सुस्थितीची ठाम खात्री होती; आरामशीर आणि संकटविहीन जीवन सदैव लाभणार असा त्याला विश्वास होता.

त्या दरम्यान परदेशी कादबऱ्यांचे अनुवाद वाचायला मी एव्हाना आरंभ केला होता. डिकन्स आणि बाल्झाक यांच्यासारख्या सुरेख लेखकांच्या पुस्तकांचा त्यात समावेश होता. आईन्सवर्थ, बूल्वेर-लीटन आणि ड्यूमाँ यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या मी वाचत होतो. मी जी माणसे पाहिली होती व जी मला माहीत होती, त्यांच्यापासून अगदी भिन्न असे लोक त्या कादंबऱ्यांमधून वर्णिलेले होते. ठाम निर्धाराचे आणि अदम्य स्वभावाचे ते लोक होते व त्यांच्यामधील वैरांचा जन्म महत्त्वाच्या मतभेदांपायी घडत होता. पण माझ्याभोवतालची सर्व माणसे क्षुद्र आणि हलकी होती. शेजाऱ्याच्या मुलाने कोंबडीची तंगडी मोडली अथवा खिडकीची काच फोडली, किंवा पाय पक्वान्न बिघडले, कोबीचे सार अति उकळले, अगर दूध नासले, अशा कारणांस्तव त्यांच्या लोभाच्या, शत्रुत्वाच्या आणि दुष्टाव्याच्या भावना उफाळून यायच्या; अशा क्षुल्लक कारणांपायी त्यांच्यात मारामाऱ्या व्हायच्या, वाद घडायचे. पौंडभर साखरेच्या अगर वारभर कापडाच्या किंमतीत दुकानदाराने एक कोपेक वाढविला म्हणून हे लोक तासन्तास दुःख करीत बसायचे. शेजाऱ्यावर कोणतीही क्षुल्लक आपत्ती कोसळल्यास त्यांना मनस्वी आनंद व्हायचा. ह्या आनंदाला ते सहानुभूतीच्या देखाव्यामागे लपवायचे. एका कोपेकचे नाणे क्षुद्रप्रवृत्तीच्या स्वर्गात चमकायचे आणि लोकांमध्ये क्षुल्लक व नीच वैर निर्माण करायचे. भांडी आणि तवे, कोंबड्या आणि कोबी, धिरडी आणि चर्चला जाणे, वाढदिवस आणि दफनविधी, खादाडपणा आणि सूकरवृत्ती – ज्या माणसांमध्ये मी वाढलो त्या माणसांच्या जीवनाचे सार ह्या गोष्टींमध्ये सामावले होते. त्या किळसवाण्या अस्तित्वामुळे क्षणात मी बधीर होऊन जायचा, तर क्षणात त्या गुंगीतून स्वतःला जागे करण्यासाठी खोडी काढण्याची अतीव इच्छा व्हायची. कदाचित अशा कंटाळवाणेपणापायी १९ वर्षांच्या एका पत्रलेखकाने अलीकडेच मला पुढील शब्दांमध्ये कळविले :

स्वयंपाकघर, कुचाळक्या आणि केकाटण्याभोवती केंद्रित झालेल्या, बधीर करणाऱ्या कंटाळवाणेपणाचा माझा देहातील धागा न् धागा द्वेष करतो.

ह्याच प्रकारच्या कंटाळवाणेपणामधून सर्व तऱ्हेच्या खोडचा करण्यास मी प्रवृत्त झालो. मी घरांच्या छपरांवर चढायचा आणि धुराडचांमध्ये कापडाचे बोळे कोंबायचा; उकळणाऱ्या कोबीच्या सारात मूठ मूठ मीठ टाकायचा; घडयाळांमध्ये धुळीच्या लोटांच्या फुंकरी मारायचा. थोडक्यात म्हणजे मी गुंडगिरी करायचा. ह्याचे कारण मी जिवंत व्यक्ती होतो ही जाणीव अनुभवण्याची मला तीव्र इच्छा व्हायची, पण ती वस्तुस्थिती स्वतःला पटवून द्यायला इतर मार्ग शोधण्यास मी असमर्थ होतो. दाट जंगलात कोसळलेल्या झाडांच्या बुंध्यांखाली झुडुपांच्या जंजाळात व गुडघ्यापर्यंत मी ज्याच्यात बुडालो होतो अशा कुजणाऱ्या पालापाचोळचात माझी वाट हरवली होती, अशी माझी भावना होती.

पुढील प्रसंग मला आठवतो : ज्या रस्त्यावर मी राहात होतो तेथून सशस्त्र पहाऱ्यात सैबेरियाला पाठविण्यात येणाऱ्या गुन्हेगारांच्या जथ्यांना तुरुंगातून बोटींच्या धक्क्यापर्यंत न्यायचे. मग वोल्गा आणि कामा नद्यांवर प्रवास करणाऱ्या बोटींमधून त्यांना पुढे घेऊन जात. त्या नीरस आणि मलिन जथ्यांबद्दल मला आश्चर्यकारक आकर्षण वाटायचे. त्यामागील कारण बहुधा मला मत्सर वाटत होता की, जरी त्यांच्यातील काहींना बेडचा घातलेल्या असत आणि सगळचांवर जरी सशस्त्र पहारा होता, तरी त्यांना एक विशिष्ट मुक्कामाचे उद्दिष्ट होते; पण मी मात्र एखाद्या एकाकी घुशीप्रमाणे तळघरात राहात होतो आणि विटांची फरशी असलेल्या माझ्या घाणेरडचा स्वयंपाकघरात मला राबावे लागत होते. एक दिवस बेडचा घातलेल्या गुन्हेगारांचा एक मोटा गट नदीकिनाऱ्याकडे नेण्यात येत होता. हातापायांमध्ये साखळदंड अडकविलेले दोन गुन्हेगार फूटपाथच्या अगदी कडने चालत होते. त्यातील एक मजबूत बांध्याचा, काळी दाढीवाला माणूस होता. त्याचे डोळे घोडचासारखे होते, त्याच्या कपाळावर जखमेचा काळा-निळा वण होता व कान फाटलेला होता. अगदी भयानक आकृती. मी फूटपाथवरून अगदी त्याच्या पुढून चालत होतो. अचानक त्याने मला मोठचांदा आणि आनंदी आवाजात हाक मारली : " अरे ए पोरा, चल ये, आमच्यात सामील हो ! "

विलक्षणरीत्या त्याच्याकडे आकर्षित होऊन मी त्या माणसापाशी धावलो. पण एका सशस्त्र पहारेकऱ्याने मला मूर्ख म्हणून शिव्या घातल्या आणि मागे लोटले. त्या पहारेकऱ्याने तसे केले नसते, तर जणू स्वप्नात असल्याप्रमाणे मी त्या भयानक माणसाच्या पाठोपाठ गेलो असतो. कारण एकच : तो सर्वसामान्यांपेक्षा वेगळा होता व मला माहीत असलेल्या माणसांसारखा मुळीच नव्हता. तो जरी भयानक आणि जेरबंद होता, तरी दुसऱ्या प्रकारच्या जीवनाकडे मी आकर्षित झालो होतो. तो माणूस आणि त्याचा आनंदी, प्रेमळ आवाज माझ्या स्मरणातून लवकर जाईना. त्याच्या संगतीनेच, त्या काळातील आणखी एक तशीच ठाम

आठवण आहे. एक जाडजूड पुस्तक कसेतरी माझ्या हाती लागले होते. त्या पुस्तकाचा आरंभ फाटून हरवला होता आणि मी ते पुस्तक वाचायला सुरुवात केली. मला काहीही बोध होत नव्हता. फक्त एक पानभराची गोष्ट समजली होती, जिच्यात एक राजा एका साध्या धनुर्धराला सरदार बनवू इच्छीत होता व त्यावर त्या धनुर्धारी माणसाने कवितेत उत्तर दिले होते :

"शेतकरी रिसाल्यातला स्वार म्हणूनच मला जगू दे मरू दे.
माझा बाप तसाच जगला, त्याच्या मुलानं तसंच जगलं पाहिजे.
कारण थोरा-मोठ्यांपेक्षा, हलक्या कुळातल्यांनीच,
मोठमोठ्या कामगिऱ्या पार पाडल्या आहेत."

ह्या काहीशा अवघड ओळी मी उतरवून काढल्या आणि पुढे अनेक वर्षे-पर्यंत त्यांचा मला उपयोग झाला. एखाद्या प्रवाशाला सोटयाचा जसा उपयोग होतो तसा. अथवा त्यावेळी "पृथ्वीवरील थोर" मानले जाणारे क्षुद्रप्रवृत्ती लोक ज्या भुलावण्या दाखवीत होते व हीन उपदेश करीत होते, त्यांविरुद्ध ह्या ओळींनी ढालीप्रमाणे माझे रक्षण केले. वारा जसा जहाजाच्या शिडांमध्ये प्रेरक शक्ती भरतो, तशी कल्पनेमध्ये प्रेरक शक्ती भरणाऱ्या ओळी अनेक तरुणांच्या जीवनात भेटतात, असे मला वाटते.

दहा वर्षांनंतर मला समजले की, शेक्सपीयरच्या आधीचा एक लेखक रॉबर्ट ग्रीन ह्याच्या १६ व्या शतकामधील 'The Comedy of the Merry Archer George Green and Robin Hood'मधील ह्या ओळी होत्या. हा शोध लागला तेव्हा मला खूप आनंद झाला. प्राचीन काळापासून लोकांचा खरा मित्र असलेल्या आणि त्यांच्या खडतर जीवनात मदत करणाऱ्या साहित्याबद्दल मला अधिकच ममत्व वाटू लागले.

होय, कॉम्रेडहो, जीवनातील गावढळपणाचा आणि क्रौर्याचा मला विपुल अनुभव मिळाला आहे. एकदा तर मी आत्महत्येच्या प्रयत्नापर्यंत मजल मारली. अनेक वर्षेपर्यंत ह्या गोष्टीची आठवण झाली म्हणजे जळत्या शरमेची आणि आत्म-तिरस्काराची भावना जाणवायची.

लोक दुष्ट असण्यापेक्षा अडाणी जास्त होते, त्यांच्यापासून अगर जीवना-पासून मला भय नव्हते, तर माझ्या सामाजिक आणि इतर प्रकारच्या अज्ञाना-पासून, जीवनाविरुद्धच्या माझ्या रक्षणहीनतेपासून व अगतिकतेपासून मला भय होते, ह्याची जेव्हा मला जाणीव झाली, तेव्हा त्या भीतीपासून मी मुक्त झालो. परिस्थिती नेमकी तशीच होती. मला वाटते की ह्या गोष्टीवर तुम्ही चांगला विचार करावा, कारण विशिष्ट लोकांचे बिव्हळणे व तक्रारी करणे केवळ त्यांच्या रक्षणहीनतेच्या जाणीवेमधून निर्माण होते; माणसाला विहीनतेपासून आणि अंत-

रंगातून दडपण्यासाठी "जुने जग" वापरीत असलेल्या प्रत्येक गोष्टीविरुद्ध सामना करण्याच्या स्वतःच्या सामर्थ्याबाबत त्यांना विश्वास वाटत नसल्यामुळे तसे घडते.

त्या काळात माझ्यासारखे "समाजाचे" सावत्रपुत्र एकाकी होते, पण तुमची संख्या एव्हाना शेकडयांमध्ये आहे; स्वतःच्या सामर्थ्याची जाण असलेल्या, हाती सत्ता असलेल्या, व्यक्तींच्या उपयुक्त श्रमाला पूर्ण श्रेय देण्यास त्वरित शिकणाऱ्या कामगारवर्गामधून तुम्ही आला आहात, ह्याची तुम्हाला जाणीव असली पाहिजे. आपल्या कामगारांच्या आणि शेतकऱ्यांच्या सरकारमध्ये तुम्हाला सत्ता आहे; तुमच्या क्षमतांचा पूर्णत्वाने विकास घडविण्यास तुम्ही त्या सत्तेचा वापर केला पाहिजे आणि त्यात ती तुम्हाला मदत करील. सरकार ही गोष्ट हळूहळू करीत आहे. पण भांडवलदारवर्गाने – त्याच्या आणि तुमच्या कट्टर शत्रूने – जर त्याच्या जीवनात आणि कामात अडथळे आणले नसते, तर ते खूपच अधिक यशस्वीपणे ही कामगिरी पार पाडू शकले असते.

तुम्ही स्वतःबाबत आणि स्वतःच्या सामर्थ्याबाबत विश्वासाची भावना बाणविली पाहिजे. अडथळे पार करून आणि निर्धाराला बळकट करून हा विश्वास साध्य करता येतो. भूतकाळाच्या हलक्या आणि दुष्ट वारसाला तुम्ही स्वतःमधून आणि तुमच्या भोवतालीमधून नष्ट करायला शिकले पाहिजे. अन्यथा तुम्ही "जुन्या जगाचा त्याग"[१] करायला समर्थ कसे व्हाल ? त्या गीताच्या शिकवणीनुसार वागण्याची तुमची ताकद आणि इच्छा असल्याविना तुम्ही ते गीत गाऊ शकणार नाही. स्वतःवरील अगदी छोटासा विजयसुद्धा माणसाला खूपच अधिक बलवान बनवितो. देहाला प्रशिक्षण दिल्यास माणूस किती अधिक निरोगी, चपळ व सहनशील बनतो, हे तुम्हाला चांगले ठाऊक आहे. मनाला आणि निर्धाराला तशाच प्रकारचे प्रशिक्षण मिळाले पाहिजे.

अशा प्रशिक्षणापासून साध्य होणाऱ्या लक्षणीय यशःसिद्धीचे एक उदाहरण पाहा : काही थोडया काळापूर्वी बर्लिनमध्ये एका बाईने प्रत्येक हातात दोन-दोन पेन्सिली धरून व आणखी एक पेन्सिल दातांमध्ये धरून, पाच भिन्न भाषांमधील पांच शब्द एकाच वेळी लिहून दाखविले. ही गोष्ट अविश्वसनीय भासण्याची शक्यता आहे, कारण केवळ शारीरिक अर्थानेच हे अवघड आहे असे नव्हे, तर पयासाठी विचाराची अनन्यसाधारण विभागणी असणे आवश्यक आहे. असे असले तरीही, ही सत्य घटना आहे. याउलट, ही वस्तुस्थिती असेही दाखविते की, अराजकी भांडवलदारी समाजात बुद्धिमान गुणांना कसे वाया घालविले जाते. तेथे लक्ष वेधून घेण्यासाठी माणसाला स्वतःच्या हातांच्या आधारावर रस्त्यांमधून

---

१. १८७५ साली लिहिण्यात आलेल्या कामगारांचे 'मार्सेल्येझा' नामक क्रांतिगीतामधील शब्द – अनु.

चालावे लागते, अगदी कमी अथवा अजिबात व्यावहारिक मूल्य नसलेले वेगांचे विक्रम स्थापन करावे लागतात, वीस प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध एकाच वेळी बुद्धिबळाचे सामने खेळावे लागतात, कसरतींचे आणि कवितारचनेचे अफाट स्टंट करावे लागतात; सर्वसाधारणपणे, अतितृप्त आणि कंटाळलेल्या माणसांच्या संवेदनांना गुदगुल्या करण्यासाठी सर्व प्रकारच्या जाहिरातबाजीचे भडक खेळ शोधून काढावे लागतात.

तुम्हा तरुणांना माहीत हवे की विज्ञानाच्या, कलेच्या आणि तंत्रशास्त्राच्या क्षेत्रात मानवजातीने साध्य केलेली खरीखुरी मौल्यवान व चिरंतन उपयुक्त आणि सुंदर अशी प्रत्येक गोष्ट अत्यंत अव्यक्त अशा कठीण परिस्थितींमध्ये, "समाजाच्या" गाढ अज्ञानाला तोंड देऊन, चर्चच्या जोरदार विरोधाला सहन करून, भांडवलदारांच्या अतितृष्णेला सोसून आणि कलेच्या व विज्ञानाच्या "आश्रय-दात्यांच्या" लहरी सांभाळून काम करणाऱ्या व्यक्तींनी निर्माण केली आहे. संस्कृतीच्या निर्मात्यांमध्ये अनेक सामान्य कामकरी माणसे होती हे लक्षात ठेवले पाहिजे, उदाहरणार्थ, थोर पदार्थवैज्ञानिक फॅरडे आणि संशोधक एडिसन; कापूस पिंजण्याचे यंत्र शोधणारा आर्कराईट न्हावी होता; कलात्मक कुंभारकामाचा एक सर्वोत्तम निर्माता बर्नार्ड पालीस्सी एक लोहार होता; जगाला ज्ञात असलेला सर्वांत थोर नाटककार शेक्सपीयर एक सामान्य नट होता. मोलीएरही तसाच. आपल्या अंगच्या गुणांचा लोकांनी कसा विकास घडविला ह्याची अशी शेकडो उदाहरणे देता येतील.

आता मानवजातीच्या ताब्यात असलेल्या वैज्ञानिक ज्ञानाच्या आणि तांत्रिक साहित्याच्या प्रचंड साठ्यांचे फायदे न भोगणाऱ्या व्यक्तींना हे शक्य होते हे ह्यावरून सिद्ध झाले. आपल्या देशात सांस्कृतिक कार्य करणे किती सोपे बनले आहे ह्याचा जरा विचार करा. निरर्थक श्रमांपासून लोकांना पूर्णतया मुक्त करण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत; त्वरेने अधःपतित होणाऱ्या धनिक वर्गाला पुढे आणणाऱ्या व कष्टकरी वर्गाला अधःपतनाचा धोका निर्माण करणाऱ्या शोषणापासून कामगारांच्या घडणाऱ्या दुष्ट शोषणापासून, मुक्त करण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत.

आता तुमच्यासमोर एक महान आणि पूर्णतया स्पष्ट कार्य उभे आहे – "जुन्या जगाचा त्याग करण्याचे" आणि नवे जग निर्माण करण्याचे. हे काम सुरू झाले आहे. आमच्या कामगारवर्गाने आदर्श घालून दिल्यानंतर, जुन्या जगाने कितीही अडथळे आणले तरी ती प्रक्रिया सर्वांगांनी विकसित होत आहे आणि विकसित होत जाणार आहे. जगभरचे कामकरी लोक कामासाठी आपल्या बाह्या वर सरसावीत आहेत. व्यक्तींच्या कामाभोवती सहानुभूतीचे वातावरण निर्माण

होत आहे. इतःपर त्यांना सामुदायिकामधील एकाकी तुकडे असल्यासारखे वाटत नाही, तर सृजनाच्या इच्छेला घोषित करणाऱ्या सामुदायिकाच्या त्या अग्रदूत बनल्या आहेत.

एवढ्या धिटाईने प्रथमच असे उद्दिष्ट एखाद्याने स्वतःसमोर ठेवल्यानंतर "काय केले पाहिजे ?" अशा प्रश्नांना मुळी जागाच उरत नाही. "जगणं अवघड आहे ?" पण खरेच हे एवढे अवघड आहे का ? तुमच्या मागण्या वाढल्या आहेत आणि तुमच्या पूर्वजांनी ज्यांचा कधी विचारही मनी आणला नाही व ज्यांना कधी पाहिले नाही, अशा गोष्टी तुम्हाला आवश्यक वाटतात, म्हणून तर हे अवघड झाले ना ? तुमच्या मागण्या कदाचित अति वाढल्यात का ?

अर्थात मला जाणीव आहे की, तुमच्यातील अनेकांना सामुदायिक कामाचा आनंद आणि त्यातील काव्य यांची समज आहे. आणि दशलक्षावधी कोपेक गोळा करण्याऐवजी, जगातील सर्वात मोठा चमत्कार असलेल्या आणि जगातील सर्व चमत्कारांना निर्माण करणाऱ्या मानवावरील कोपेकची दुष्ट सत्ता नष्ट करण्याची तुमची आकांक्षा आहे.

मी लिहायला कसा शिकलो ह्या प्रश्नाचे मी आता उत्तर देतो.

थेट जीवनामधून आणि पुस्तकांमधून, अशा दोन्ही ठिकाणांहून मी ठसे गोळा केले. जीवनातील ठशांची कच्च्या मालाबरोबर तुलना करता येईल, तर पुस्तकातील ठशांची निम-तयार मालाशी तुलना करता येईल. अथवा अधिक ओबडधोबड स्वरूपात, पण साध्या शब्दात सांगायचे तर पहिल्या बाबतीत मला जनावराशी वागावे लागले आणि दुसऱ्या बाबतीत कातडी उत्तम सोलून काढलेल्या जनावराचा मला परामर्श घ्यावा लागला. परकी साहित्याचा, विशेषतः फ्रान्समधील साहित्याचा, मी फार फार ऋणी आहे.

माझे आजोबा क्रूर आणि कंजूष होते, पण बाल्झाकचे 'Eugenie Grandet' ('यूजीन ग्रान्दे') वाचेपर्यंत मला ते नीटसे समजले नव्हते. यूजीनचे वडील, म्हातारे ग्रान्दे, हेसुद्धा क्रूर आणि कंजूष होते. पण माझ्या आजोबांपेक्षा ते अधिक मूर्ख आणि कमी स्वारस्यपूर्ण होते. त्या फ्रेंच माणसाच्या तुलनेने, मला न आवडणारा रशियन म्हातारा अधिक चांगला ठरला होता. त्यामुळे माझा माझ्या आजोबांविषयीचा दृष्टिकोन बदलला नाही, पण मला एक मोठा शोध लागला : माणसामध्ये मला जे आढळले नव्हते अथवा माहीत नव्हते असे काहीतरी पुस्तकांनी मला उघड करून दाखविले होते.

जॉर्ज इलियटची नीरस 'Middle March'ने आणि ऑएरबाख व स्पीलहागेन यांच्या पुस्तकांनी मला दाखविले की, इंग्लिश आणि जर्मन प्रांतिक

गावांमधील माणसे ज्या पद्धतीने राहात होती ती नीझनी-नवगोरद[1]मधील ज्वेज्दीन्स्काया रस्त्यावरील जीवनाची पद्धत नव्हती, पण त्याहून फारशी चांगलीही नव्हती. त्यांचे बोलण्याचे बहुतेक विषय सारखेच होते — त्यांचे इंग्लिश आणि जर्मन कोपेक, देवाला घाबरण्याची आणि देवावर प्रेम करण्याची गरज. पण अगदी आमच्या रस्त्यावरील माणसांप्रमाणेच, ती माणसेही एकमेकांचा द्वेष करीत होती. विशेषत: त्यांच्या भोवतालच्या बहुसंख्यांपेक्षा या ना त्या पद्धतीने वेगळ्या साच्यामध्ये घडलेल्या माणसांचा. परकी माणसे आणि रशियन ह्यांच्यातील साम्ये शोधण्याचा मी प्रयत्न करीत नव्हतो. वस्तुत: मी भेद शोधायला निघालो होतो, पण तरीही मला साधर्म्य आढळले.

माझ्या आजोबांचे जिवलग मित्र दिवाळे वाजलेले दोन व्यापारी थॅकरे यांच्या ' Vanity Fair 'मधील माणसांप्रमाणेच बोलत आणि त्यांचे बोलण्याचे विषयही सारखे होते. जुन्या करारातील स्तोत्रांच्या पुस्तकावरून मी लिहा-वाचायला शिकलो. मला ते पुस्तक आवडायचे, कारण त्यातील भाषा सुंदर आणि नादमय होती. म्हातारे पुरुष जेव्हा एकमेकांपाशी स्वत:च्या मुलांविषयीच्या तक्रारी सांगायचे, तेव्हा राजा डेव्हिडने स्वत:च्या मुलाविषयी कर्तव्यचुकार अब्सालोम-विषयी, देवापाशी केलेल्या तक्रारी मला आठवायच्या. एकूण माणसे आणि विशेषत: तरुण माणसे अधिकाधिक वाईट जगत होती, अधिक मूर्ख व आळशी बनली होती आणि देवाची धास्ती बाळगेनाशी झाली होती, असे जेव्हा हे म्हातारे लोक दावा करीत, तेव्हा ते खरे बोलत नव्हते असे मला भासायचे. डिकन्सचे ढोंगी नेमक्या ह्याच गोष्टींविषयी बोलले होते.

सांप्रदायिक पोथीनिष्ठ आणि पुराणमतवादी पाद्री ह्यांच्यामधील युक्तिवादांना काही काळ लक्षपूर्वक ऐकल्यानंतर मला आढळले की, इतर देशांमधील चर्चच्या लोकांप्रमाणेच दोघेही शब्दांना धरून बसायचे. चर्चमधील सर्व माणसांना शब्द हे इतरांना मुठीत ठेवण्याचे साधन वाटत होते आणि ह्या चर्चवाल्यांशी साधर्म्य असलेले काही लेखक होते. या साधर्म्यात लवकरच मला संशयास्पद जाणवू लागले.

अर्थात माझ्या वाचनात पद्धतशीरपणा अथवा सातत्य नव्हते. सर्व काही योगायोगाचा मामला होता. माझ्या मालकाच्या भावाला क्सवियें दे मॉन्तेपिन, गाबोरीओ, ह्यांच्या " पिवळ्या मुखपृष्ठां "च्या कादंबऱ्या वाचण्याचा नाद होता. ही पुस्तके वाचल्यानंतर " निरीश्वरवादी क्रांतिकारकांचा " उपहास करणारी व त्यांच्या विरोधी चित्रणांची रशियन पुस्तके हाती पडली. ज्या माणसांमध्ये मी राहात होतो त्यांच्याशी मुळीच साधर्म्य नसलेल्या, पण मला हाक

....

१. सध्याचे गोर्की शहर.

मारून बरोबर चलण्याचा आग्रह धरणाऱ्या गुन्हेगाराशी साम्य असलेल्या, अशा लोकांविषयी वाचायला मला स्वारस्य वाटत होते. अर्थात, लेखकांच्या इराद्यांचा एक भाग असलेला " क्रांतिकारकपणा " त्या माणसांमध्ये कुठे दडला होता ते मात्र मला समजायचे नाही, कारण सर्व " क्रांतिकारकांना " ते सारखेच दोष चिकटवीत.

' मोलोतोव ' आणि ' क्षुद्रप्रवृत्ती सुख ' ह्या पोम्यालिवस्कींच्या कथा माझ्या हाती लागल्या. क्षुद्रप्रवृत्ती अस्तित्वातील " अत्यंत नीरस जीवन " व क्षुद्रप्रवृत्ती सुखाचा क्षुल्लकपणा त्यांनी मला दाखविला. मला अंधुकपणे जाणवले की, उदास " निरीश्वरवादी " काही अंशी संपन्न मोलोतोवपेक्षा अधिक चांगले होते. पोम्यालोवस्कीनंतर झारूबिन यांचे ' रशियन जीवनाच्या अंधाऱ्या आणि प्रकाशित बाजू ' नामक अत्यंत रटाळ पुस्तक वाचले. त्या पुस्तकात कोणतीही प्रकाशित बाजू मला आढळली नाही, पण अंधाऱ्या बाजू मात्र जास्त स्पष्ट दिसल्या व अधिक किळसवाण्या भासल्या.

भिकार पुस्तके मी अगणित वाचली, पण तीसुद्धा मला उपयुक्त ठरली. जीवनाच्या उजळत्या पैलूंबरोबरच अंधाऱ्या बाजू ठाऊक असणेही चांगले असते. माणसाने जास्तीत जास्त ज्ञान संपादन केले पाहिजे. त्याचा अनुभव जेवढा अधिक विविध, तेवढी अधिक उंची लाभते आणि दृष्टीचे क्षेत्र अधिक विशाल बनते.

परकीय साहित्याने तुलनेसाठी मला विपुल सामग्री पुरविली आणि त्यातील कसबाने मी चकित झालो. ह्या पुस्तकांमधील माणसे एवढी जिवंत आणि ठळक रंगविली होती की, मला ती अक्षरशः खरीखुरी वाटायची. रशियनांपेक्षा ही माणसे मला नेहमी जास्त क्रियाशील आढळत. ती कमी बोलत आणि कृती जास्त करीत.

स्तेन्दाल, बाल्झाक आणि फ्लॉबेर ह्या " मोठ्या " फ्रेंच लेखकांनी माझ्यावर खरा व प्रगाढ रचनात्मक प्रभाव पाडला. सर्व " नवागतांनी " ह्या लेखकांना वाचावे असा मी सल्ला देईन. ते खरोखर बुद्धिमान कलाकार आहेत व लेखनप्रकाराचे श्रेष्ठ प्रभू आहेत. रशियन साहित्यात त्यांच्यासम अद्यापि कुणीही नाही. मी त्यांचे रशियन अनुवाद वाचले, पण फ्रेंच लेखनाची शक्ती अनुभवण्यास त्यामुळे मला प्रतिबंध घडला नाही. असंख्य " बुलेवार्द " कादंबऱ्यांनंतर, मायन रीड, जेम्स फोनीमोर कूपर, गुस्ताव एमार आणि पोन्सन दू तेरेल यांच्यानंतर ह्या थोर लेखकांच्या कथांनी माझ्यावर अद्भुत परिणाम केला.

त्रोईत्सी सणाच्या एका रविवारी फ्लोबेरचे ' Un Colur Simple ' मी वाचत असल्याचे आठवते. सणाची मौज लुटणाऱ्यांपासून स्वतःला चुकविण्यासाठी एका पडवीच्या छपरावर मी बैठक मारली होती. निवेदनशैलीने मी चकित झालो

होतो. जणू दृष्टी आणि श्रवणशक्ती हिरावून घेतल्यासारखे वाटत होते. कोणतीही श्रेष्ठ कामगिरी न बजावलेल्या, अथवा कोणत्याही प्रकारचा गुन्हा न केलेल्या एका सामान्य स्त्रीच्या, एका स्वयंपाकिणीच्या व्यक्तिमत्त्वाने माझ्या सभोवतालच्या सणाच्या धामधूमीचे सारे आवाज जणू बंद करून टाकले होते. मला अत्यंत परिचित असे साधे शब्द त्या स्वयंपाकिणीच्या "सामान्य" आयुष्याच्या गोष्टीत वापरलेले होते, पण त्याच शब्दांनी मी एवढा डहुळून का निघालो होतो ते मात्र मला समजत नव्हते. ते पुस्तक जणू माझ्यावर कसलीतरी जादू करीत होते असे मला भासत होते. मी कबूल करीन की, एखाद्या जंगली माणसाप्रमाणे त्या पुस्तकाची पाने अनेक वेळा मी उजेडापाशी धरून बसलो होतो. मी काय करीत होतो ह्याचे मला भान नव्हते, पण त्या पुस्तकाच्या पानांवरील ओळींमधून गूढता उकलण्याची किल्ली शोधण्याचा माझा प्रयत्न चालला होता.

गूढ आणि रक्तपाती गुन्ह्यांचे वर्णन करणारी डझनावारी पुस्तके मला परिचित होती, पण जेव्हा मी स्तेन्दालचे ' Chroniques italiennes ' ('इटलीचा वृत्तांत') वाचले, तेव्हा ते सारे कसे करण्यात आले हे मला समजेना. ह्या लेखकाने क्रूर कृत्यांची आणि सूडवादी खुन्यांची वर्णने केली होती, पण मला त्याच्या कथा वाचताना "संतांची चरित्रे" वाचल्यासारखे वाटत होते; नरकात "छळ सोसणाऱ्यांचे सांत्वन करायला" तेथे गेलेल्या देवाच्या मातेची कथा सांगणारी आमच्या ' देवीचे स्वप्न ' ऐकत होतो असे भासले होते.

बाल्झाकच्या ' La pean de Chargin ' (' खडबडीत कातडे ') मधील एक बँकर मेजवानी देत असल्याच्या प्रसंगाची पाने वाचत होतो तेव्हा मी अक्षरशः चकित झालो. सुमारे दोन डझन पाहुणे एकाच वेळी बडबड करून गोंगाट माजवतात, हे वर्णन वाचताना माझ्या कानांचे पडदे फाटत असल्याचा मला भास होत होता. त्याहून जास्त महत्त्वाचे म्हणजे मी प्रत्येक पाहुण्याचे बोलणे केवळ ऐकले एवढेच नव्हे, तर प्रत्यक्षात मला तो दिसलासुद्धा. बाल्झाकने त्या बँकरच्या पाहुण्यांच्या नाक-डोळ्यांचे वर्णन केलेले नाही, अथवा ते कसे दिसत होते तेही सांगितलेले नाही; पण मला मात्र त्या लोकांचे डोळे, स्मितहास्ये आणि हातवारे दिसत होते.

शब्दांच्या माध्यमाद्वारे लोकांचे वर्णन करण्याच्या कलेमधील बाल्झाक आणि इतर फ्रेंच लोकांची हातोटी मला नेहमी चकित करायची. लोकांचे बोलणे सजीव आणि श्राव्य करण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. संवाद लिहिण्यातील त्यांचे कसब अजब होते. बाल्झाकची पुस्तके म्हणजे तैलरंगातील चित्रे भासायची. प्रथम जेव्हा मी रूबेन्सची चित्रे पाहिली तेव्हा माझ्या मनात तत्काळ बाल्झाकचा विचार आला. जेव्हा मी दस्तोयेवस्कीची वेडी पुस्तके वाचली तेव्हा अपरिहार्यपणे माझ्या मनात विचार आला की, कादंबरीलेखनातील ह्या थोर लेखकाचा तो

फार फार ऋणी होता. गोन्कूरसच्या भेदक शब्दांच्या कादंबऱ्याही मला आवडायच्या. झरणीने काढलेल्या चित्रांसारख्या त्या छेदक भासत. उदास रंगांमधील भव्य चित्रांप्रमाणे झोलाची खिन्न पुस्तके भासायची. ह्यूगोच्या कादंबऱ्यांचा मात्र माझ्यावर परिणाम घडला नाही आणि 'Quatre-Vingt-treize' ('९३ वे वर्ष') सुद्धा मी निर्विकारपणे वाचले. पुढे अनातोल फ्रान्सचे 'Les dieux ont Soit' ('देवांच्या इच्छा') जेव्हा मी वाचले, तेव्हा कुठे त्या निर्विकारपणाचा अर्थ मला समजला. अनेक गोष्टींचा तिटकारा करायला शिकल्यानंतरच केवळ मी स्तेन्दाल वाचला. त्याच्या निवांत बोलण्यामुळे व छद्मी-स्मितामुळे माझ्या तिटकाऱ्याला बळकटी मिळाली.

उपरोक्त गोष्टींवरून स्पष्ट होते की, लिहायचे कसे ते मी फ्रेंच लेखकांपासून शिकलो. हा योगायोग होता, पण त्याच्या निष्पत्ती हितप्रद ठरल्या. म्हणून तरुण लेखकांना मी सल्ला देईन की, थोर लेखकांची पुस्तके मूळ भाषेत वाचता यावीत आणि त्यांच्यापासून शब्दांची कला शिकता यावी, ह्यासाठी त्यांनी फ्रेंच भाषेचा अभ्यास करावा.

गोगोल, तल्स्तोय, तुर्गनेव, गोन्चारोव, दस्तोयेवस्की आणि लेस्कोव ह्या रशियन साहित्यश्रेष्ठांची पुस्तके मी खूप नंतर वाचली लेस्कोव ह्यांच्या लेखनाचा माझ्यावर निःसंशय प्रभाव होता. त्यांचे आश्चर्यकारक ज्ञान आणि त्यांची भाषासंपदा यांचे मला कौतुक होते. रशियन जीवनाची अगदी जवळून सूक्ष्म ओळख असलेले असे ते एक उत्तम लेखक आहेत. पण आमच्या साहित्यात त्यांना त्यांच्या योग्यतेएवढी मान्यता लाभलेली नाही. चेखोव यांनी लेस्कोव यांचे ऋण मान्य केले होते.

ह्या परस्पर दुव्यांचा आणि प्रभावांचा उल्लेख मी एवढ्याचसाठी केला की, परकी आणि रशियन साहित्याच्या विकासाचे ज्ञान असणे लेखकाला अगदी " अत्यावश्यक " आहे हे परत सांगण्यासाठी.

वयाच्या विशीत मला जाणीव झाली की, लोक सांगू शकतील त्यापेक्षा खूपच अधिक असे मी पाहिले होते, ऐकले होते, अनुभवले होते आणि ते लोकांना सांगणे आवश्यक होते इतर माणसांपेक्षा विशिष्ट गोष्टी मला वेगळ्या रीतीने माहीत होत्या व जाणवत होत्या असे मला भासायचे. ह्या दोन्हींमुळे मी अस्वस्थ बनलो आणि माझा स्वभाव गडबड्या व बडबड्या बनला. तुर्गनेवसारख्या श्रेष्ठ साहित्यकाराची पुस्तके वाचत असतानाही काही वेळा मला असे जाणवायचे की, मुख्य व्यक्तिरेखांविषयी, उदाहरणार्थ, 'शिकाऱ्याची रेखाटने', तुर्गनेवनी सांगितले होते त्यापेक्षा मी काहीतरी वेगळे सांगू शकलो असतो. तो काळपावेतो निवेदक म्हणून मी चांगलीच कीर्ती संपादन केली होती. धक्क्यावरचे हमाल, बेकरीवाले, उडाणटप्पू,

सुतार, रेलकामगार, यात्रेकरू आणि ज्या माणसांमध्ये मी राहात होतो ती बहुतेक सर्व माणसे, माझे श्रोते होते. मी वाचलेल्या पुस्तकांमधील आशय जेव्हा मी परत कथन करायचा, तेव्हा कथानकात मी बदल करायचा, जे काही मी वाचलेले असायचे त्यात फरक करून सांगायचा, माझ्या स्वतःच्या जीवनानुभवातून निर्माण झालेल्या गोष्टींची भर घालायचा. असे माझ्या वारंवार ध्यानात यायचे. जीवनातील प्रत्यक्ष गोष्टी आणि साहित्य ह्यांचा माझ्या मनात संयोग घडल्यामुळे तसे घडत होते. पुस्तक माणसाप्रमाणेच जीवनातील एक वस्तुस्थिती आहे.ते एक सजीव आणि बोलके सत्य आहे. माणसाने निर्माण केलेल्या अथवा तो निर्माण करीत असलेल्या इतर सर्व वस्तूंपेक्षा, " वस्तू " म्हणून ते खूपच कमी आहे.

माझे कथन ऐकणाऱ्या बुद्धिजीवी लोकांनी मला सल्ला दिला : " तू लिहिलं पाहिजे. प्रयत्न करून पाहा."

अनेकदा मी उन्मन व्हायचा. बोलण्याची अतीव इच्छा व्हायची, शब्दांचे कढ आतून फुटायचे. मला दडपून टाकणाऱ्या अथवा आनंदित करणाऱ्या सर्व गोष्टी व्यक्त करण्याची तीव्र इच्छा व्हायची." माझ्या उरावरचा भार हलका करायला " मी उत्सुक होतो. माझ्या अंतरंगातील ताणामुळे छळाचे क्षण यायचे. अशा क्षणी माझ्या घशात आवंढा यायचा आणि जोरात ओरडून सांगावेसे वाटायचे की, काच फुंकणारा माझा मित्र अनातोली फार गुणी मुलगा होता, पण त्याला मदत मिळाली नाही तर त्याचा नाश होईल; रस्त्यावर वेश्याव्यवसाय करणारी थेरेसा वस्तुतः फार चांगली बाई होती आणि ती वेश्या होती हा तिच्यावर अन्याय होता, तिच्याकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना हे समजत नव्हते. त्याचप्रमाणे, तरुण व उत्तम वाचन असलेल्या याकोवलेवा सुईणीपेक्षा भीक मागून जगणारी मतीत्सा म्हातारी जास्त बुद्धिमान होती, हे विद्यार्थ्यांना समजत नव्हते.

गूरी प्लेतन्योव हा विद्यार्थी माझा जिवलग मित्र होता. पण थेरेसा आणि अनातोलीबद्दलच्या मी केलेल्या कविता त्याच्यापासूनही मी लपवून ठेवल्या होत्या. अर्थात तशा कविता करण्यामागे तळघरात काम करणाऱ्या बेकरीवाल्यांवर घाण पाण्याचे लोंढे ओतण्याचा माझा मुळीच उद्देश नव्हता. वसंतामध्ये वितळणारा बर्फ, सुंदर नदी वोल्गा, आत्म्याला छिन्नभिन्न करणारे घाणीच्या कर्दमासमान जीवन, असे माझ्या कवितांचे विषय होते.

मी अगदी सहजपणे कविता करीत असे, पण जे काही मी लिहीत होतो ते तिरस्करणीय होते असे मला आढळले. स्वतःच्या अंगी कसबाचा आणि गुणांचा अभाव होता ह्याचा मला राग होता. पूष्कीन, लेर्मोन्तोव, नेक्रासोव यांच्या कविता मी वाचल्या होत्या. कूरोचकीन यांनी केलेले बेरांजेचे अनुवाद मी वाचले होते व मला स्पष्ट जाणीव होती की, ह्यांपैकी एकाही कवीशी माझे यत्किंचितही साधर्म्य नव्हते.

गद्य लिहिण्याचे धाडस मला होत नव्हते. कवितेपेक्षा ते अधिक अवघड भासत होते. गद्यलेखनासाठी विशिष्ट चौकस दृष्टी आवश्यक होती; इतरांना न आढळणाऱ्या गोष्टी पाहण्याची सूक्ष्मदर्शी, वेचक शक्ती आवश्यक होती; मुद्देसूद आणि नेटक्या शैलीची गरज होती. असे असूनही गद्यलेखनाचा प्रयत्न मी सुरू केला. मात्र सामान्य गद्यलेखन माझ्या कुवतीच्या पलीकडे असल्याचे आढळल्यामुळे "तालबद्ध" गद्याची मी निवड केली. साध्या शैलीत लिहिण्याचे माझे प्रयत्न सपशेल फसले. 'म्हाताऱ्या ओकचे गीत' नामक एक प्रचंड "कविता" तालबद्ध गद्यात मी लिहिली होती. वि. ग. कोरोलेन्को यांनी अवघ्या डझनभर शब्दांमध्ये माझ्या त्या वेड्याबागड्या लेखनाच्या चिंध्या उडविल्या. माझ्या आठवणीनुसार जर माझी चूक होत नसेल, तर 'ज्नानीये' (ज्ञान – अनु.) नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या उत्क्रांतीच्या सिद्धांतावरील 'जीवन चक्र' लेखाच्या वाचनानंतर माझ्या मनात निर्माण झालेले विचार मी व्यक्त केले होते. "ह्या जगात मतभेद व्यक्त करण्यासाठीच मी आलो आहे" एवढे त्यातील एकच वाक्य माझ्या स्मरणात अद्यापपर्यंत राहिले आहे. उत्क्रांतीच्या सिद्धांताशी मी खरेच सहमत नव्हतो हे मला सांगितले पाहिजे.

"तालबद्ध" गद्य लिहिण्याच्या माझ्या छंदापासून मला परावृत्त करण्यात कोरोलेन्कोंना यश आले नाही. पाच वर्षांनंतर माझ्या 'आर्खिप आजोबा' ह्या कथेचे कौतुक त्यांनी केले, पण "कवितेशी साधर्म्य राखणाऱ्या कशानेतरी" गोष्ट सजविल्याबद्दल त्यांनी नापसंती व्यक्त केली. प्रथम मी त्यांच्यावर विश्वास ठेवला नाही, पण घरी जेव्हा मी गोष्टीवर नजर टाकली तेव्हा स्तेपमधील धुवांधार पावसाचे आख्खे पानभर वर्णन त्या नतद्रष्ट "तालबद्ध" गद्यामध्ये लिहिले गेल्याचे मला आढळले व अतीव खेद झाला. ह्या वाईट खोडीने माझा प्रदीर्घ काळपर्यंत पाठलाग केला आणि माझ्या कथांमध्ये अनाठायी व माझी इच्छा नसतानाही ते झिरपत राहिले... "दिमाखदार" शैलीत लिहिण्याचा माझा एकूण प्रयत्न चालायचा. ह्याचे एक उदाहरण देतो : "दारुडा माणूस दिव्याच्या खांबाला मिठी घालून उभा होता, स्वतःची थरथरती सावली न्याहाळताना त्याच्या मुद्रेवर स्मित झळकत होते." जाता जाता सांगायचे म्हणजे मीच लिहिल्यानुसार, त्या रात्री वारा नव्हता आणि चांदणे होते; त्या काळी अशा चांदण्या रात्री रस्त्यावरचे दिवे पेटवीत नसत, शिवाय जरी दिवे पेटलेले असते, तरी जर वारा नसला तर माणसाची सावली स्थिर राहते. माझ्या प्रत्येक गोष्टीत अशा विसंगती आणि चुका आढळत. ह्याबद्दल मी ठामपणे स्वतःला दोष देईन.

"सागर स्मित करीत होता," मी लिहिले होते आणि तसे म्हणणे चांगले

होते असे मी बराच काळपर्यंत समजत होतो. सौंदर्याच्या शोधात मी सतत वर्णनाच्या अचूकतेमध्ये तफावती करीत होतो आणि वस्तूंना चुकीच्या जागी ठेवण्याची व लोकांचे चुकीचे वर्णन करण्याची गफलत करीत होतो.

"तुमची भट्टी हवी तशी उभी राहात नाही," असा ल्येव तल्स्तोयनी एकदा माझ्या 'सव्वीस पुरुष आणि एक मुलगी' गोष्टीवर शेरा मारला होता. त्याचा अर्थ असा होता की, मी ज्या पद्धतीने वर्णन केले होते त्यानुसार बेकरीवाल्यांचे चेहरे भट्टीच्या आगीमुळे उजळून निघणे शक्य नव्हते. माझ्या 'फोमा गोर्देयेव'-मधील मेदीन्स्कायाबद्दल बोलताना चेखोव म्हणाले होते की, "तिला बहुधा तीन कान आहेत – एक तिच्या हनुवटीवरसुद्धा – पाहा," आणि खरेच त्यांच्या बोलण्यात पूर्ण सत्य होते, कारण प्रकाशाच्या दिशेने उभे राहण्याची तिची पद्धत संपूर्ण चुकीची होती.

अशा चुका जरी क्षुल्लक भासल्या, तरी त्या फार महत्त्वाच्या असतात, कारण त्या कलेच्या सत्याचे उल्लंघन करतात. सर्वसाधारणपणे अचूक शब्द निवडणे आणि अत्यंत थोडक्या शब्दांमध्ये खूपसे व्यक्त होईल अशा रीतीने त्यांची मांडणी करणे अत्यंत अवघड आहे. "शब्दांची काटकसर तर करायचीच, पण तरीही विचाराचा अमर्याद पल्ला मारायचा";[१] शब्दांमार्फत सजीव चित्रे निर्माण करायची; व्यक्तिरेखेच्या स्वभावातील मुख्य वैशिष्टचे नेमक्या शब्दात व्यक्त करायची, वाचकाच्या मनावर त्या व्यक्तिरेखेचे वागणे आणि बोलणे ताबडतोब ठसवायचे, हे अत्यंत अवघड आहे. शब्दांच्या माध्यमामार्फत लोकांना आणि वस्तूंना "रंग देणे" वेगळे, व 'युद्ध आणि शांतता'मधील व्यक्तिरेखांप्रमाणे त्या प्रत्यक्ष दृग्गोचर व्हाव्यात म्हणून "त्रिमितीमध्ये" त्यांचे ठळकपणे वर्णन करणे वेगळे...

मध्य रशियामधील एका छोटया प्रांतिक गावाचे अंगठ्याच्या नखाएवढे रेखाचित्र वर्णन करण्यासाठी एकदा मी जवळजवळ तीन तास बैठक मारल्यानंतर पुढील मजकूर झाला :

"चढउतारांच्या दरीला उदास रस्त्यांचे असे काही छेद गेले होते की, रंगीबेरंगी अकूरोव गाव एखाद्या रुंद आणि सुरकुतल्या तळहातावरील चकचकीत खेळण्यासारखे भासत होते."

मी एक चांगला मजकूर लिहिला अशी तेव्हा माझी समजूत झाली, पण गोष्ट झाल्यानंतर मला जाणवले की, नक्षीदार सुंठीच्या बिस्किटाप्रमाणे अथवा चॉकलेटच्या खोक्यावरील चित्राप्रमाणे ते सर्व दिसत होते.

१. आ. चेखोव

सर्वसाधारणपणे शब्दांचा वापर अत्यंत काटेकोर अचूकतेतेने केला पाहिजे· दुसऱ्या एका क्षेत्रातील एक उदाहरण देतो. "धर्म म्हणजे अफू" असे म्हणतात. पण अफूचा वापर डॉक्टरमंडळी वेदनाशामक म्हणून करतात, म्हणजे अफू ही चांगली वस्तू आहे. पण अफूचे तंबाखूप्रमाणे धूम्रपान करतात, अफूच्या धूम्रपानाने माणसे मरतात, मद्यापेक्षा अफू हे फार अधिक अपायकारक विष आहे, ही वस्तुस्थिती बहुसंख्य लोकांना ठाऊक नाही.

माझ्या अपयशांपायी नेहमी माझी कवीच्या दुःखद शब्दांसारखी मनःस्थिती होते : "शब्दांच्या छळापेक्षा अधिक पराकाष्ठेचा छळवाद जगात दुसरा कोणताही नाही."

मला वाटते, कवी नादसन यांनी म्हटले होते : "आमची भाषा थंड आणि करुणास्पद आहे," आणि भाषेच्या "दारिद्र्या"बद्दल तक्रार न करणारा कवी विरळाच.

मला असे भासते की, ह्या तक्रारी रशियन भाषेच्या "दारिद्र्या"विरुद्ध नाहीत, तर एकूण मानवी भाषेविरुद्ध आहेत. शब्द ज्यांना शोधू शकत नाहीत अथवा व्यक्त करू शकत नाहीत अशा भावना व असे विचार अस्तित्वात असल्यामुळे असे घडते. पण "शब्द ज्यांना शोधू शकत नाहीत" अशा गोष्टी असल्या तरीही, रशियन भाषा म्हणजे एक अक्षय संपदा आहे आणि चकित करणाऱ्या वेगाने ती अधिक संपन्न बनत आहे. आपल्या भाषेच्या वाढीच्या वेगवानतेला सिद्ध करण्यासाठी गोगोल आणि चेखोव, तुर्गेनेव आणि बूनिन, दस्तोयेवस्की आणि लेओनिद लेओनोव यांनी वापरलेल्या शब्दभांडाराची तुलना करणे योग्य ठरेल. लेओनोव यांनी स्वतःच वृत्तपत्रांमध्ये निवेदन केले आहे की, दस्तोयेवस्कींमधून ते निर्माण झाले आहेत, पण काही विशिष्ट बाबतीत ते म्हणू शकले असते–आणि मी मनाच्या मूल्यमापनाला आवाहन करतो–की ल्येव तल्स्तोयपासूनही ते निर्माण झालेले आहेत. अर्थात हे दोन्ही दुवे ह्या तरुण लेखकाचे महत्त्वच केवळ सिद्ध करतात आणि त्याच्या अस्सलपणाला मुळीच बाधा आणत नाहीत. 'चोर' ह्या कादंबरीत लेओनोव यांनी निःसंशयरीत्या भाषासंपदेचे आश्चर्यकारक दर्शन घडविले आहे. त्यांनी स्वतःचे अनेक अत्यंत उचित शब्द निर्माण केले आहेत, शिवाय गुंतागुंत व कल्पनारम्यता ह्या दृष्टींनी त्यांची कादंबरी लक्षवेधी आहे. मला असे दिसते की, लेओनोव हा स्वतःचा संदेश देणारा एक माणूस आहे आणि तो संदेश अत्यंत अभिजात आहे. हा संदेश द्यायला त्यांनी नुकताच आरंभ केला आहे आणि ह्या कामी ना दस्तोयेवस्की ना इतर कुणी त्यांना अडथळा आणू शकेल.

लोक भाषा निर्माण करतात ह्याची तुम्हाला आठवण करून देणे उचित ठरेल. साहित्यिक भाषा आणि लोकांची भाषा ह्यांच्याविषयी बोलणे म्हणजे केवळ

एक "कच्चा माल" आहे, तर दुसरीवर श्रेष्ठींनी मेहनत केलेली आहे असे म्हणण्यासारखे आहे. ह्याची सर्वप्रथम पूर्ण जाणीव पूष्कीनना झाली आणि लोकांनी पुरविलेले भाषा-साहित्य कसे वापरावे व त्यावर कशी मेहनत करावी हेसुद्धा त्यांनीच दाखवून दिले.

कलाकारावर त्याच्या देशात आणि त्याच्या वर्गात घडणाऱ्या सर्व गोष्टींचे पडसाद उमटत असतात. कलाकार म्हणजे त्याच्या देशाचा आणि वर्गाचा कान, डोळा आणि हृदय. स्वतःच्या काळाचा तो आवाज असतो. शक्य तेवढे जास्तीत जास्त ज्ञान करून घेणे हे त्याचे कर्तव्य आहे. भूतकाळ त्याला जेवढा जास्त चांगला ज्ञात, तेवढे वर्तमानकाळाचे अधिक चांगले आकलन त्याला घडते; आणि आपल्या काळाच्या सार्वत्रिक क्रांतिकारकतेची व त्याच्यासमोरील उभ्या असलेल्या कार्याच्या व्याप्तीची अधिक सखोल आणि सूक्ष्म जाणीव त्याला घडेल. लोकांच्या इतिहासाचे ज्ञान घडणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे त्यांच्या सामाजिक आणि राजकीय विचाराच्या धारणेचे ज्ञान आवश्यक आहे. ज्ञानी लोकांनी, संस्कृतीच्या इतिहासकारांनी आणि मानववंशशास्त्रज्ञांनी, निर्देशित केले आहे की, ही विचारसरणी परीकथा, दंतकथा, म्हणी व वाक्प्रचार ह्यांच्याद्वारे व्यक्त होत असते. लोक कशा प्रकारे विचार करतात ह्याची अत्यंत बोधक व पूर्ण अभिव्यक्ती वस्तुतः म्हणी आणि वाक्प्रचारांमधून घडते. मोजके शब्द, मुद्देसूदपणा आणि कल्पनारम्यता ह्यांचे अत्युत्तम शिक्षण देणारे हे साहित्य आहे म्हणूनच केवळ नव्हे, तर पुढील कारणासाठीही नवशिक्या लेखकांनी त्याच्याकडे लक्ष द्यावे : सोविएतांच्या भूमीत लोकसंख्येत सर्वात जास्त प्रमाण शेतकऱ्यांचे आहे; ह्या मातीमधून इतिहासाने कामकरी लोक, शहरनिवासी, व्यापारी, पाद्री, अंमलदार, उमराव, शास्त्रज्ञ आणि कलाकार घडविले आहेत. ज्यांनी सरकारी चर्चवर नियंत्रण राखले होते त्यांच्या व चर्चपासून विभक्त झालेल्या विविध संप्रदायांच्या सतत प्रभावाखाली शेतकऱ्याचे मन सापडलेले होते. म्हणी आणि वाक्प्रचार ह्यांच्यासारख्या आयत्या बनविलेल्या व ठरीव साचांच्या भाषेत विचार करण्याची शेतकऱ्यांना शतकानुशतके सवय लावण्यात आलेली आहे. ह्यांपैकी बहुतेक म्हणी व वाक्प्रचार म्हणजे दुसरेतिसरे काहीही नसून संकलित स्वरूपातील चर्चची शिकवण आहे...

..सर्वसाधारणरीत्या कामकरी लोकांनी गोळा केलेला सामाजिक आणि ऐतिहासिक अनुभव संक्षिप्तपणे म्हणी व वाक्प्रचारांमध्ये सामावलेला असतो. मुठीमध्ये बोटे आवळली जातात त्याप्रमाणे घट्ट स्वरूपात शब्द वापरणे शिकण्यासाठी लेखकाला अशा साहित्याची फार गरज असते. तसेच इतरांनी संक्षिप्त बनविलेल्या शब्दांचा विस्तार करण्यासाठीही अशा साहित्याची गरज असते. काळाच्या कार्याशी विरोधी लपलेला अर्थ उघडकीला आणण्यास अथवा कालबाह्य शब्दांना उघडकीला आणण्यास त्याची मदत होते.

म्हणींपासून मी खूप काही शिकलो. अथवा दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचे तर सूत्रांच्या भाषेत विचार करण्यापासून मी खूप काही शिकलो. पुढील प्रसंग मला आठवतो : विनोदाची अत्यंत आवड असलेला माझा मित्र, देवडीवाला याकोव सल्दातोव, एकदा लांब दांड्याची नवी केरसुणी हाती घेऊन रस्ता झाडत होता. याकोवने माझ्याकडे पाहून मजेने डोळा मारला व तो म्हणाला :

"मी काहीही केलं तरी त्यातून कधीही पार पडणार नाही. जेवढं अधिक मी झाडतो, तेवढा जास्त कचरा येत राहतोय."

तो केवळ सत्य सांगत होता ह्याची मला जाणीव झाली. शेजाऱ्यांनी जरी रस्त्याचा काही भाग स्वच्छ राखला असता, तरी वाऱ्याने नजीकच्या रस्त्यावरची धूळ तेथे आणली असती. शहरातील सगळे रस्ते जरी स्वच्छ ठेवले असते, तरी भोवतालच्या शेतांमधून आणि रस्त्यांवरून अथवा शेजारच्या शहरांमधून धुळीचे लोट आले असते. अर्थात प्रत्येकाने स्वतःच्या घराभोवतालचा परिसर स्वच्छ राखलाच पाहिजे, पण त्याऐवजी जर सबंध रस्ता, सबंध शहर आणि सबंध जग स्वच्छ राखण्याचा प्रयत्न केला, तर त्या श्रमाच्या अधिक निष्पत्ती लाभतील.

अशाच पद्धतीने म्हण रचता येते. म्हण कशी अस्तित्वात येते त्याचे एक उदाहरण देतो. एके प्रसंगी नीझ्नी-नवगोरदमध्ये कॉलऱ्याची साथ पसरली होती. तेव्हा गावातील एका माणसाने अफवा फैलावायला आरंभ केला की, रोगाची बाधा झालेल्यांचा डॉक्टर निकाल लावीत होते. गव्हर्नर बारानोव यांनी त्या माणसाला अटक करण्याचा हुकूम दिला आणि कॉलऱ्याच्या रोग्यांची शुश्रूषा करण्यासाठी त्याला इस्पितळात धाडले. असे म्हणतात की, त्या अफवावाल्या माणसाने काही काळानंतर स्वतःला धडा मिळाल्याबद्दल गव्हर्नरचे आभार मानले तेव्हा गव्हर्नरनी उलट टोमणा मारला :

"सत्याचा जेव्हा तुमच्या डोळ्यावर तडाखा बसतो, तेव्हा तुम्ही खोटं बोलायचं थांबवता!"

बारानोव रांगड्या प्रवृत्तीचा माणूस होता, पण मूर्ख नव्हता; आणि मला वाटते की, अशा गोष्टी बोलण्यास तो चांगला समर्थ होता. शिवाय, हे शब्द कुणीही उच्चारले असले, तरी त्यामुळे फरक काय पडतो?

अशा सजीव विचारांनी मला विचार करण्यास आणि लिहिण्यास मदत केली. देवडीवाल्यांकडून आणि वकिलांकडून, जातीबाहेर गेलेल्या लोकांकडून व सर्व प्रकारच्या आणि परिस्थितींमधल्या लोकांकडून मी ऐकलेल्या विचारांच्या समानार्थी विचार मला पुस्तकांमध्ये आढळले. पण पुस्तकांमध्ये ह्या विचारांना दुसऱ्या शब्दांचे अवगुंठन होते. अशा रीतीने जीवनातील वस्तुस्थिती आणि साहित्य एकमेकांना पूरक ठरतात.

साहित्यिक मंडळी "नमुने" आणि व्यक्तिरेखा कशा निर्माण करतात ह्याबद्दल मी आधीच बोललो आहे, पण तरीही दोन स्वारस्यपूर्ण उदाहरणे देतो.

गोएथेचा 'फाऊस्ट' कलात्मक सृजनाची उत्तम निर्मिती आहे. ही "कल्पित" आणि रचलेली गोष्ट आहे. नेमके सांगायचे तर जीवनातून जे काही मिळाले त्याला तर्काची जोड लावलेली आहे आणि त्याच वेळी विचाराला प्रतिमांमध्ये रूपांतरित केलेले आहे. मी प्रथम 'फाऊस्ट' वाचले तेव्हा मी सुमारे वीस वर्षांचा होतो. काही काळानंतर मला आढळले की, जर्मन गोएथेपूर्वी सुमारे दोनशे वर्षे, ख्रिस्तोफर मार्लो नामक इंग्रजाने फाऊस्टविषयी लिहिले होते; 'पान त्वार्दोवस्की' नामक हीन दर्जाची आणि भपकेबाज पोलिश कादंबरी म्हणजे 'फाऊस्ट' चाच एक प्रकार होता आणि पॉल म्युस्से ह्या फ्रेंच लेखकाची 'Tean le Trouveur' ('सुखाचा शोधक') कादंबरीही त्याच विषयावरची होती. व्यक्तिगत सुखासाठी हपापलेला व इतर माणसांवर आणि निसर्गातील रहस्यांवर स्वतःची सत्ता गाजवू पाहणारा एक माणूस सैतानाला स्वतःचा आत्मा कसा विकून बसला, ह्याबद्दलच्या एका मध्ययुगीन दंतकथेमधून फाऊस्टविषयीची सगळी पुस्तके निर्माण झाल्याचे मला आढळले. जीवनाची निरीक्षणे आणि हीण धातूंचे सोन्यात रूपांतर करण्याचा व जीवनरस शोधण्याचा प्रयत्न करणाऱ्या किमयागारांचे कार्य, ह्यांच्यामधून ही दंतकथा निर्माण झाली. त्यांच्यात निष्ठावंत स्वप्नाळू आणि झपाटलेली माणसे होती, पण त्याचप्रमाणे भोंदू व ढोंगी लोकांचाही भरणा होता. "सर्वोच्च सत्ता" हस्तगत करण्याच्या ह्या व्यक्तींच्या प्रयत्नांमधील फोलपणाची टवाळी उडविण्यासाठी मध्ययुगीन डॉक्टर फाऊस्टच्या साहसांची कथा रचण्यात आली. खुद्द सैतानाच्याही ताकदीपलीकडे असलेले सर्वशक्तिमान विज्ञानाचे आणि अमरत्वाचे गुण फाऊस्टला चिकटविण्यात आले.

दुःखी फाऊस्टच्या जोडीने आणखी एक व्यक्ती उदयाला आली. ही व्यक्ती सर्व लोकांना परिचित होती : इटलीमध्ये तिचे नाव पुलचोनेल्लो होते, इंग्लंडात पंच, तुर्कस्तानात करापेत आणि आपल्या देशात पेत्रूष्का. कठपुतळ्यांच्या खेळातील अजिंक्य नायक. तो नेहमी शिखरावर असतो; पोलिसांवर, पाद्र्यांवर, प्रत्यक्ष सैतानावर आणि मृत्यूवरही मात करतो. तो स्वतः अमर आहे. कामकरी लोकांनी ह्या भाबड्या आणि वेड्याबागड्या व्यक्तिरेखेत स्वतःचे रूप पाहिले; सरतेशेवटी केवळ आपणच सव आणि प्रत्येक गोष्टीवर मात करू शकू हा त्यांचा विश्वास त्यांनी पेत्रूष्कामध्ये पाहिला.

मी जे आधीच म्हटले आहे ते ह्या दोन उदाहरणांनी परत एकदा सिद्ध होते : "निनावी" रचना, म्हणजे ज्यांच्याबद्दल आपल्याला काहीही माहिती

नाही अशा लोकांनी[1] निर्मिलेले साहित्यही संक्षेपाचे नियम पाळते, कोणत्याही सामाजिक गटाच्या विशिष्ट स्वभावविशेषांचे आणि वैशिष्ट्यांचे नियम पाळते, त्याचप्रमाणे त्या गटाच्या प्रातिनिधिक व्यक्तींमध्ये ही वैशिष्टये प्रतिरूपाने दाखविण्याच्या नियमांनाही पाळते. कलाकार जेव्हा हे नियम प्रामाणिकपणे पाळतो, तेव्हा " नमुने " निर्माण करण्यास तो समर्थ ठरतो. अशा पद्धतीने शार्ल दे कोस्तर यांनी 'थील उलेनस्पीगेल' निर्माण केला; रोमाँ रोलाँ यानी बर्गंडीचा 'कोलास ब्र्यूनोन' निर्माण केला व आल्फोन्स दॉदे यांनी 'तार्तारीन द प्रोवेन्साल' निर्माण केला. सूक्ष्म अवलोकन, साधर्म्य आणि भिन्नता शोधण्याची क्षमता व सतत आणि अखंड अभ्यास, यांच्या साहाय्यानेच केवळ अशी " नमुनेदार " माणसे रंगविता येतात. जेथे अचूक ज्ञान नसते, तेथे तर्काचा वापर करावा लागतो आणि दहापैकी नऊ तर्क हमखास चुकीचे ठरतात.

अब्लोमोव, रूदीन, ऱ्याझानोव,[2] ह्यांच्या तोडीचे नमुने आणि व्यक्तिरेखा निर्माण करण्यास मी समर्थ आहे असे मला स्वतःला वाटत नाही. तरीसुद्धा, 'फोमा गोर्देयेव' लिहिताना, स्वतःच्या बापजाद्यांच्या आयुष्यांशी आणि कामाशी सूर जमवू न शकणाऱ्या, तशा प्रकारच्या एकसुरी व " अत्यंत नीरस " जीवनात फारसा अर्थ नाही अशी अंधुक भावना मनात बाळगणाऱ्या, व्यापारी घरांमधील अनेक कुलदीपकांना पाहणे मला आवश्यक ठरले होते. अपमानास्पद अशा कंटाळवाण्या आयुष्याला जगण्याची शिक्षा मिळालेल्या फोमा गोर्देयेवसारख्या विचार करण्यास आरंभ करणाऱ्या लोकांमधून एका बाजूला दारूबाज, गुंड, दुराचारी निर्माण झाले; तर दुसऱ्या बाजूला नियमाला अपवाद ठरणारे, लेनिनवादी 'ईस्क्रा'च्या प्रकाशनाला अर्थभांडवल पुरविणारे श्रीमंत साव्वा मोरोझोवसारखे लोक निर्माण झाले. पेर्म येथील जहाजमालक नि. मेश्कोव यांनी सामाजिक-क्रांतिकारकांना आर्थिक पाठबळ दिले. कालूगाचे कारखानदार गोन्चारोव, मॉस्कोतील नि शिमद्त आणि इतर अनेक असे लोक निर्माण झाले. अशाच लोकांमधून चेरेपोवेत्सचे महापौर मिल्यूतिनसारखे सांस्कृतिक पुढारी उदयाला आले. विज्ञान, कला आणि इतर सांस्कृतिक कार्यांची जोपासना करण्यात खूप कौशल्य आणि निष्ठा व्यक्त करणारे अनेक व्यापारी मॉस्कोतून व इतर प्रांतांमधून

१. अशा लेखनाला " लोक-निर्मिती " म्हणण्याचा आपल्याला अधिकार आहे, कारण सणांच्या दिवशी रंगमंचावर सादर करण्यासाठी कारागीर संघांमध्ये बहुधा त्यांची रचना झाली. – लेखकाची टीप.

२. 'कठीण काळ'मध्ये राझनोचिनेत्स बुद्धिजीवीचा प्रकार म्हणून स्लेप्त्सोवनी उत्तम रेखाटन केले आहे. – लेखकाची टीप.

उदयाला आले. फोमाचा धर्मपिता मायाकिनसुद्धा छोट्या वैशिष्ट्यांसह ' म्हणी '' मधून घडला होता. मला वाटते त्यात मी सूक्ष्म तारतम्य दाखविले आहे : १९०५ नंतर, कामगारांच्या आणि शेतकऱ्यांच्या मृत देहांनी जेव्हा मायाकिनांसारख्या लोकांचा सत्तेकडे जाणारा मार्ग तयार केला, तेव्हा ह्या लोकांनी कामगारवर्गविरोधी संघर्षात खूप महत्त्वाची भूमिका बजाविली आणि आजही स्वतःच्या जुन्या घरटचांकडे परतण्याचे स्वप्न हे लोक पाहात आहेत.

'' अगदी नीच आणि बहिष्कृत '' लोकांबद्दल मी का लिहिले असे तरुण मंडळी मला विचारीत आहेत.

कारण अगदी सोपे होते. अगदी क्षुद्र प्रवृत्तीच्या लोकांमध्ये मी राहात होतो व माझ्या भोवतालची माणसे दुसऱ्यांचे रक्त शोषणाऱ्या वेडाने झपाटलेली होती; या रक्ताचे कोपेकमध्ये आणि कोपेकचे रूबलमध्ये रूपांतर करण्यात गुंतलेली होती. पाच कोपेकच्या तांब्याच्या नाण्यांप्रमाणे ते नीरस लोक डासां-चिलटांप्रमाणे राहात होते व माझ्या १९ वर्षांच्या पत्रलेखकाप्रमाणे त्या लोकांबद्दल माझ्या देहाचा इंच न् इंच निकोप तिरस्कार करीत होता.

गुंड आणि भटके मला सर्वसामान्य थरातील लोकांपेक्षा वेगळे भासत. त्यांनी जात गमावल्यामुळे आणि त्यांच्या वर्गातून त्यांची हकालपट्टी झाल्यामुळे यांच्या पूर्वीच्या पार्श्वभूमीची खास वैशिष्टचे त्यांच्यामधून नाहीशी झालेली असत व म्हणून ते सर्वसामान्य माणसांपेक्षा आगळे ठरत.

नीझ्नी-नवगोरदमधील तथाकथित ' मिल्योन्कात 'नीच आणि बहिष्कृतांमध्ये माजी सुखवस्तू नगरवासी गुण्यागोविंदाने राहात असत. गरीब स्वभावाचा स्वप्नाळू माझा मामेभाऊ — अलेक्सान्दर कशिरीन; इटालियन चित्रकार तोन्तीनी; ग्लादकोव नावाचा माजी जिम्नाशियन शिक्षक; एक बॅरन ब.; दरोडेखोरीबद्दल शिक्षा भोगलेला एके काळचा साहाय्यक पोलिस इन्स्पेक्टर आणि ख्यातनाम चोर '' नील्कोल्का जनरल.''

समान स्वभावाच्या सुमारे वीस लोकांचा चित्रविचित्र जमाव कझानमधील ' स्तेक्ल्यान्नी झावोद 'मध्ये राहात होता. त्यांच्यात '' विद्यार्थी '' रादलोव अथवा रादूनोव होता; दहा वर्षे सक्तमजुरी भोगलेला, चिंध्या आणि हाडे गोळा करणारा एक वयस्क माणूस होता; गव्हर्नर आन्द्रीयेवस्कींचा एके काळचा नोकर वास्का ग्राचिक होता; एका पाद्रयाचा मुलगा व व्यवसायाने इंजिनड्रायव्हर असलेला ब्येलोरशियन रोदझियेविच होता; गुरांचा सर्जन दावीदोव होता. त्यांच्यापैकी बहुतेक लोक आजारी होते व त्यांना अपायकारक होईल एवढे मद्यसेवन करीत होते. ते मारामाऱ्यासुद्धा करीत. पण तरीही त्यांच्यात बांधिलकीची आणि परस्परांना मदत करण्याची भावना होती. जी काही कमाई अथवा चोरी ते करीता,

ती सामुदायिक भोजनावर व मद्यपानावर खर्च करीत. " सर्वसामान्य लोकां "पेक्षा जरी त्यांचे जीवन अधिक खडतर होते, तरी ही माणसे सर्वसामान्यांपेक्षा अधिक श्रेष्ठ वाटत, कारण त्यांच्यात अतिलोभीपणा नव्हता. एकमेकांना ते पायदळी तुडवीत नव्हते आणि पैसे बाजूला काढून ठेवीत नव्हते. त्यांच्यातील काहीजण कदाचित थोडी बचत करीत असावेत, कारण त्यांच्यात " काटकसरीचे " आणि " सुव्यवस्थित " जीवनाच्या आसक्तीचे काही अवशेष अद्यापि शिल्लक होते. त्यांच्या काही बचती असाव्यात, कारण हिकमती आणि यशस्वी चोर वास्का ग्राचिक अनेकदा आपली लूट " खजिनदार " रोदझियेविचकडे सुरक्षित ठेवण्यासाठी आणून द्यायचा. रोदझियेविच ह्या नीच, बहिष्कृत समाजाचा जणू सरव्यवस्थापक होता. सर्वांचा त्याच्यावर विश्वास होता आणि आश्चर्य म्हणजे तो अत्यंत सौम्य आणि दुबळ्या मनाचा माणूस होता.

अनेक प्रसंगांची आठवण मी सांगू शकेन : एके प्रसंगी बांधिलकीमधील एकाने गुडघ्यापर्यंत उंच बुटांची एक जोडी चोरून आणली होती. सर्वांच्या संमतीने असे ठरविण्यात आले की, बूट विकून ते पैसे दारूवर खर्च करायचे. पण त्यावेळी चौकीवर मार खाल्ल्यामुळे आजारी असलेल्या रोदझियेविचने म्हटले की, फक्त बुटांचा वरचा भाग विकावा आणि उरला भाग " विद्यार्थ्या "ला द्यावा, कारण त्याचे बूट निकामी झाले होते. तो म्हणाला की, " विद्यार्थी थंडीमुळे मरेल आणि तो एक भला माणूस आहे."

बुटांपासून वरचे भाग अलग करण्यात आले तेव्हा माजी कैद्याने सुचविले की, त्यांची पादत्राणे बनवावीत : एक जोडी त्याच्यासाठी आणि दुसरी रोदझियेविचसाठी. अशा रीतीने त्या चोरलेल्या बुटांचा दारू खरीदण्यासाठी शेवटी वापर झालाच नाही. ग्राचिक म्हणाला की, त्या सर्व लोकांबद्दल त्याच्या मनात मित्रभावना होती आणि " शिकलेल्या माणसां "ची त्याला आवड होती, म्हणून तो त्यांना मदत करीत होता.

" एखाद्या सुंदर बाईपेक्षा सुशिक्षित माणूस मला जास्त आवडतो," तो मला म्हणाला होता. काळ्या केसांचा, रेखीव नाक डोळ्यांचा व प्रसन्न स्मित करणारा तो माणूस अगदी विक्षिप्त होता. एरवी उदास आणि मितभाषी असायचा, पण काही वेळा मात्र बेबंद आणि बेफाम उत्साहाचे त्याला झटके यायचे. अशा वेळी तो गायचा, नाचायचा, स्वतःच्या पराक्रमांच्या फुशारक्या मारायचा व जणू काही कधीही न परतण्यासाठी लढाईवर जायला निघाल्याप्रमाणे सर्वांना मिठ्या मारायचा. एका दारूच्या गुत्याखाली तळघरात राहणाऱ्या आठ भिकाऱ्यांना तो मदत करीत होता. ते सर्व जराजर्जर म्हातारे स्त्री-पुरुष होते, पण त्यांच्यात एक वर्षाचे तान्हे बाळ असलेली एक वेडी तरुणी होती. तो चोर कसा बनला त्याची

हकीकत अशी : गव्हर्नरच्या पदरी नोकर म्हणून काम करीत असताना एकदा त्याने सबंध रात्र आपल्या प्रेयसीच्या संगतीत घालविली. सकाळी झिंगल्या अवस्थेत घरी परतत असताना त्याने एका गवळणीकडून जबरदस्तीने दुधाची चरवी घेतली व चरवीतील दूध घटाघटा पिऊन टाकले. त्याला पकडण्यात आले तेव्हा त्याने प्रतिकार केला आणि न्यायाधीशाने त्याला कारागृहात धाडले. उदार मनाचे म्हणून जरी न्यायाधीशांची ख्याती होती, तरी आपली कर्तव्ये मात्र ते अत्यंत कठोरपणे बजावीत. तुरुंगातून सुटल्यानंतर वास्काने न्यायाधीशांच्या अभ्यासिकेत चोरून प्रवेश केला, त्यांचे सर्व कागदपत्र फाडून टाकले, त्यांचे गजराचे घड्याळ आणि दुर्बीण चोरली व परत एकदा तो तुरुंगात दाखल झाला. घर-फोडीच्या एका अयशस्वी प्रयत्नानंतर, कुणा रात्रीच्या पहारेकऱ्यापासून तो पळून जात होता, तेव्हा त्याच्याशी माझी ओळख झाली. त्याचा पाठलाग करणाऱ्यांपैकी एकाला मी पाडले, पळून जायला वास्काला मदत केली व त्याच्याबरोबर मीही पसार झालो.

ह्या बहिष्कृतांमध्ये विचित्र माणसे होती व त्यांच्यामधील बरेच काही मला समजू शकत नव्हते. त्यांचा कैवार घ्यावा असे मला वाटण्याचे कारण म्हणजे आयुष्याबद्दल त्यांच्या तक्रारी नव्हत्या. सुखवस्तूंच्या सोप्या आयुष्याबद्दल त्यांना हेवा वाटत नव्हता. आंबट द्राक्षांचा किंचितही दृष्टिकोन न बाळगता ते त्या आयुष्याबद्दल कुचेष्टेने आणि उपहासाने बलत. उलट त्या विषयात अभिमानाची भावना त्यांच्या ठायी होती. जणू त्यांना जाणीव झाली होती की, जरी त्यांची आयुष्ये दारिद्र्याने गांजलेली होती. तरी सोपे जीवन जगणाऱ्यांपेक्षा ते स्वतः खूप चांगले होते.

' नीच आणि बहिष्कृत 'मध्ये ज्याचे मी वर्णन केले आहे तो गरीबखान्याचा राखणदार कूवाल्दा ह्या माणसाला मी प्रथम कलोन्तायेव यांच्या न्यायालयात पाहिले. न्यायाधीशांच्या प्रश्नांना ह्या फाटक्या कपड्यांमधील माणसाने ज्या थाटात उत्तरे दिली आणि पोलिसाने, फियार्दी वकिलाने व गुत्त्याचा मालक फिर्यादी कूवाल्दा ह्यांनी सादर केलेल्या पुराव्याला तोंड देताना त्याने जो तिरस्कार व्यक्त केला, तो पाहून मी चकित झालो होतो. अदेस्सामधील एका भटक्याने सांगितलेला व ' चेल्काश 'मध्ये मी वर्णन केलेला प्रसंगही मला असाच थक्क करून गेला होता. निकोलायेव शहरी एका इस्पितळात आमची भेट झाली होती. त्याच्या सुंदर शुभ्र दातांचे दर्शन घडविणाऱ्या त्याच्या स्मिताचे व काही काम करण्यासाठी त्याने पदरी ठेवलेल्या एका तरुणाने त्याला कसे फसविले त्या हकी-कतीच्या शेवटाचे मला सुखद स्मरण आहे : "तर मी त्याला पैशासकट जाऊ दिलं; जा मूर्खा, निघून जा आणि त्याचं काय करावंसं वाटेल ते कर."

द्यूमाँच्या "उदात्त" नायकांची त्याने मला आठवण करून दिली. इस्पितळातून बाहेर पडल्यानंतर कलिगडांनी माझी सरबराई करीत त्याने मला विचारले होते : "एका फायदेशीर उद्योगात माझ्याबरोबर सामील होशील काय ? मला वाटतं, त्या कामाला तू लायक पोरगा आहेस."

ती बाब मनाला खूष करणारी होती, पण चोरटी वाहतूक व चोऱ्या यांच्यापेक्षा अधिक हितकर गोष्टी असल्याचे एव्हाना मला समजून चुकले होते.

बहिष्कृत आणि भटक्यांबद्दल मला ओढा का वाटत होता, "सर्वसामान्यांपेक्षा वेगळ्या" आणि नीरस क्षुद्रप्रवृत्ती नसलेल्या लोकांचे वर्णन करण्याची तीव्र इच्छा मला का होत होती, त्याचा हा खुलासा आहे. परकी साहित्याचाही माझ्यावर प्रभाव होता. सर्वप्रथम फ्रेंच साहित्याचा माझ्यावर प्रभाव होता. रशियन साहित्यापेक्षा मला ते अधिक ठाशीव आणि रंगीबेरंगी भासायचं. पण मुख्य कारण मात्र होते "अत्यंत नीरस आयुष्या"ला कल्पनाशक्तीमार्फत सजग करण्याची माझी इच्छा. माझ्या पंधरा वर्षांच्या पत्रलेखिकेने लिहिली आहे तशी.

आधीच मी म्हटल्याप्रमाणे ह्या इच्छेला "रोमांचवाद" असे म्हणतात. काही टीकाकारांच्या मते माझा रोमांचवाद म्हणजे माझ्या तत्त्वज्ञानामधील कल्पनावादाचे प्रतिबिंब. ते मूल्यमापन चुकीचे आहे असे मला वाटते.

तत्त्वज्ञानविषक कल्पनावाद शिकवितो की, मानव, प्राणी आणि सर्व मानवनिर्मित गोष्टी "कल्पनांच्या" प्रभावाखाली असतात. मानवाने निर्माण केलेल्या प्रत्येक गोष्टीचे अत्यंत परिपूर्ण नमुने आहेत, त्या नमुन्यांवर त्याचे कार्य पूर्णतः अवलंबून आहे आणि "कल्पनां"ची नक्कल करणे हेच त्याचे काम आहे. त्या कल्पनांचे अस्तित्व त्याला काहीशा संदिग्ध स्वरूपात जाणवते असे म्हणतात. ह्या दृष्टिकोनातून पाहता आपल्यापेक्षा वर कुठेतरी शृंखलांची आणि अंतर्गत ज्वलनाच्या इंजिनाची कल्पना अस्तित्वात आहे; क्षयाच्या सूक्ष्म जंतूची आणि आधुनिक बंदुकीची कल्पना अस्तित्वात आहे; क्षुद्रप्रवृत्ती, बेडूक, घूस यांच्याविषयीची आणि सर्वसाधारणपणे पृथ्वीवर अस्तित्वात असलेल्या व माणसाने निर्माण केलेल्या प्रत्येक गोष्टीविषयीची कल्पना अस्तित्वात आहे. ह्यावरून अगदी स्पष्टपणे आणि अटळरीत्या मान्य करावे लागते की, सर्व कल्पनांचा निर्माता अस्तित्वात आहे व ह्या निर्मात्याने काही कारणास्तव गरुड आणि ऊ, हत्ती आणि बेडूक ह्यांना निर्माण केले.

माणसाच्या बाहेर कोणतीही कल्पना अस्तित्वात नाही असे माझे मत आहे. सर्व गोष्टींचा आणि सर्व कल्पनांचा केवळ माणूसच निर्माता आहे, असे माझे मत आहे. तोच किमयागार आहे आणि सर्व नैसर्गिक शक्तींचा तोच भावी मालक आहे. आपल्या जगात जे काही सर्वात सुंदर आहे ते माणसाच्या श्रमांमधून निर्माण

झाले आहे, त्याच्या चतुर हातांमधून निर्माण झाले आहे. श्रमाच्या प्रक्रियेमधून आपले सर्व विचार आणि आपल्या सर्व कल्पना निर्माण होतात. कला, विज्ञान आणि तंत्रशास्त्र ह्यांचा इतिहास ह्या गोष्टीची आपल्याला खात्री पटवून देतो. वस्तुस्थितीमधून विचार निर्माण होतो. मानवाला मी "वंदन करतो," कारण त्याच्या तर्कशक्तीच्या, त्याच्या कल्पनाशक्तीच्या आणि त्याच्या अनुमानाच्या मूर्त रूपाविना आपल्या जगात मला दुसरे काहीही दिसत नाही. "छायाचित्रकला" हा जसा माणसाचा एक शोध आहे, तसाच देव हासुद्धा एक शोध. फरक एवढाच की, जे प्रत्यक्षात आहे त्याची कॅमेरा नोंद करतो, तर देव म्हणजे माणसाने स्वतःच्या इच्छांना मूर्त रूप देणाऱ्या व्यक्तीचे काढलेले छायाचित्र. त्याच्या कल्पनेतील ही व्यक्ती सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान आणि पूर्ण न्यायी वागण्यास समर्थ आहे.

"पावित्र्या"बद्दल बोलण्याची जर गरजच असेल, तर माझ्या दृष्टीने एकमेव पवित्र गोष्ट म्हणजे माणसाचे स्वतःविषयीचे असमाधान, तो आहे त्यापेक्षा अधिक चांगला बनण्याची त्याची धडपड. जीवनात गोंधळ माजविणाऱ्या सर्व घाणीविषयी आणि त्याने स्वतः निर्माण केलेल्या घाणीविषयी त्याला वाटणारा तिरस्कारही मला पवित्र वाटतो, मत्सर, लोभ, गुन्हा, रोगराई, युद्धे आणि जगातील लोकांमधील सर्व वैमनस्य, ह्यांना विराम देण्याची त्याची इच्छा मला पवित्र वाटते. त्याचे श्रम मला पवित्र वाटतात.

१९२८ □

आमची संग्राह्य प्रकाशने

साहित्य आणि कला
कार्लमार्क्स–एंगल्स
मूल्य : पंचवीस रुपये

साहित्य आणि कला
माक्सीम गोर्की
मूल्य : साडेअकरा रुपये

कला आणि समाजजीवन
प्लेखानोव्ह
मूल्य : अडीच रुपये

समाजवादी सिद्धांत आणि संस्कृती
लेनिन
मूल्य : दहा रुपये

जवाहरलाल नेहरू (चरित्र)
आ. गोरेव, ब्ला. झिम्यानीन
मूल्य : बारा रुपये

फाशी जाता जाता
ज्युलिअस फ्युशिक
मूल्य : सहा रुपये

अर्नेस्टो चे गुप्तवारा
अनु. दि. वा फडणवीस
मूल्य : दहा रुपये

जमातवाद आणि भारतीय इतिहास-लेखन
रोमिला थापर, बिपन चंद्र
मूल्य : तीन रुपये

मार्क्सवाद आणि भगवद्‌गीता
दिलीप बोस । सरदेसाई
मूल्य : पाच रुपये

विवेकानंदांचे सामाजिक–राजकीय विचार
विनयकुमार राय
मूल्य : चार रुपये

साहित्य : निर्मिती व समीक्षा
आवृत्ती तिसरी
दि. के. बेडेकर
मूल्य : वीस रुपये

(१) बालपण
(२) माझी विद्यापीठे
(३) दाही दिशा
} माक्सीम गोर्की
मूल्य : तेवीस रुपये

स्वातंत्र्यलढा आणि भारतीय मुस्लिम
सांतीमोय रे
मूल्य : पंचवीस रुपये

लोकवाङ्मय गृह प्रा. लि.